
बॅडकमांड
प्रा. श्रीराम काळे
बॅडकमांड • प्रा. श्रीराम काळे
ई साहित्य प्रतिष्ठान

**•प्रकाशक**

ई साहित्य प्रतिष्ठान, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

**•बॅंडकमांड-लेखक** प्रा.श्रीराम विनायक काळे,

८७६६७६४६४१

**मूळ गाव-** पडेल ,ता. देवगड जि. सिंधुदुर्ग. **सध्याचा निवास**-3 रुद्रप्रिया अपार्टमेंट, रेशनशॉप समोर, वारजे, पुणे 411058

**•प्रथम आवृत्ती प्रकाशक**

श्री विघ्नेश गोखले, विघ्नेश पुस्तक भांडार, ॐ साई भालचंद्र कॉम्प्लेक्स,मुंबई गोवा हायवे, कणकवली,जि. सिंधुदुर्ग ९४२२३७९३२०

**•मुखपृष्ठ**

राजेश ग्राफिक्स , कणकवली

**•टंक लेखन** व **पेज सेटींग**

श्री आशिर्वाद एंटरप्राईझेस ,कोल्हापूर

•ISBN 978-81-908189-3-3

•**बॅड कमांड**

लेखक - प्रा. श्रीराम विनायक काळे.

मोबा·८७६६७६४६४१

•**प्रकाशन वर्ष**

**प्रथम आवृत्ती १ऑगस्ट २०२२(विनायक चतुर्थी)**

**द्वितीय ई आवृत्ती जून २०२४**

• BAD COMMAND

Prof.Shreeram Vinayak Kale

**या सर्वांचे आम्ही ई आवृत्तीला व विनामूल्य वितरणाला परवानगी दिल्याबद्दल मन:पूर्वक आभार मानतो.**

**--- ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

# अर्पण पत्रिका

माझे परम मित्र, पत्रकार आणि **साप्ताहिक किरात चे भूतपूर्व संपादक कै. श्रीधरराव मराठे यांना सस्नेह अर्पण**



# लेखकाचे मनोगत

मला लिहीतं करणारे माझे बंधु ज्येष्ट साहित्यिक शरद उर्फ भाऊ, साप्ताहिक किरातचे संपादक श्रीधरराव मराठे, सहित्यिक मित्र डॉ. विद्याधर करंदिकर आणि सिद्धहस्त कवी श्री. प्रमोद जोशी ही माणसं माझ्या संपर्कात आली नसती तर जी थोडीफार साहित्यसेवा मी केली ती होणं असंभव होतं. तसंच माझे वाचक नी समीक्षक वर्षा वहिनी, सहधर्मचारिणी सौ. सुगंधा आणि माझा मावस भाऊ विजय उकिडवे यांचं प्रोत्साहनही मला उर्जा देत गेलं. साहित्य निर्मिती ही आत्मानंदासाठी असली तरीही प्रेरणा स्त्रोत आणि प्रोत्साहित करणारे रसिक यांची साथ संगत लाभली तरच सकस साहित्य निर्मिती होऊ शकते.

मी इंग्रजी प्रिन्सिपल घेऊन बी.ए. आणि एम. ए. केलं . त्या निमित्ताने दर्जेदार इंग्रजी वाङमय अभ्यासता आलं. भाऊ उत्कृष्ट लेखक असल्यामुळे घरात साहित्यिक वातारण असायचं. सत्यकथा, मौज, ललित, माणूस, किस्त्रीम अशा मासिकांतून भाऊच्या कथा प्रसिद्ध व्हायच्या. भाऊ तुटपुंज्या

कमाईतही बेदरकारपणे असंख्य पुस्तकं खरेदी करायचा . त्याचा वैयक्तिक ग्रंथसंग्रह खुप मोठा होता. त्यामुळे दर्जेदार पुस्तकं वाचता आली. आमच्या पिढीला उमेदीच्या काळात वाचन. गाणी ऐकणं आणि भटकंती हेच छंद सहज उपलब्ध आणि परवडणारे होते. त्यावेळी संपर्क माध्यमांचं आक्रमण झालेलं नव्हतं. आसपासचा परिसर, झाडं झुडपं, कीटक, प्राणी, पक्षी , निसर्गात ऋतूमानानुरुप होणारी स्थित्यंतरं यांच्याशी आमचा सुसंवाद घडला. त्यामुळे आमच्या पिढीतल्या सर्वांचंच अनुभव विश्व समृद्ध झालं. अस्थाई आत्मनिष्ठा, आत्मकेंद्री वृत्ती नी पैशाचा हव्यास या ऐवजी सोशिकपणा, समर्पण वृत्ती आणि होता होईतो मिळतं जुळतं घेणं नी जे आहे त्या तुटपुंज्या कमाईतही आनंद मानण्याची अल्पसंतुष्ट वृत्ती या तत्कालिन कुटुंब व्यवस्थेचे परिणाम रूप संस्कारित झालेल्या मूल्यांमुळे अपुऱ्या साधन सुविधा असूनही जीवनाचा मनमुराद आस्वाद आम्हाला घेता आला.

तंत्रज्ञानाचा उदय नी विस्फोटही आमच्या कार्य काळातच झाल्यामुळे संगणक. मोबाईल यांवर प्रभुत्व नाही मिळवता आलं तरी यांची उत्तम हाताळणी आम्हाला करता येते. वॉटस् ॲप, फेसबुक यांच्या आहारी न जाता त्या मिडियामध्ये

आम्ही आमचं अस्तित्व ठळक पणे दाखवू शकलो. टंकलेखनचं तंत्र अवगत नसूनही वेगवेगळी ॲप वापरून मी माझ्या कथा टाईप करु शकतो. यु ट्युब, गुगल सारखे माहिती स्त्रोत वापरून मी माझं ज्ञान अद्ययावत ठेवू शकतो. आयुष्याच्या अंतिम पर्वात माझ्या अंगवळणी पडलेल्या निवांत खेडवळ वातावरणा पासून दूर शहरी अपरिचीत वातावरणातही मी विरंगुळा शोधू शकतो.

आजपर्यंत सुमारे सत्तरेक कथा मी लिहिल्या नी त्या अणुरेणू, देवदुर्ग,आरती, वैनतेय, किरात, प्रसाद, अपूर्व, माहेर, वसुधा,जत्रा या दर्जेदार मासिकांच्या दिवाळी विशेषांकात प्रसिद्ध झाल्या. काही कथाना दर्जेदार स्पर्धांमध्ये पुरस्कारही मिळाले. शासकिय नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजनेतून माझा ‘रुजवातीच्या गोष्टी ’ हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला याचं मूळ मी ज्या कालखंडात वाढलो त्या काळातील समाज रचना, संस्कार, संकेत नी श्रद्धा यांमध्ये आहे. मी तसं बऱ्यापैकी लेखन केलं तरी तालुका, जिल्हा पातळीवर साहित्यिक वर्तुळात मी कधिच मिसळलेलो नाही . त्यामुळे साहित्यिक वर्तुळात साहित्यिक म्हणून माझी ओळख नाही. उलट अगदी गाव पातळी पासून तो जिल्हाभर प्राध्यापक म्हणून मला विस्तृत ओळख आहे,

१९८० ते ८७ या काळात मी रत्नागिरी सिंधुदुर्ग बॉर्डर वर,

राजापुर तालुक्यात नाणार येथे हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक म्हणून सेवा केली. त्या कालखंडात हायस्कूलशी संलग्न अनुदान तत्वावरील सार्वजनिक ग्रंथालय आणि वाचनालय आम्ही सुरु केलं. प्रस्ताव दिला आणि सहाय्यक ग्रंथालय संचालक पुणे यानी मान्यताही दिली, मात्र त्या साठी विशिष्ठ पुस्तक संख्येची होती. एवढी पुस्तक संख्या करण्यासाठी सुमारे सहा-सात हजार रुपयांची पुस्तक खरेदी एक हाती करणे गरजेचे होते नी संस्था एवढा निधी उभा करू शकत नव्हती. हा गुंता कसा काय सोडवायचा ह्या विवंचनेत आम्ही होतो.

त्या वेळी कणकवलीचे पुस्तक विक्रेते भरतकुमार गोखले याना आमच्याकडे सार्वजनिक वाचनालय सुरु होत आहे याची बातमी लागली . नेमका दिवस आठवत नाही, दुपारी रत्नागिरी गाडीने वाघोटणला उतरून होडीने खाडी पलिकडे नाणारला जाता येते ही अचूक माहिती मिळवून गोखले दुपारी साडेबाराच्या सुमारास नाणार हायस्कूल मध्ये आले. मी आमची अडचण सांगितल्यावर क्षणाचाही विचार ना करता गोखले म्हणाले, “हात्तिच्या ..... एवढंच ना मी तुम्हाला तीन वर्षाच्या क्रेडिटवर पुस्तकं देतो. तुम्ही वर्षाला जसजसं अनुदान येत जाईल तसतशी माझी रक्कम भागवा.” त्या वेळी

पुस्तक विक्रीवर १० ते १५% कमिशन मिळे नी बहुसंख्य हेडमास्तर ते बिलात न दाखवता परभारे खिशात टाकीत तशीही व्यवस्था ऑर्डर दिल्या दिल्या तत्काळ करण्याची गोखलेंनी तयारी दर्शविली .

मी माझ्या कारकिर्दीत कधिच वेतनाव्यतिरिक्त एक पै ची ही अपेक्षा केली नाही. माझा प्रांजळपणा पाहून गोखले अधिकच प्रभावीत झाले नी त्यानी ५% जादा म्हणजे 20% कमिशन द्यायची तयारी दर्शवली. मग प्रकाशन याद्या घेऊन माझे दोन तीन सहकारी पुस्तकं निवडून यादी करायच्या कामाला लागले. दरम्याने लंच ब्रेक झाला. मी सुटीत जेवायला बिऱ्हाडी जात असे. यादीचे काम दोन तीन तास चालणारे. मी गोखलेना माझ्यासोबत जेवायला चलण्याची विनंती केली. ते संकोचाने यायला तयार होईनात. खूपच आग्रह केल्यावर ते आले. तरीही पानावर बसल्यावरही सुरुवातीपासूनच पुरे.... पुरे.....चा मंत्र सुरू. मग मी म्हणालो, “झालं तर जेवणाचे पैसे द्या, पन पानावर बसून संकोच करू नका. हे गाव असं दुर्गम.... इथे खाणावळ दूरच पण हॉटेलात सुद्धा फरसाण नी चहाशिवाय काहीही मिळणार

नाय. म्हणून वेळी अवेळी शाळेच्या कामासाठी जो कोण येईल त्याची व्यवस्था गृहस्थधर्म म्हणून मी करतो.”

मोठी ऑर्डर घेऊन संध्याकाळी गोखले रवाना झाले. आठ दहा दिवसात त्यानी ऑर्डर पुरी केली. वाचनालयाला मान्यता मिळाली. गोखल्यांचं पुस्तक बील दोन वर्षातच पूर्ण भागवून झालं. त्यांच्याशी माझा चांगला स्नेहबंध जुळला. पुढे मी नाणार सोडून देवगड बी.एड. कॉलेजवर प्राध्यापक म्हणून रुजू झालो. इथे साहित्या पेक्षा शैक्षणिक पुस्तकांची खरेदी असायची. कथा - कादंबरी अशी छोटीशी ऑर्डर कधिमधि गोखलेना मिळायची. पण देवगडला हायस्कूलमध्ये किंवा बर्वे वाचनालयाची ऑर्डर घ्यायला गोखले यायचे तेंव्हा आवर्जून मला भेटायचे. मी ही कामानिमित्त कणकवली भागात गेलो कि, स्टॅंड नजिकच्या त्यांच्या बिऱ्हाडी जरूर खेप करायचो.

मनीध्यानी नसताना त्यांच्या प्रकाशनातर्फे माझा कथासंग्रह प्रसिद्ध होत आहे . हा अजब योगायोगच म्हणायला हवा. आणखी एक विलक्षण नी कौतुकाची बाब म्हणजे या माझ्या कथासंग्रहाला माझी बी. एड.ची माजी विद्यार्थिनी आणि माझी मानस कन्या सौ. रश्मी कुलकर्णी - कशेळकर या

सिध्दहस्त ललित लेखिकेची प्रस्तावना आहे. मौज , हंस सारख्या दर्जेदार मासिकांमध्ये तिचे ललितलेख प्रसिध्द होत असतात. भुईरिंगण नी भुयपर्मळ हे तिचे दोन ललित लेखसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. कोकणचं निर्मळ , निरागस समाजमन आणि सात्विक, सोज्वळ कुटुंबजीवन अत्यंत प्रत्ययकारी शब्दात उभं करण्याचं तिचं कसब वाखाणण्यासारखं आहे. रश्मी माझ्यासारखीच परखड मध्यमवर्गीय परिस्थितीत वाढली. पण बेताबाताच्या मिळकतीत गरजा मारून, हौशी मौजीना मुरड घालून जगाव लागलं त्याबद्दलची खंत चुकूनही जाणवत नाही. उलट प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देऊन जीवनाचा आस्वाद कसा घ्यायचा याची प्रत्ययकारी अनुभूती तिचे लेख वाचताना प्रकर्षाने येते.

“शिष्यात् इच्छेत पराजयम्” अशी संस्कृत उक्ती आहे. या संग्रहाला प्रस्तावना द्यायला सांगितल्यावर प्रारंभी तिचं हो नाही चाललेलं पण त्यामागे नम्रता नी संकोच होता. माझ्या शिष्येची दर्जेदार साहित्यसेवा पाहता तिने माझ्या संग्रहाला प्रस्तावना द्यावी हा माझा बहुमान आहे असं मी समजतो. म्हणून “शिष्यात् इच्छेत सन्मानम्” असं मी

म्हणेन.  A man is a mere puppet, the strings of which are handled by destiny..... या एस्. वाय्. असताना वाचलेल्या अवतरणाची प्रचिती या संग्रहाच्या निमित्तने मला आली. हा कथा संग्रह प्रकाशित होण्याचं श्रेय निर्विवाद्पणे प्रकाशक विघ्नेश गोखले यालाच द्यावं लागेल.. तसेच टायपिंग आणि पेज सेटिंग हे किचकट नी कंटाळवाणं काम अनिल मोहिते याने अगदी मन लावून बिनचूक पूर्ण केलं. आयुष्याच्या अमृतपर्वात कथासंग्रह प्रसिद्ध होण्याचं सद्भाग्य मला लाभलं हा मराठी सारस्वताचा आशीर्वाद आहे असंच मी मानतो !

प्रा. श्रीराम विनायक काळे.

एम. ए. एम.एड. एम.फिल.

# प्रस्तावना

प्रा.श्रीराम काळे यांचा ‘बॅडकमांड’ हा तिसरा कथासंग्रह प्रकाशित होत आहे. या पूर्वी त्यांचे ‘रूजवातीच्या गोष्टी’ व ‘पाखरांची भाषा’ हे दोन कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. प्रा. काळेसरांचा स्वतःचा वाचक वर्ग आहे आणि तो या म्हणजे कोकण प्रदेशातल्या या गोष्टीचा, त्यांच्या कथनशैलीचा चाहता आहे.

कोकणातलं देवगड तालुक्यातलं निसर्गरम्य पडेल हे त्यांचं गाव. शिक्षण क्षेत्रातली सदतीस वर्षे त्यांनी इथल्या कोकणातल्या खेडेगावात शिक्षक म्हणून सेवा दिली आणि आपल्या निरीक्षण शक्तीने जे टिपले त्यांच्या या कथा झाल्या. या कथांना कोकणच्या लाल मातीचा गंध आणि इथल्या आदिम जीवनाचा नाद आहे. भाषा अभ्यासकांनी नावाजलेली कोकणच्या भौगोलिक पट्ट्यातली कुडाळी बोली म्हणजेच मालवणी बोली ही या कथांच्या सौंदर्यात भर टाकते; हेच या कथांचे अलंकरण. या कथा वाचताना इथल्या माणसांना प्रत्यक्ष भेटल्याचा अनुभव मिळतो.

या सर्व कथांमध्ये केंद्रस्थानी आहे ती शिक्षण व्यवस्था

आणि ते अगदी साहजिक आहे. शाळा हे विद्येचे मंदिर म्हणून त्याकडे पाहत असताना त्या व्यवस्थेत वावरणारी माणसं, समाज आपल्या आदर्शवादात बसवतो आणि त्यांना सहन करत असतो. परंतू काळेसर त्यातली विसंगती हेरून; त्या व्यवस्थेतले अनेक मनुष्यप्राणी आपल्या समोर उभे करतात. भौतिक सुखाच्या मागे लागलेल्या या जगात शिक्षकही आहे आणि त्यामुळे त्याच्याबद्दलचा आदरभाव लोप पावतो, हे जाचणारं सत्य या कथांमधून दिसतं.

वासना ही माणसांत असतेच परंतू या विकाराना आवरू न शकलेला संस्थाचालक या कथेतून येतो. स्त्रीकडे उपभोग्य वस्तू म्हणून बघणारे या संस्थाचालक शिक्षण व्यवस्थेत जसे दिसतात तसेच आपल्या शरीराचा वापर पुरूषाला भुलवण्यासाठी, त्याला अडचणीत आणण्यासाठी करणा-या शिक्षिकाही इथं दिसतात. शिक्षक,संस्थाचालक,मुख्याध्यापक यांच्यातलं सत्ताकारण, आर्थिक राजकारण आणि समाजकारण याविषयी या कथा बोलतात आणि देशाचे नागरीक घडवणारी ही सर्व माणसं इथं आपल्या विकार-वासनां सकट अतीसामान्य होऊन जातात.

या कथाप्रदेशात एकमेकांवर निस्सीम प्रेम करणारी

माणसं आहेत. दोन भिन्न जातीतल्या, भिन्न समाजातल्या, भिन्न धर्मातल्या तरूणांचं प्रेम समाजातल्या कर्मठ - सनातनी विचारांशी लढतात दिसतं आणि आपलं नातं निभावतानाही दिसतं. मुलीला लग्नाची परवानगी देणारा आणि तिच्या निर्णयाचा आदर करणारा स्वाभिमानी बाप इथं दिसतो आणि ब्राम्हण जातीतल्या पोटजातींनाही महत्त्व देणारा समाजातील उच्चस्तरही इथं उघडा पडतो.

शरीरसुखाच्या बाबतीत बिनधास्त असलेल्या स्वैराचारी स्त्रीची कथा इथं आलेली आहे; मात्र त्याची किंमत समाजाला भोगावी लागते ती एडस् या असाध्य रोगाच्या रूपाने आणि त्याच वेळी समाजाने कुरूप ठरवलेला रंग आणि संयमी ,संस्कारी माणूसही त्यातून तरून जातो . या कथांत शिक्षक म्हणून आलेली स्त्री पुरेशी धीट आहे. शरीरसुखाचे आमिष दाखवून आपला कार्यभाग साधणारी शिक्षक स्त्री या कथेतून भेटते.

लेखकाच्या कथाप्रदेशात अनेक प्रेमकथा घडतात आणि त्या दंतकथा बनून जिवंत राहतात कारण भूतपिशाच्च,आत्मे,पुर्नजन्म यावर विश्वास ठेवणारा हा गुढवादी, आदिम समाज. कोकणप्रदेश म्हटल्यावर अशी

एखादी तरी चित्तथरारक कथा वाचायला मिळेल असा विश्वास प्रा. काळे यांच्या वाचकाला असणारच आणि त्याच्या ईच्छेचा मान इथं राखला जातो. प्रा. काळे यांची लेखनशैली ती गुढता अचळ पकडते. त्या आत्म्याच्या जगातली झाडे निराकार होतात आणि वाचक त्याच्या आभासी छायेत रमून जातो. अशा कथा अजून या संग्रहात यायला हव्या होत्या असे वाटत राहते.

प्रा. काळे यांनी कथा या साहित्यप्रकारातून त्यांना भेटलेली माणसे आपल्यापुढे मांडताना त्यांचे स्वभावचित्र कुठेही कृत्रिम होणार नाही ही काळजी घेतलेली आहे ; ती त्यांच्या सहजशैलीने. चला, आपण सर्व वाचक म्हणून त्यात रमून जाऊ.

सौ. रश्मी कशेळकर.

# बॅड कमांड (कथा संग्रह)

## अनुक्रमणिका

१.नाते तुझे नी माझे
२. शुभमंगल सावधान
३. यक्सप्लॉईट
४. बॅड कमाण्ड
५. काळ सोकावलो
६. जांभळीचा साणा
७. मियाँ बिबी राजी
८. चमडा सस्ता है

# १. नाते तुझे नी माझे



अतिदक्षता कक्षाचे दार उघडून अरूण भावे आत आला. “सर सगळया फॉरमॅलिटीज पु-या झाल्या. साला गव्हर्टमेंट हॉस्पिटलमध्ये जायचा हा पहिलाच एक्सपिरीअन्स... इथे ह्या सेक्शनला बील घ्या... त्या सेक्शनमध्ये चलन पास करून घ्या... आर.

एम्. ओ. ची साईन घ्या... **मेट्रन**ची नोट घ्या... डेडली एक्सपिरीअन्स. काऊंटरवरच्या क्लार्कने हा सगळा चक्रव्यूह वणद्दन करून सांगितला तेव्हा डिस्चार्ज मिळवणं ही मेरे बस की बात नही असंच मी मनात म्हटलं होतं... पण गॉडब्लेस... मे ट्र न ऽऽ काय बरं त्यांचं नाव...हांऽऽ फर्नांडिस मॅडम... त्यांच्या साईनसाठी त्यांच्या चेंबरमध्ये गेलो...वाटलेलं मेट्र न म्हणजे काळी ढुस्स... भला मोठा रोड रोलर... खरखरीत आवाज अन् तिरस्कारयुक्त नजर... असलं प्रस्थ असणार... पण ही **मेट्रन** साली भलतीच क्यूट... फॉर्म वाचून झाल्यावर मधाळ आवाजात मॅडम म्हणाल्या... " प्रदिप बापट आपले डॅडी ना?"

त्यांच्या प्रश्नापेक्षाही त्यांच्या गोड आवाजाने मी अक्षरशः चितपट झालेलो...मग सांगितलं त्यांना..."मी त्यांचा असिस्टंट... बापट साहेब इंडोकेमचे पर्चेसिंग मॅनेजर.मी त्यांच्या सेक्शनला अकौंटंट आहे." चष्मा काढून हातात घेत दीर्घ उसासा सोडीत मॅडम म्हणाल्या, " सॉरी... घारे डोळे, गोरा रंग आणि पोश्चर... साहेबांच्यात आणि तुमच्यात खूपच साम्य आहे... बसा ना तुम्ही..."अन् मॅडमनी बेल वाजवली.वॉर्डबॉय लगबगीने आत आला. मॅडमनी पर्समधून पैसे काढले.फॉर्म अन् पैसे त्याच्याकडे देऊन म्हणाल्या," जा चलन भरून रसीट घेऊन ये.अन् तो पर्यंत दोन कॉफी दे पाठवून..." वॉर्डबॉय रसीट घेऊन येईपर्यंत कॉफी पिणं झालं.ॅडमनी तुमची थोडी चौकशी केली... जुजबी... ़म्हणजे मिसेस काय करतात... मुलं किती..."सर काय प्रकार मला कळेचना... मी आपला गप्प बसलेला... वॉर्डबॉय डिसचार्ज सर्टिफिकेट घेऊन आला ते माझ्या हातात देत मॅडम म्हणाल्या, "गुडबाय् यु मे गो..." तेव्हा मात्र न रहावून मी म्हटलं " मॅडम आपण

ओळखता साहेबाना?अन् बील... सरानी पैसे दिलेयत्." मी खिशातून बंडल बाहेर काढल.मला हाताने थांबण्याची खूण करीत मॅडम म्हणाल्या, " तुझ्या सरांचे एक रिलेटीव मगाशीच येऊन गेले... त्यानी दिले होते बीलाचे पैसे..."

बेडवरून खाड्कन उठत प्रदिप म्हणाला, " काय म्हणालास नाव... फर्नांडिस?" त्यावर अरूण उरूतरला "होऽ हो... फर्नांडिस... सुनिता फर्नांडिस"अरूणचं उत्तर ऐकून प्रदिप दोन्ही हातानी डोकं गच्च दाबीत बेडवर जवळजवळ कोसळलाच... सुनिता... सुनिता... सुनिता इतोरीन फर्नांडिस......परब मास्तरांनी गेंगण्या सुरात हजेरी घ्यायला सुरूवात केलेली...विमला धाकू चव्हाण, इंदू हरी बागवे, कमळा राघो पाडावे, सुनिता इतोरिन फर्नांडिस मुलींची नावं सम्पल्यावर मग मुलांची नामावली सुरू झाली. हजेरी झाल्यावर प्रदिपची पाटी तपासून मास्तर म्हणाले, " आता पाटया बाहेर काढा... भटा म्हणजे प्रदिप (मास्तर आणि मुलंसुध्दा त्याचा उल्लेख 'भटा' असाच करायचे) सगळयांची गणितं तपास... ज्यांची दोन गणित चुकली त्याना चार छडया, तीन चुकली त्याना सहा छडया, सगळी चुकली त्याना दहा छडया दे आणि शुध्दलेखन घाल मग... मी जरा आजचा पट पुरा करून टाकतो. हे बघा रे पोरानो आता गप्प -हायचं...कोणी काय आवाज केला जरासा तरी नायसा करून टाकीन एकेकाला... घ्या गणित तपासून..."

सुनिताचं एक गणित चुकल... डोळयात पाणी आणीत अजिजिच्या सुरात सुनिता म्हणाली, "पद्या... एक पावट् सोड हां मला... मी नाय छडया घ्यायची... माझी गणित नेहमी बरोबर येतात. हे एक अवघडच होतं... आणि घरात माझी आई-बाबा मला दाखवीत नाय अभ्यास... आये माझी... तिला लिहायला - वाचायला येत नाय... मग मी काय करणार... तुझं आपलं बरं आहे... तुझी आई-बाबा तुला

दाखवतात अभ्यास... ए मी तुझ्या घरी येऊ अभ्यासाला?"

बापटांच्या घरापासून हाकेच्या अंतरावर किरीस्तावांची घरे. त्या दिवशी सुनिता संध्याकाळी अभ्यासाला बापटांच्या घरी गेली. किरीस्तावाची पोरगी घरी आली हे आईला एवढंस रूचलेलं नव्हतं... पण अश्राप मुल त्याचा अव्हेर कसा करायचा... तिचं मन म्हणालं... पदूबरोबर सुनितालाही गूळपोह्याची वाटी तिने दिली. पदूचं खाऊन झाल्यावर तो उठून हात धुवायला गेला... सुनिताचं खाऊन झालं... गुळाची बोटे चाटून झाल्यावर तिने नेसूच्या परकराला बोट पुसली... तशी आई ओरडली... " ऊठ आधी... ते जमिनीवर सांडलेले पोहे वेचून वाटीत भर नी बाहेर नेऊन अंगणाच्या कडेला टाक..." वाटी, तोंड धुवायला लावूनच मग आईने तिला अभ्यासाला बसू दिलं... दिवस जात राहिले... उष्टं, खरकटं, विधी निषेध एकेक भटांच्या चालीरीती सुनिताला उलगडत गेल्या. किरीस्तावाची असली तरी लीन आहे, स्वच्छ रहाते, चांगल बोलते, अभ्यसात तर पदु इतकी हुशार! म्हणून आईने तिचा अव्हेर केला नाही. सुनिताला समजायला लागलं अन् आपली पायरी तिने कधी ओलांडली नाही.

ब्राह्मणाचं वागणं-बोलणं, त्यांच्या घरातली स्वच्छता... सुनीता त्यांच अनुकरण करायची, कळायला लागल्यावर तीने मांस-मच्छर खाणं बंद केलं... क्वचित प्रसंगी दारू खाऊन आल्यावर इतोरीन बडबडायचा..."मांस-मच्छर बंद करायला आही भट बामन थोडेच हाऊत?... तो आमचा धर्म हाय... आठ रोजात एकदा तरी सागोती हवी नायतर आमचा नाळगूत धरणार... उद्या लगीन झाल्यावर घोव वशाट मागेल... त्येला डुकाराचा नायतर ढोराचा मटन रांदून वाडावा लागेल तुला... भटांकडे जाऊन मोठी भटीन होणार माझी बया.." पण मुलीचं स्वच्छ, टापटीप वागणं, निग्रहाने शाकाहार

घेणं... त्याला मनातून खूप आवडायचं सुध्दा!"

मुलं जाणत्या वयात आलेली... अकरावीला बोर्डाची परिक्षा म्हणजे मोठचं पर्व ! गेली ५-६ वर्ष पदूचे वडिल क्षयानं अंथरूणाला खिळलेले ! कुटुंबाची ओढघस्त सुरू झालेली. सुनिता वरचेवर बापटांच्या घरी यायची. पदूची आई वस्ताद... हे वय म्हणजे खुळं वय... आपला नाश आणि जगाचं हसं व्हायचं... सुनिताचं येणं बंद व्हावं असं तिने आडून आडून सुचवून बघितलं पण पदू तिचं बोलणं उडवून लावायचा. आईच्या सांगण्यामागे तिच्या मनात वेगळा विचार काय असावा याचा त्याला अंदाजच नव्हता. सुनिताकडे मॅट्रि क मॅक्झिन्स्, गाईड सगळा संच... पदूला पुस्तकांची जमवाजमव करताना यातायात. अण्णा आताशी कायम झोपून रहायचे... त्याना सारखा खोकला यायचा... उठून फिरायची त्राण नाही. सुनिताशी संगत सोडायची म्हणजे अभ्यासाचं कसं होणार? त्याने तर बोर्डात नंबर काढायचा चंग बांधलेला. सुनिता येतच राहिली... आईची बारीक नजर असायची पण अभ्यासाव्यतिरिक्त अगदी संशय घ्यायलासुध्दा तिला काही आक्षेपार्ह बाब सापडली नाही.

**मॅट्रिकचा** रिझल्ट लागण्यापूर्वी पदूचे वडिल वारले... पदू ८७% मार्क मिळवून बोर्डात पहिला आला. सुनिता ७३ % मार्क मिळवून पास झाली. इतोरिन पँट-शर्टचं कापड भेट म्हणून घेऊन कौतुक करायला पदूच्या घरी आला. तो ओसरीवर कडेलाच पाय सोडून बसला. "भटीन काकू तुमच्या पदूची संगत धरली पन माजा चेडू चांगले मारक घेऊन पास झाला. जीजस त्येचा भला करील... आमच्या जातीत शिक्षणाला मोठा मान... सुनिताला रत्नागिरीच्या कालेजात घालीन मी... माजी भैन बुलुश -हाता ना रत्नागिरीक... पदूला पन फुढे

शिकायला पाटवा... रत्नागिरीला तुमच्या लोकांची होस्टेल असा तिथे -हायची, जेवनाची सोय करतात... बगा पटला तुमाला तर... मी सगळी म्हायती काडली रॉड्रि ग्ज मास्तर कडून... काय थोडी मदत मी पन करीन. माजी पोरगी किरीस्तांव म्हनून कदी खाली पन क्येला नाय तिचा... मला जाण हाय तेची."

पदूने रत्नागिरीला संस्कृत पाठशाळेत राहून बी. एस्सी. ला ॲडमिशन घेतली. सुनिता तिच्या आंटीकडे थिबा पॅलेसला रहायची. कॉलेजच्या रंगीबेरंगी दुनियेत पदापर्ण केल्यावर मात्र एक वेगळाच भावबंध त्यांच्यामध्ये विणला जाऊ लागला. शहरी वातावरणा मुरलेल्या... छानछोकीत वागणा-या घमेंडखोर मुलींच्या घोळक्यात सुनिता वेगळीच दिसायची. ख्रिश्चन असली तरी कुंकवाची मोठी टिकली लावणारी, गोल चेहेऱ्याची सुनिता... आर्जवी मधुर बोलणं... लांबसडक कुरळे केस... तिचं वेगळेपण प्रदिपच्या मनात प्रकर्षाने ठसत गेलं... शहरी वातावरणातली कंपू करून रहाणारी पोरं... त्यांचं पिकेटींग... सुनिता खाली मान घालून वावरायची. परिस्थितीला जिद्दिने तोंड देत अभ्यासाला वाहिलेला पदू... त्याचे संस्कार; पदू आपल्याला दुष्प्राप्य आहे हे सुनितानं पूर्ण ओळखलेलं... पण जन्माचा संगाती म्हणून अन्य कुणी पुरूष विशेषतः तिच्या धर्मीयातला... अभक्ष्य भक्षण करणारा... संस्कारहीन... छे छे! त्या पेक्षा मदर मेरी बनून कुवांरपण पत्करलं... तिने ठाम ठरवलेलं... पदू कडून विचारणा झाली तर जीजसची कृपाच म्हणायची... प्रायश्चित्त करून धर्मांतर करायची सुध्दा तिची मनःस्थिती...

अलिकडे पदूच्या वागण्यातलं वेगळेपण तीला जाणवायला लागलेलं... त्याचं पहाणं... हसणं... उशीर झाला तर त्याच्या चेहे-यावर दिसणारी नाराजी... ती जीजसला आळवायची...

'गॉड अल् माय टी... तुझ्या कृपेचा एक बिंदू दे मला... पदूला बुध्दी होऊ दे... तो पृच्छा करू दे बस्स... गणपती तिचं आराध्य दैवत... संकष्टीचे उपास सुध्दा तिने सुरू केले. पदूच्या वागण्यात सलगी वाढली पण थेट विचारायचा धीर त्याला होईना? आई काय म्हणेल? ती या धर्मबाह्य संबंधाला कदापिही मान्यता देणार नाही. किंबहुना आपले संबंध निरपेक्ष आहेत अशी खात्री तिला वाटतेय म्हणूनच तिचा विरोध नाही. पण गुह्य कळलं तर आपल्याला फसवल्याचा दोषरोप ती देईल याची भीती वाटायची त्याला! म्हणून कित्येक वेळा तोंडाशी आलेले शब्द तो ओठावाटे उच्चारणं टाळायचा.

बी.एस्सी.होऊन पदू केमीकल इंडस्ट्र मिध्ये नोकरीला लागला. सुनिता शिक्षिका म्हणून आचरा हायस्कूलमध्ये रूजू झाली. त्या वर्षी गणेश चतुर्थीला पदू चिंदरला घरी आलेला. चतुर्थीच्या दिवशी दुपारी जेवणे आटोपली अन् तासाभराने सुनिता आली. मग दोघं बोलत बोलत बाहेर पडली. नोकरीतल्या गमतीजमती सांगून झाल्या आणि अचानक पदू स्तब्ध झाला. “सुनिता तू हो म्हणशील असा विश्वास बाळगून एक विचारायचय् तुला... हो म्हणणार असं वचन दिलस तरच विचारतो नाहीतर माझं बोलणं माझ्या मनातच राहू दे... सांग देशील वचन?” ज्या क्षणाची सुनिता वाट पहात राहिलेली तो सोन्याचा क्षण जीजसने वर्तमान म्हणून तिच्या पुढे ठेवलेला. अंर्तबाह्य मोहरून सुनिता म्हणाली, “ दिलं वचन... खरंतर तू हे असं विचारशील या आशेवर जगतेय मी. सगळंच बोलून दाखवायचं नसतं... मी प्रायश्चित्त घेऊन धर्मांतर करीन... इतक्या वर्षांच्या साधनेनं मी मनानं ब्राह्मण झालेय्. . . फक्त तू पवित्र बंधनात बांधून मला पावन कर...”

रात्री पदूने आईजवळ विषय काढला. “आई, आधी

तुझी क्षमा मागतो. तुला ही गोष्ट स्पष्ट सांगायला सुध्दा मला कसतरी वाटतय... पण... आई... मी सुनिताशी लग्न करणारेय्" पदूचे शब्द ऐकून आईच्या पायाखालची वाळूच सरकली. पण आधी त्याला पुरते मनात काय आहे ते आकू दे असा भावार्थी विचार करून तिनं स्वतःला आवरलं अन् म्हटलं, "अस्सं... कधी ठरवलीत ही गोष्ट... अगदी कालपर्यंत माझ्यासमोर साळसूदपणी स्वच्छ वागण्याचं नाटक करीत आलात तुम्ही... गोष्ट या थराला कधी गेली? कुणी नेली? अभ्यासाच्या निमित्ताने ओसरी चढली अन् आता माझ्या टकल्यावर मि-या वाटणार म्हण की ही सुनिता... तू एक दुधखुळा असशील पण मी चार पावसाळे बघितले आहेत... दारूडया इतोरिनची किरीस्ताव पोर ब्राह्मणाचा उंबरा भ्रष्टावू पहातेय काय? मी बरी गप्प राहीन..." गर्भगळीत झालेल्या पदूनं आईच्या चरणावर मस्तक ठेवलं... " आई, गजाननाची शप्पथ घेऊन सांगतो... तू सुनिता बद्दल गैरसमज करून घेऊ नकोस... आई चूक माझी आहे."

आवंढा गिळून घशात आलेला हुंदका कष्टाने थोपवीत पदू पुढे बोलू लागला, "आई सुनिताची काहीच चूक नाही. मीच विचारलं... तुझ्याशप्पथ सांगतो आई... रत्नागिरीला कॉलेजात असतानाच मला तिच्या विषयी ओढ वाटायला लागली. पण त्यावेळी धारिष्टय नाही झालं... आणखी सुनिता सुध्दा एवढी संयमाने वागायची की, तिच्यासमोर प्रेम व्यक्त करायची मला भीतीच वाटायची. आई मी जग बघितलय्. . . सुनिता ख्रिश्चन आहे हे एक न्यून सोडलं तर नाव ठेवायला तरी जागा आहे का? तिचं वागणं - बोलणं... सगळे ब्राह्मणी संस्कार आत्मसात केलेयत् तिनं... तिचं चारित्र्य निष्कलंक आहे याची खात्री तू सुध्दा देशील... आई मी तिच्याशिवाय जगू शकणार नाही. आज धीर करून मी हा विषय तिला स्पष्टच विचारला... हे संबंध तुला

आवडणार नाहीत याची कल्पना आहे सुनिताला... पण... आई... सुनिता ख्रिश्चन धर्म सोडायला तयार आहे. हल्ली प्रायश्चित्त विधी करून अन्य धर्मीयांना हिंदू धर्मात घेतलं जातं... कायद्यानेही संमती दिलीय या गोष्टीला आणि आई... माझ्यासाठी घरदार - आईवडील हे पाश सुध्दा सोडायला तयार झालीय् सुनिता... आई आता नाही म्हणू नकोस..."

गोष्ट आपण समजत होतो तेवढी सोपी नाही. मामला हाताबाहेर गेला आहे हे आईने ओळखलं. तिने निग्रहाने डोळयातलं पाणी मागे परतवून खंबीरपणे शेवटचा घाव घालायचा अशा निग्रहानेच तोंड उघडलं... " पद्, ती बया तिसरीत असताना प्रथम ही ओसरी चढली तेव्हाच सावध व्हायला हवं होतं मी! पण माझंच चुकल... तू अकरावीत असताना तिचं येणं बंद करायचा विषय काढला होता आठवतं तुला... तू काय सांगितलं होतस त्यावेळी...? माझ्यासमोर मर्यादाशील वागण्याचं ढोंग करून शेवटी केसानं गळा कापायला निघालास काय रे चोरा? सणासुदीच्या दिवशी गणपती गजानन घरात असताना हे सुचल वाटतं तुला? म्हणे धर्मांतर करायला तयार आहे सुनिता... एवढा सोपा आणि सवंग आहे काय रे धर्म? कोणी कुठच्या भडभुंज्याने अन्य धर्मियांना शुध्द करून हिंदू धर्मात घेण्याच्या नावाखाली स्वतःची तुंबडी भरण्यासाठी हा प्रायश्चित्त विधी सुरू केला असेल... त्या सोकाजीला धर्म भ्रष्ट करायचा मक्ता कोणी दिला रे? म्हणे कायद्याची समंती आहे... मढयाच्या टाळवेवरचं लोणी खाणारं कॉंग्रेस सरकार... निवडणूकीच्या आदल्या दिवशी भाजी - पु-या वाटून, वाडी प्रमुख, गावप्रमुखांच्या तुंबडया भरून मतं विकत घेणारी पुढा-यांची औलाद, सत्तेला वेसवा बनवून दिल्लीत राजरोस बाजार मांडणारं सरकार! त्याने केलेल्या कायद्याना मी किंमत देत नाही.

वेदशास्त्र संपन्न घनपाठी ब्राह्मणाची मी मुलगी आहे... त्यांच्या प्रवचनातून धर्म म्हणजे काय ते पुरतं उमगलं आहे मला... स्वतःला हिंदू; त्यातही ब्राह्मण म्हणवून घेणारा तू पढतमूर्ख... डिग्री मिळवली म्हणजे गगनाला हातच टेकले जसे... कधीतरी आपण धर्मग्रंथ - पवित्र भगवद्गीता वाचावी तरी असं वाटलं का तुला?"

"किरीस्तावाची पोरगी... पण संयम तिने पाळला. तिने चळवलं नाही तुला तूच चळलास... आता एवढा चळलासच तर तू कां नाही किरीस्ताव होत... तू स्वीकार ख्रिश्चन धर्म... त्यांच्या धर्मात सोय आहे तशी... बापटांच्या सात पिढया जाऊ देत नरकात... पिंड घालायला कोणी नाही म्हणून राहू देत लटकत... तुला कसलं घेणं देणं आहे? तुझ्यासाठी ती धर्म सोडायला तयार झाली... तू तिला शुध्द करून हिंदू धर्मात घेणार आणि ब्राह्मण अर्पण करून पावन करणार... वाहवा रे वाहवा...! धर्म म्हणजे काय पोरखेळ वाटला होय रे तुला? हिंदू धर्म मिळण्यासाठी जन्ममरणाच्या फे-यातून चौ-यांशी लक्ष योनी पार कराव्या लागतात... तो जन्मानेच मिळवावा लागतो. अकलेचे तारे खूप तोडलेस तू... आता माझं ऐक. प्रेमाच्या वल्गना माझ्यापुढे तरी नको करू. क्षयग्रस्त नव-याशी निष्ठेनं संसार केला मी... आठ वर्ष सगळं अंथरूणातच होतं त्यांच... रात्रीच्या रात्री त्यांच्या उशाशी बसून जागुन काढल्यात मी... तुझं प्रेम हे प्रेम नव्हे... आकर्षण आहे ते... पोर ठसठशीत, देखणी, लाघवी आहे. तिच्या रूपाला भुललास तू... आता थांबव हे... सुनितापेक्षा दसपट चांगल्या मुली हेरल्यात मी... पितृपक्ष संपू दे मग सुरू करूया मोहीम आणि देऊया बार उडवून... सुनिताची समजून मी काढीन... इतःपर तिला भेटणं बोलणं बंद... समजलं?"

गौरीच्या आदल्या दिवशी पदू चोरून सुनिताला भेटला. आईचा नकार त्याने सांगितला. त्या बरोबर तो हे ही म्हणाला की,

“ आता गोष्ट हाताबाहेर गेली... मी तुझ्याकडे उच्चार केला तेव्हाच तु माझी झालीस. आईने परवानगी नाकारली तेव्हा पळून जाऊन लाग्न करणे हा एकच पर्याय. काळ हे सगळया वरचं औषध आहे. आई उद्या विरोध विसरेल. तू तिचं मन जिंकून घेशील याची मला खात्री वाटते.” दुस-या दिवशी पहाटेच्या गाडीने गणपती पुळयाला जाऊन गुपचुप लग्न करायचा बेत ठरला. पदू घरी येऊन साळसूदपणे झोपला. आई आवराआवर करून गणपती समोरच आडवी झाली. पहाटेचे पाच वाजले. पदू उठला. खोलीचं दार हळूच उगडायला लागला. दार उघडेना... मग खटखट केलं... छे... आईला हाका मारल्या... पण दार उगडल नाही.

पावणेसहाची वस्तीची गाडी वाजली तेव्हा आईने दार उघडलं. “पदू तुझी इथपर्यंत मजल जाईल असं वाटलं नव्हतं. परवा हा विषय झाला. तू त्यानंतर गप्पच आहेस. पण मी सावध आहे. काल तू बाहेर पडलास तेव्हा जानु घाडयाला तुझ्या पाळतीवर पाठवला होता मी. घरात देव आहे. त्याच्या समोर तरी आजचा प्रसंग मी टाळला. तू लहान नाहीस. मी तुला पदराखाली का ठेवणारेय्. काय कर आंघोळ पूजा करून गणेशाचं विर्सजन कर. मग माझ्या नावाने आंघोळ कर आणि माझ्या नावाने तुळशीत तीलांजली टाकून पड घराबाहेर. मी तुला मेल्ये नी तू मला...”

सुनिता ठरल्याप्रमाणे बसस्टॉपवर आलेली. पदू आला नाही. पण आलेल्या गाडीत बसून ती निघून गेली. तीने थेट वास्को गाठलं अन् ‘नन्’ ची दिक्षा घेऊन मेडिकल कॉलेजमध्ये रूजू झाली.

काळाच्या ओघात आई गेली. घराकडे तर पदू कित्येक वर्षात फिरकला नाही. सुनिता कुठे आहे, काय करते याची माहिती सुध्दा मिळवायचा प्रयत्न त्याने केला नाही. चार दिवसापूर्वी कंपनीच्या

कामासाठी कंपनीच्या गाडीतून येताना कोल्हापूरला शाहू पुतळयासमोर गाडीला टँकरने ठोकरलं... पुढे काय झालं कळलं नाही. पदूला जाग आली तेव्हा आपण सी.पी.आर.हॉस्पिटलमध्ये इंटेन्सिव्ह केअरमध्ये असल्याचं त्याला समजलं. सगळया टेस्ट झाल्या नशिबाने त्याला काहीच दुखापत झालेली नव्हती तरी कंपनीच्या डायरेक्टरनी त्याला चार दिवस ॲडमिट करून ठेवण्याचा फोन मेसेज दिला. आज त्याला डिस्‌चार्ज घेऊन न्यायला कंपनीची गाडी आली.

"सर डॉक्टरना बोलावू का? तुम्हाला बरं वाटत नाही का?" अरूणच्या प्रश्नाने भानावर येत प्रदिप म्हणाला... "नो ऽ नो... दॅटस् नॉट द मॅटर... चार दिवस इथे नाहक डांबून पडलो मी. मस्तपैकी बीअर मारूया" दोघे रूम बाहेर पडले. "सर फॉरमॅलिटी म्हणून फर्नांडिस मॅडमना भेटून मग निघूया का?" अरूणला हातानेच खूण करीत प्रदिप कॅरिडॉरमधून भराभरा बाहेर पडला. कंपनीच्या ए. सी. कार जवळ तो येताच कडक सॅल्यूट ठोकीत ड्र ायव्हरने बॅकडोअर उघडला. प्रदिप आत शिरणार एवढयात वॉर्डबॉय धावत आला. "बापट साहेबऽऽ फर्नांडिस मॅडम बलवत्यात..." बॅग सीटवर टाकून प्रदिप वॉर्डबॉयच्या मागून निघाला.

केबिनचं दार उघडून तो आत शिरला. "प्रदीप... मी तुला दोष नाही देणार... धर्म जन्मानेच बदलता येतो हे उशिरा समजलं मला. पण आपलं नातं... ते इतकं तकलादू आहे का रे? सात फेरेही न फिरता आपण एकनिष्ठ राहिलो. आता संध्याछाया दिसायला लागल्या. निमित्तमात्रही एकमेकांशी बोलणं, भेटणं यात माझ्या दृष्टीने तरी काही गैर नाही... कितीही झालं तरी मी स्त्री आहे... मी नाही तुझ्या इतकी निष्ठुर होऊ शकत..." सुनिताने चष्मा काढून डोळे टिपले. "सुनिता... तू अशी भावविवश होशील याची खात्री होती मला म्हणूनच तुला टाकून

परभारे निघालो मी... अन् तेच योग्य आहे. हा आरंभ आहे सुनिता... जन्म मरणाच्या फे-यातून आपण पुन्हा भेटू... माझी खात्री आहे... या जन्मीची साधना पुढच्या जन्मी... त्याच्या पुढच्या जन्मी कधीतरी नक्की फळाला येईल... या नात्याला सहधर्माचं कोंदण जडेल... आपण वाट पाहूया तोपर्यंत... त्या क्षणाची!"

**000000000000000**

# २.शुभ मंगल 'सावधान'

निरवडे हायस्कूलमध्ये गांगण बाई हजर झाल्या आणि शाळेचे जसं नंदनवनच झालं. हेमामालिनी-रेखा अशा सिनेनट्यांइतकी नसेल पण गांगण बाई बघितल्यावर त्याच नट्यांची आठवण व्हावी इतपत नक्की वाटायची. अगदी नावापासुन तो केशभूषा- वेशभूषा बोलणे मोकळीपणे वागण हे ' मास्तरीण ' या बिरूदाला न शोभणारी ! मास्तरीण म्हणजे काळी ढुस्स, दात पुढे किंवा विरळ तरी ..... कुंदकळ्या वगैरे असल्याच तरी त्या कुणाला न दिसाव्यात या बेतानं हसणारी (?) कुणाकडेही बघताना लेट आलेल्या-गृहपाठ चुकवणाऱ्या - उत्तरं न देणाऱ्या मुलाकडे पहाव अशी नजर असणारी, लपेटून घट्ट पदर घेणारी, मुळाकडे मुटकाभर जाड आणि टोकाकडे विरळ होत जाणाऱ्या केसांची उंदराच्या शेपटी सारखी निमुळती आणि तेवढीच लांब घट्ट वेणी (एक किंवा दोन वेण्या) घालून टोकाला रिबनचं फुल करुन रीबनची वितभर लांब टोक सोडणारी अशीच असल्या काळातली ही गोष्ट.

गांगण बाईंचं नावही मास्तरणीला न शोभणारं.... मधुरा गांगण हे नाव उच्चारतानाच वीणेचे सूर झणकारल्यासारखं वाटायचं.... म्हणून शाळेतल्या हेडमास्तरांपासून शिपाया पर्यंत अगदी पोरंसुध्दा हौसेने त्यांचा उल्लेख मधुरा मॅडम असाच करायचे. भुवया कोरुन खरं म्हणजे कपाळपट्टी भकास दिसते. पण गांगण मॅडमना कोरलेल्या भुवयाच खुलून दिसायच्या. त्या जवळून गेल्या की इव्हिनिंग इन पॅरीसचा मोहक गंध यायचा. पोरं म्हणायची 'आमच्यो मधुरा गांगण मॅडम लय मस्त नाय? जवळ इल्यो की असो परमळ येताऽना.... माका लय आवडता....' हे मत फक्त पोरांचच नव्हतं. स्टाफवरच्या झाडून साऱ्या मास्तराना पण असच वाटायचं. अगदी रिटायरमेंट ७/८ वर्षावर आलेले,

टक्कल पडलेले, कानामागच्या केसातून चंदेरी वर्ख दिसणारे, दाढा पडल्यामुळे गालफडं खपाट झालेले मोरबाळे सर सुध्दा म्हणायचे, ‘‘मधुरा गांगण मॅडम जवळ आल्या की रातराणी फुलल्यागत वाटतं....’’ मग स्टाफवरचे भेंकी सर म्हणायचे खरंय् ते ‘म्हातारपणी निद्रानाश जडल्यामूळे तुमच्या सारख्यांना आणि झोप हरवलेल्या आमच्या सारख्या तरुणांना रातराणीच आठवते मधुरा मॅडम जवळ आल्या की ....’’

गांगण मॅडम मूळच्या उत्तर रत्नागिरीच्या असल्या तरी त्यांचे वडिल पुण्याला स्थाईक झालेले. निरवडयाला येईपर्यंत मॅडमच आयुष्य पुण्यातच गेलेलं. शहरी वातावरणात राहिल्यामुळे कायम टीपटॉप रहायची त्यांना सवय.... पण इतक व्यवस्थित रहायच असतं, रहाता येतं याची गंधवार्ताही निरवडेकरांना नसल्यामुळे गांगण मॅडम अप्रूप वाटायच. मॅडम बी.ए.झाल्या, मग वडिलांच्या ओळखीमुळे गव्हर्नमेंट बी.एड्. कॉलेजमधेच फी न भरता ॲडमिशन मिळाली म्हणून बी.एड्.सुध्दा झाल्या लौकर लग्न करुन उरावरच ओझ दूर करायच ही शहरातल्या पालकांची वृत्तीच नसते. स्त्री मुक्तीचं वगैरे वारं लागल्यानं मॅडमनाही आणखी १/२ वर्षतरी लग्न टाळायच असल्यामुळे नोकरी अन् ती सुध्दा हायस्कुल मध्ये हाच एकमेव पर्याय उरलेला .

पुण्यातल्या शाळांमध्ये व्हेकन्सी होण्यापूर्वी वेटिंगला असंख्य उमेदवार. विविध उच्चपदस्थांच्या बायका चैनीसाठी पैसा हवा म्हणून आणि भरपूर सुट्या नी चांगला पगार मिळवून देणारं प्रोफेशन म्हणून शिक्षकांच्या पोस्टींगवर डोळा ठेऊन मॅडमच्या वडिलांनी आपल सगळं वजन खर्च केलं पण ५/६ ठिकाणी इंटरव्ह्यू देऊन नकार घंटा आल्यावर मॅडम अन् त्यांचे वडिल दोघेही हैराण झालेले. न.म.वि. मधल्या रिकाम्या जागेवर वर्णी लावण्यासाठी मधुरा गांगण तिथल्या सुपर वायझर पाटणकर मॅडमना भेटायला गेली. मधुरा सहावीत असताना न्यू इंग्लिश स्कूल मध्ये पाटणकर मॅडम मराठी शिकवायच्या. पुढे त्याना

घराजवळच्याच नू.म.वि.त जॉब मिळाला अन् त्या सोडून गेल्या. आपल काम नक्की होणार या खुशीतच मधुरा पाटणकर मॅडमना भेटली.
पाटणकर मॅडमनी दार उघडल्या-उघडल्या आत शिरुन त्याना वाकून नमस्कार करीत मधुरा म्हणाली. ''मॅडम ओळखलंत का ?'' थोडावेळ विचार केल्यावर मॅडम म्हणाल्या, ''नाव नाही आठवत.... पण तू.... न्यू इंग्लिश हायस्कूल मध्ये असलेली चिमणी ना तू ?'' ''मॅडम कम्माल आहे हं तुमची.... अगदी अचूक ओळखलंत मला....'' मधुरा उत्तरली. ''चिमणीच म्हणायचात तुम्ही मला.'' त्यावर मॅडम म्हणाला, ''तसंच काही नाही हं.... सगळयाच लहान पोरीना मी चिमण्यानो असं म्हणते.... बर ते जाऊ दे... आज कशी काय आलीस ?'' त्यावर पेढ्यांचा पुढा पुढे करीत मधुरा म्हणाली. ''मॅडम, मी बी.एड्. झाले. आता तुमचा आदर्श ठेवून शिक्षिका व्हायचय् मला म्हणून मुद्दाम तुमचे अशीर्वाद घ्यायला आले.''

पाटणकर मॅडमनी मधुराचा हेतू ओळखला. चारच दिवसांपूर्वी मराठीच्या पोस्ट साठी नू.म.वि.ची जाहिरात प्रसिध्द झालेली. मधुरा बी.एड्.पास झाल्याचे पेढे द्यायला आलेली नसून नोकरीसाठी गळ घालायला आली हे त्यांनी ओळखलं. ''हे बघ, चिमणे.... काय तुझं नाव म्हणालीस ते हं.... मधुरा. आशीर्वाद देते तुला. पण आमच्या शाळेतल्या पोस्टसाठी मी शब्द टाकावा अशी गळ घालणार असशील तर ते मात्र नाही जमायचं.... डायरेक्टर ऑफ एज्यूकेशनचे पी.ए. कुंटे... माहिती आहेत ना ? त्यानी आपल्या बायकोसाठी संस्थेवर प्रेशर आणलंय्.... जाहिरात हा नुसता फास.... मिसेस कुंट्यांच अगदी फिक्स आहे झालेल. तुझ्या मेथडस् कोणत्या आहेत वा? म्हणजे इथे नाही जमलं तरी ओळखीत कुठे चान्स मिळाला तर तुझ्यासाठी नक्की शब्द टाकेन मी.'' मधुरा खट्टू झाली पण वरकरणी तसं न दाखवता अघळ-पघळ गप्पा मारुन ती उठून गेली.

पाटणकर बाईंची भेट मधुरा जवळ जवळ विसरलेलीच कारण त्या गोष्टीला आता दीड-पावणेदोन महिने होऊन गेले. संध्याकाळी पर्वतीकडे फिरायला जाताना अचानकपणे पाटणकर मॅडम समोर आल्य.... ‘‘अगं मधुरा बरं झाल भेटलीस ते.... तुला निरोप द्यायचाच विचार करीत होते मी.... माझे मिस्टर रत्नागिरीला एज्यूकेशन ऑफिसमध्ये डेप्युटी ई.ओ.या पोस्टवर आहेत. त्यांचे एक हेडमास्तर मित्र आहेत.... निरवडे म्हणून एक गाव आहे अगदी हायवेवर.... त्यांना मराठी स्पेशल मेथड असणारा शिक्षक पाहिजे. बघ बाई, पुण्यापासून जरा लांब असलं तरी गाव चांगलंय्.... हेडमास्तर ह्यांचे मित्र! तुझं चांगलं जमेल.... मला विचारशील तर तुला नोकरी करायची असेल तर पुढच्या दहा वर्षात तरी पुण्यात तुला चान्स मिळणं कठिण.... जातेस का कोकणात?’’

मधुरा वडिलांसोबत रत्नागिरीला एज्यूकेशन ऑफिसमध्ये पाटणकर साहेबानाच थेट भेटली. पाटणकर मॅडम फोनवर बोलल्या होत्या अन् चिठ्ठी सुध्दा दिली त्यानी.... साहेबानी त्यांचं दिलखुलास स्वागत तर केलचं पण ऑफिसची जीप घेऊन ते समक्ष निरवड्यापर्यंत आले. हायवेवरचं गाव, हिरवी गर्द वनराई आणि शाळेची सुंदर इमारत वगैरे बघून मधुरा चांगलीच इंप्रेस झाली. थेट डेप्युटी इ.ओ.शी संपर्क, हेडमास्तर लिमये यांचं सालस, सात्विक व्यक्तिमत्व यामूळे मधुराचे वडिलही निर्धास्त झाले. अन् मधुरा गांगण निरवडे हायस्कूलमध्ये हजर झाल्या.

मधुराचं आगमन  असं ग्लॅमरस पार्श्वभूमीवर झालेलं. तिचं शहरी रहाणं आणि बऱ्यापैकी रुप यामूळे ती सगळयांच्या कौतुकाचा विषय झालेली. निरवडे हायस्कूल तसं बऱ्यापैकी मोठं.... अठरा शिक्षकांचा स्टाफ.... स्टाफमधली तीन जुनाट खोडं आणि चार मध्यम वयातली शिक्षक मंडळी सोडली तर निम्मेहून जास्त लोक

उमेदवार - ‘उपवर’ या कॅटेगिरीतले. त्यातही फर्नांडीस, मुलाणी आणि कॅटेगरीचे झावळे, गंगावणे, तांबट, सनगर वगळता उर्वरीत म्हणजे गवळी, मगदूम, भोसले, दरेकर आणि सावंत हे शिक्षक सावज टेहळीत असलेले. मधुरा गांगण मॅडम मराठा समाजाच्या नाहीत हे कळल्यावर म्हणजे त्या हजर झाल्यानंतर आठवडाभरातच.... सावंतानी त्यांचा फंद सोडला. पण उर्वरीत प्रेमवीरांनी मात्र जंग सुरु केलं.

मधल्या सुटीत स्टाफ रुममध्ये चहापान रंगलेलं.... गांगण मॅडमना पुढचा तास ऑफ आहे असा चांगला मोका गाठीत मगदूम सर सरसावले. ‘‘मधुरा मॅडम.... तुम्ही मराठीच्या म्हंजे तुमास्नी काव्य आवडत आसेलच की.... न्हाई म्हंजे बायकास्नी कवितेच वावड आस्तं असं म्हंतात म्हनून म्हनल हो ’’ यावर भुवया उंचावीत ओठांचा चंबू करीत मधुरा मॅडम उत्तरल्या.... ‘‘काय हो मगदूम सर.... कसलं गावरान बोलता तुम्ही अन् अशुध्द तर कीती.... दोन साध्या वाक्यात दहा चुका केल्यात तुम्ही.... आणि बायकांना कवितेचं वावडं असतं असं म्हणणं ही अकरावी चूक.... काव्य म्हणजे मराठी साहित्याला ललमभूत झालेलं शब्द लेणं.... काव्य न आवडणं म्हणजे शुद्ध अरसिकपणा.... मी एवढी अरसिक असेन अस वाटलं तरी कसं तुम्हाला?’’

मॅडमनी बोलायला सुरुवात केली म्हणजे त्यांची मधाळ वाणी ऐकण्यासाठी सगळेच कान तत्पर असायचे तसे ते या वेळीही होते. मगदूमसरांची मधुराशी सलगी कल्पनेतही सहन न करणारे स्टाफवरच्या जुन्या खोडांपैकी एक पोईपकर सर पुढे सरसावत म्हणाले, ‘‘मधुरा मॅडम, सावध व्हा.... सावध व्हा.... मगदूमसरांच्या फासातून सुटायच असेल तर अरसिक अहात असंच कबूल करा.... अहो तुम्हाला माहिती नाहीय्- मगदूमसर कवी आहेत... नेहमी नवीन सावजं शोधीत असतात....’’ त्यावर मधुरा मॅडम गोड हसत म्हणाल्या, ‘‘असं का? खरंच कवी आहेत का मगदूम सर? मला माहितच नव्हतं....’’



पोईपकर सरांकडे जळजळीत कटाक्ष टाकीत विजयी मुद्रेने बॅगमधली कवितांची वही काढून मगदूम पुढे सरसावले. मॅडमच्या प्रतिसादाची वाट न पाहताच त्यांनी कविता वाचायला सुरुवात केली सुद्धा. कविता वाचल्यावर त्यांनी साभिप्राय मॅडमकडे बघितलं. पुढची २०-२५ मिनिटं दोघांची काव्य चर्चा चांगलीच रंगली. मगदूमांच्या एका कवितेच्या बदल्यात स्वतःच्या सहा कविता मॅडमनी ऐकवल्या. गवळी, भोसले, दरेकर त्रयीं पैकी दरेकरांना ८अ वर तास असल्यामूळे त्यांना नाईलाजाने मैफिलीतून उठावं लागलं. पण इतरांनी मात्र त्या संधीचा फायदा घेऊन मॅडमच्या कवितांचं तोंडभर कौतुक करुन

त्यांच्याशी चांगलीच जवळीक प्रस्थापित केली.

हळूहळू मधुरा मॅडम आणि चार प्रेमवीर यांचा एक वेगळाच ग्रूप फॉर्म झाला. फुलं, पेनं, वेगवेगळी रायटिंग पॅडस् अशी प्रेझेंटस्ची बरसात मधुरा मॅडमवर व्हायला लागली. चौघांचीही एक छुपी स्पर्धा सुरु झाली. मधुराच्या वागण्यावरुन कुणालाच अंदाज करता येत नसे. पण प्रति स्पर्ध्यावर मात करुन आपली वर्णी कशी लागेल?याचीच योजना चौघांच्याही मनात सुरु असायची. त्यातूनच गवळी सरनी बॅडमिंग्टनचं प्यादं काढलं. मधुरासाठी रॅकेट त्यानीच खरेदी करुन आणली. मग सकाळ संध्याकाळ बॅडमिंग्टन सुरु झालं. साडी नेसून कसं खेळणार.... खेळासाठी पंजाबी ड्रेस हवा आणि तो पांढराच हवा अशी अपेक्षा मधुरा मॅडमनी व्यक्त केली अन् दुसऱ्याच दिवशी सी.एल्. टाकून भोसलेंनी कोल्हापूर गाठलं स्वतःसाठी रॅकेट, ट्रॅक सूट, मधुरासाठी व्हाईट पंजाबी खरेदी करुन तिसऱ्या दिवशी सकाळीच भोसले रॅकेट फिरवीत बॅडमिंग्टन कोर्टवर हजर. कवी मगदूमसर आणि दरेकर यांचीही बॅडमिंटन कोर्टवर हजेरी लागू लागली. मग डबल्समध्ये एकदा मगदूम, एकदा गवळी, एकदा दरेकर, एकदा भोसले अशी चौघानाही मधुरा मॅडम आळीपाळीने कंपनी द्यायच्या.

ईव्हिनींग वॉकची कल्पना म्हणजे खरं तर ज्येष्ठ मेंबर पणशीकर सरांची. पण पणशीकर दुसऱ्या दिवशी फिरायला बाहेर पडले तर चारही प्रेमवीर हजर! डिसेंबर उजाडला आणि गॅदरिंगचे वारे वाहू लागले. कुणी तरी स्टाफ मेंबरनं नाटकाचं पिल्लू सोडलं. तुझे आहे तुजपाशी या नाटकाची निश्चिती झाली. पात्रं ठरली.... म्हणजे सतीश आणि शाम या दोन पात्रांसाठी खरी स्पर्धा.... त्यातही सतीश आणि उषा ही जोडी स्टाफवरच्याच मिस्टर मिसेस जैतापकर यांनी करायचं ठरल्यावर गीता साठी मधुरा मॅडम आणि गीताचा प्रियकर 'शाम' च्या भूमिकेसाठी चारही प्रेमवीरांची चढाओढ होणार असं चित्र दिसायला लागलं. गवळीसर

पी.टी. टीचर! शामचे संवाद पाठ करणं आपल्या कुवती बाहेर आहे हे ओळखून त्यानी वेळीच माघार घेतली. रहाता राहिले दरेकर, मगदूम, भोसले! पैकी मगदूम सरांचा आवाज जरा किनरा.... नाटकाचं डायरेक्शन करणारे पोईपकर! त्यांनी सरळ हल्लाबोल करून मगदूमाना कटाप केलं.

भोसले, दरेकर कोणीच मागे हटायला तयार होईना.... मग प्रत्यक्ष तालमीच्यावेळी ज्याचं काम चांगले असेल त्याची निवड हेडमास्तर लिमये सरानींच करायची. ते देतील तो निर्णय! यावर एकमत झालं. निर्णयाचा दिवस उजाडला. जो आधी सुरुवात करतो तो रेस जिंकतो. हे सूत्र अवलंबून भोसले पुढे सरसावले. दहा मिनिटांचा प्रवेश पार पडला. मग पाळी आली दरेकरांची. दरेकरांनी इरेला पडून तयारी केलेली. पोईपकरांकडे खेटे घालून अभिनयाचे धडे घेतलेले. त्यांनी बाजी जिंकली. सर्वांनीच शामच्या भूमिकेसाठी दरेरकरांनाच 'फिट' सर्टीफीकेट बहाल केलं.

नाटकाच्या तालमी रंगात आल्या. एरवी स्टाफचं नाटक म्हणजे तालमीच्या नावाने बोंब. आज एक आहे तर उद्या दुसरा नाही. पण मधुरा गांगण हे आकर्षणच असं जबरदस्त की मंडळी वेळच्या वेळी तालमीना हजर राहायची. संध्याकाळी शाळा सुटल्यावर रात्री नऊ नऊ वाजेपर्यंत तालमी चालायच्या साहजिकच बॅडमिंटन, इव्हिनींग वॉक बंदच पडले. भोसले, मगदूम, गवळी त्रयीनी तालमीच्या वेळी रेंगाळून पाहिले. तालमी सुरु असताना काही टिप्स देऊन जवळीक साधायचा प्रयत्न केला. पण हा 'वार' फसला. भोसलेनी अशी टीप मधुराला दिली मात्र.... डायरेक्टर पोईपकर असे खवळले.... "नाटाक कशाशी खातंत ता तुका कळता काय रे?" अस्सल कोकणीत पोईपकर गरजले. 'मी चोर आहे मी भजी खाल्ली.... ह्या वाक्य म्हणजे बेअरींगचा असा! ह्या वाक्याक त्वांड हातानी झाकल्यावर चेहऱ्यावरच्ये एक्स्प्रेशन कशे दिसतले....

अगदी खुळे कशे तुम्ही भोसले सर?”

“मधुरा मॅडम म्हंजे वाटलं काय तुम्हाला.... अगदी सुरुवातीच्या तालमीलाच या वाक्याला अशी एक्स्प्रेशन्स दिली मॅडमनी की बस्स रे बस्स.... भोसले सर मॅडमचं काम वठू नये म्हणून तर तुम्ही चुकीची सूचना देत नाहीना? की तुमची निवड झाली नाही म्हणून पोटशूळ उठला तुमचा?” दरेकरांनी खडसावलं, भोसले बिचारा चितपट.... या प्रंसगामूळे अन् दरेकरनी केलेल्या भाष्यामुळे मधुरा मॅडमचंही मत फिरलं. दुसऱ्या दिवसापासून मधुरा मॅडम तिघांशीही फटकून वागायला लागली. त्याना जळवण्यासाठी दरेकरांशी जास्त सलगी जाणीवपूर्वक करायला लागली. आता तिन्ही प्रेमवीर सूड उगवायचे बेत करु लागले.

शाळेच्या स्वच्छता गृहात भिंत रंगली, “दरेकर मधुरा पटला सौदा” शाळाभर चर्चा झाली. दरेकर रागाने लाल झाला. ‘आमचे संबंध स्वच्छ असताना असले कुजके विचार ज्याना सुचतात त्यांच्या भेजात सडके कांदे बटाटे भरलेले असणार..... ’ गवळी, मगदूम, भोसले त्रयीकडे कटाक्ष टाकीत त्यानी रिमार्क मारला. मगदूम, भोसले गप्प बसले. पण गवळी पी.टी.चा मास्तर! त्यात हौद्यात पट काढलेला! गुडघ्यात मेंदू असणारा तो रांगडा पैलवान गडी अनवधानाने बोलून गेला, “आता वाईच घसट व्हाय लागल्यावर लोकांच्या नदरंला कां येऊ न्हाई? गावभर चर्चा करतेत की समदं” दरेकर अस्तन्या वर करीत सरसावला.... “काय रे गवळ्या... दूधात पाणी तशी सगळयातच भेसळ करतोयस् काय रे चोरा?”

गोष्ट मुद्यावरुन गुद्यावर यायची वेळ आलेली पण नेमके त्याचवेळी लिमयेसर स्टाफ मध्ये प्रवेश करते झाले आणि प्रकरण थंडावलं! थंडावलं म्हणजे स्टाफमध्ये पानीपत रंगलं नाही इतकंच .... मधुराचा पतंग दरेकराने काटल्यात जमा! याची खुणगाठ पटून भोसले, मगदूम,

गवळी तिघेही आपापसातलं वैर विसरुन लांडग्यांसारखे एक झाले. दरेकर खेडचे.... मधुरा दरेकर प्रकरणाला कोकणी घाटी रंग आला. स्टाफवरच्या काही जेष्ठ शिक्षक मंडळीनीच पुढच्या दोन तीन तासात काय काय फुणग्या सोडून तिघांना भडकवून दिले. दरेकराला हिसका दाखवायचा! मधुराच्या हजेरीत... तिच्या साक्षीनं दाखयावचा !! यावर तिघांच एकमत झालं आणि तशी योजनाही ठरली.

संध्याकाळी शाळा सुटली. चहा पाणी झालं नी तालीम सुरु झाली. ऑफिसचं काम उरकून लिमये सर घराकडे निघाले. रोजच्याप्रमाणे घवाळी कारकून सरांबरोबर जायला निघाला. दुपारचं प्रकरण आणि मगदूम त्रयीचे बेत त्याने सरांच्या कानावर घातले. मुख्याध्यापक पदावर काम करुन अशी किती प्रकरणं बघितलेल आणि तडीला लावलेले लिमये सर चारही प्रेमवीरांचे कारनामे ते निरिच्छवृत्तीने पहात होते. या प्रकरणात कुणीतरी एकाची सरशी किंवा चौघांच्याही हातावर तुरी देऊन मधुरा त्याना पुणेरी मिसळ चाखवणार असा त्यांचा शेरा. चारही माणसं कामात तर हयगय करीत नव्हते. मधुरा स्टाफवर आल्यापासून शिक्षणाधिकारी कार्यालयातली कामं चुटकी सरशी व्हायला लागलेली. ही जादूची अंगठी शाळेत राहिली तर बरंच झालं की! एवढीच त्यांची अपेक्षा.

घवाळीनी सांगितलेला प्रकार ऐकल्यावर लिमयेसर सिरियस झाले. या प्रकरणाचा आपल्या पद्धतीने निपटारा करायची अंमलबजावणी करुन ते वाट पहात राहिले. रात्री तालमी संपल्या. मंडळी बाहेर पडली. रोजच्या शिरस्त्याप्रमाणे दरेकर मॅडमना रुमपर्यंत पोहोचवायला गेले. मॅडमच्या रुमची वाट गावकर वाडीतून जायची. दोघंही गप्पा मारीत निघाली. गावकरवाडी संपली की पुढे थोडा निर्मनुष्य रस्ता आणि पाच मिनीटांच्या अंतरावर मॅडमची रुम. मोक्याच्या जागी मगदूम, गवळी, भोसले त्रयी तयारीत राहिलेले. मधुरा–दरेकर सर गप्पा

मारीत तिथपर्यंत आले आणि गवळीसर दंड थोपटीत पुढे झाले. ‘‘काय रे, दरेकरा कस्तान्या.... दूद पान्याची भेसळ काडतोस काय माजी? तुला दुदाचा भाव आत्ता दाकीवतो म्या....’’ गवळ्यांचा गुद्दा शिताकीने चुकवून दरेकरानी त्याच्या मानेवर उजव्या हाताचा असा चॉप लगावला की गडी भेलकांडत आडवा.... अवाक् झालेल्या मधुरा मॅडमला किंचाळणं ही सुचलं नाही.



गवळी आडवा झालेला बघताच हातातले दंडुके सरसावीत मगदूम-भोसले पुढे धावले त्याच वेळी, बाजूला दडून राहिलेले गावकरवाडीतले पोरगे बॅटऱ्या झळकवीत पुढे आले. भोसल्यांचा एक

फटका दरेकरांनी खाल्ला.... बस्स.... गावकरवाडीतल्या पोरानी दोघानाही पकडून त्यांच्या हातातले दंडुके काढून घेतले. मधुरा मॅडम भान हरपून किंचाळल्या.... त्यांचं ओरडणं ऐकून गावकर वाडीतली जाणती मंडळी, बाया कंदिल-बॅटऱ्या घेऊन धावले. मगदूम, भोसले, गवळी त्रयीची शिस्तीत गचांडी धरुन झाला प्रकार हेडमास्तरांच्या कानावर घालण्यासाठी जाणते पळत सुटले. भोसल्यांच्या दंडुक्याचा फटका बसून दरेकरांच्या डाव्या मनगटाचे हाड मोडले.

मधुरा मॅडम प्रकरणाची अखेर लिमयेसरांच्या अपेक्षे प्रमाणेच झाली. मगदूम, भोसले, गवळी त्रयीना हेमगर्भाचा वळसा दिल्यावर त्यानी माना खाली घालून सरांचे पाय धरले अन् प्रकरणावर पडला.हाताला प्लॅस्टर असलेल्या स्थितीतही दरेकरांनी नाटकातली भूमिका पार पाडली. नाटक झालं आणि दुसऱ्या दिवशी लिमयेसरांनी मधुरा मॅडमना
केबिनमध्ये बोलावून प्रकरणाचा उपोद्‌ घात केला. मधुरा गांगणच्या मनात खरंतर दरेकर सरांविषयी ‘तसं’ काही नव्हतं. पण झाल्या प्रकारात तिच्यामुळे त्या बिचाऱ्याना निष्कारण त्रास भोगावा लागला म्हणून अन् सरांचा शब्द पाळायचा म्हणून मधुरा मॅडमनी होकार दिला. दरेकर गांगण यांचं शुभ मंगल ‘सावधान’ झालं अन् जादूची अंगठी लिमयेसरांच्या शाळेतच राहिली.

O O O O O O O O O O

# ३. यक्सप्लॉईट

डॉ.बोंडल्यांच्याकेबिनमध्ये त्यांच्याच रिव्हॉल्हिंग चेअरमध्ये बसून एल्.एम्.सी. चेअरमन बाळासाहेब भिंगरेपाटील शीत पेयाचे घुटके घेत आपल्या चाबरट मित्रांशी गप्पाष्टकात गुंतलेले. बाळासाहेबांचा हा आगाऊपणा गिळून कडवट चेहरा करीत आपला आब सांभाळू पहाणारे प्राचार्य डॉ. बोंडले अन् चेअरमनची ही बैदा दोन दिवस चैनी करीत तळ ठोकून रहायची म्हंजे गेला बाजार खाण्यापिण्याची १0 | १२ हजारांची फोडणी...... ही रक्कम कुठे कशी जिरवायची या विचारात चितागती झालेले व्हा. प्रिन्सिपॉल वष्ट सर! नेमका हाच मोका साधून केबिनचा दरवाजा धाडक्न लोटीत परवानगी सुध्दा न मागता आपल्या नावाला शोभेल अशा कडाडत भोसले मॅडम आत घुसल्या. ग्राउंडवर पेंडॉलमध्ये रणरणत्या उन्हात दोन अडीच तास अनाउन्समेंट करून त्या पुरत्या हैराण झालेल्या......लालबुंद नाकाचा शेंडा उडवीत भरल्या डोळयांनी उभ्या राहीलेल्या...भुरूभुरू उडणारे त्यांचे केस, अस्ताव्यस्त पदर अन् नजरेत भरण्याजोगं टंच रूप... तोंडाचा ग्लास बाजूला करून बाळासाहेब भिंगरे बघतच राहीले.

"सर ऽऽ नामगुडे सरानी मला एक्सप्लॉईट केलं! भर ग्राउंडवर मुलांच्या देखत कसलाही मुलाहीजा न बाळगता ही डेअर्ड टु एक्सप्लॉईट मी......" प्रा.(कु.) बिजली भोसले मॅडमच्या घशात हुंदका दाटून आला अन् त्यांच्याने पुढे बोलवेना. प्राचार्य डॉ. बोंडले म्हणजे आमदार भिंगरे पाटलांच्या तालावर नाचणारं कळसुत्री बाहुलं...

संत निळोबा शिक्षण संस्था साटेली भिंगरे पाटलांच्या कबजात आली त्या वेळी सर्वप्रथम रिझर्व कॅटॉगिरीचं कारण पुढे करून त्यानी आपला पित्त्या प्राचार्य पदावर नेमला. आमदारपुत्र बाळासाहेब कोकणातल्या या संस्थेचे नियामन करायचे. महीन्या दोन महीन्यानी एकदा रूकडीवरून ते मुद्दाम साटेलीपर्यंत दौरा करायचे.कॉलेजची व्हिजीट आणि साटेली वरून १0 | १२ कि. मी. अंतरावर असलेल्या गोव्यात मौजमजा करून ते माघारी जायचे.

माध्यमिक शाळा, तंत्रशिक्षण वर्ग, डी.एड्. आणि आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेज असा संत निळोबा शिक्षण संस्थेचा पसारा.कोकण गांधी अप्पासाहेब पटवर्धन ह्यांचे उजवे हात साटेलीचे बाप्पा राऊत! त्यानी मोठा ध्येयवाद उराशी बाळगून संस्थेचा डोलारा उभारला.त्यांच्यामागे संस्था पदाधिका-यांची खांदेपालट होत होत मुंबई मंडळाच्या ताब्यात संस्था गेली अन् पुरता बो-या वाजला. यच्चयावत सगळे मेंबर्स मुंबईत वास्तव्य करणारे, स्थानिक कार्यकर्त्यांची फळी नामषेश करून त्यानी संस्था पुरी कब्जात घेतली. मिटींगांसाठी स्पेशल गाडया करून मंबई साटेली फे-या......... सगळे रिपोर्टस् मुंबईला पाठवायचे...... टाचणीची खरेदीसुध्दा मॅनेजमेंट करणार ...... सांगोवांगी तक्रारी वरून कर्मचा-यांना मेमो द्यायचे. चार्जशीट भरून इनक्वाय-या लावायच्या असले वादंग सुरू झाले. कर्मचाऱ्यांच्या तक्रारींची खेकटी सुरू झाली.

पाच सहा वर्षे पेपरमधून संस्था गाजत राहीली. ज्याला जसे जमेल तसे खाउन संस्था कोरम झाली. कर्मचा-यांनी बुक्टू, फूक्टू संघटनांशी संधान बांधून संस्थेला जेरिला आणले.स्थानिकांचा जोर वाढत जाउन प्रकरण हाताबहेर जाण्याची वेळ आली मग

मॅनेजमेंटच्या लोकांनी ब्रिटीशांची नीती वापरली. रूकडीच्या आमदार अण्णा भिंगरेना संस्था चाळीस लाख रूपयांना चक्क विकली. अण्णा राजकारणात पक्के मुरलेले. संस्थेचा परिसर व्यावसायिक कोर्सेस सुरू करून गडगंज पैसा ओढायला अनुकुल. कोकण गोवा सीमेवरचा साटेली हा मोक्याचा स्पॉट आणि एकक्षेत्री सत्तर एकरांचा प्लॉट......अवघ्या चाळीस लाखामध्ये भिंग-यांनी घशाखाली घातला.

भिंगऱ्याच्या हाती संस्था आली अन् एक एक विवाद त्यानी चुटकीसरशी मिटवायला सुरूवात केली. साम -दाम- दंड-भेद जमेल ती नीती अवलंबून परिस्थिती कब्जात आणली. प्रा. सावंताना पनवेलच्या प्राचार्य पदाचे गाजर दाखवून दूर केले. प्रा. साटम, प्रा. दळवी, प्रा. भुर्के, प्रा. राटवड अशी स्थानिक मंडळी बाजूला करून आपले वर्चस्व प्रस्थापित केले. एका बाजूने विरोधी निपटीत असताना नवीन वसतीगृह बांधकाम, वर्गखोल्यांचे नूतनीकरण, अत्याधुनिक साधनसामुग्रीची खरेदी असा सपाटा सुरू करून परिसरातील जनतेला त्यानी दिपवून टाकले. पूर्वीच्या मॅनेजमेंटची एकधिकारशाही कर्मचारी वर्गाच्या तक्रारी यांना कंटाळलेले विद्यार्थी पालक यांचा चष्मा बदलला. मॅनेजमेंटची खांदेपालट झाली पण संस्था नावारूपाला येणार अशी उमेद सर्वांना आली. प्रा. राटवडना संस्थेने निलंबीत केले. त्यानी कंठशोष केला. पण स्थानिक वृत्तपत्रात दोन ओळीची बातमी या परती त्यांची दखलही कोणी घेतली नाही.

राटवडांच्या निलंबनाचे नाटय संपते न संपते त्याच दरम्याने अण्णा भिंगरे पाटलांनी सगळया कर्मचा-यांची सभा घेतली. "आमचं मनसुबं मोटं हायती. आमचं हात पाक दिल्ली पातुर पोचल्याल हायेत.

गप गुमान काम करायचं आनी दिला पगार घ्येऊन गप -हायाचं......तुमच्या कामात संस्था लुडबुड करनार न्हायी पन संस्थेच्या इरोधात कोन जाईल तर आमी सोडनार न्हायी.तुमच्या सगटना टाचंखाली दाबतोय आमी. गेटच्या आतली वार्ता भायेर न्हेनारा संपला न्हनून समजा. हा कोसळल्याला किल्ला आमी बांदून काढतोया. त्येचा राजदूर्ग बनवायचा आमचा बेत हाये. येशेस कोड नी तुमचं त्ये स्टयाटूट गेटाच्या भायेर न्हेउन सुरळी करून सारून घ्यावा......हितं आमचं कायदं चालत्याल......बोलनारं मुस्काट कसं बंद करायचं त्ये आमी वळीखतो.आमी रूकडीला आसलो तरी हितली खडयान खडा बातमी आमाला मिळती......आमचा इरोधक वाकडी मान करंल तवा ती गर्दन छाटून टाकू आमी......नीट समजून वागा जावा..आमी सांगतोय त्यात तुमचं बी हित हाय नी आमालाबी वाळल्या पाचूळयावर पाय ठिवायची विच्चा न्हायी......"

एकीकडे कॅम्पसचं मॉडर्नायिझेशन सुरू झालं नी त्या नावाखाली बाप्पा राऊतानी उभ केलेले सागाचं बन सफाचाट झालं! हजारो घनफूट सागवान राजरोस कत्तल करून ट्रकच्या ट्रक दिवसाढवळया कोल्हापूर, सांगली, मुंबई, पुण्याकडे रवाना व्हायला लागले.कुणी कुणी तहसिलदार, फॉरेस्टरकडे अर्ज केले. निनावी अर्ज केराच्या टोपलीत गेले. नाव निशिवार अर्ज करणा-यांना हग्या दम मिळाला. महसूल खात्याकडून कसल्याकसल्या नोटिशींची लफडी तक्रारदारांच्या मागे लागली. लोक डोळयावर पडदा ओढून गप्प झाले. राजकीय वजन वापरून कसले कसले निधी अण्णांनी वेगवेगळया हेडस् खाली निळोबा संस्थेकडे वळवून डायरेक्ट घशात घातले. चार पाच वर्षात जे घातल त्याच्या दसपट वसूल करून अण्णांनी आपला मोर्चा दिल्लीच्या

राजकारणाकडे वळवला.

प्राचार्य देसाई, प्राचार्य दळवी यांच्या कारकीर्दी आता दंतकथा बनल्या. त्यांच्या कारकीर्दीत कॉलेजचा केवढा दबदबां! विद्यार्थी पालक तर सोडाच विद्यापीठातले उच्च पदस्थ सुध्दा संस्थेच्या आवारात पाऊल ठेवल की परवानगी विचारून मगच प्राचार्यांच्या केबिन मध्ये शिरत. दळवी सरांचा राऊंड व्हायचा तेव्हा आवारात पिनड्र ॅप सायलेंस असायचा......प्राचार्य बोंडले एल्.एम्.सी.चेअरमन येणार म्हणून तास - तास दिड -दिड तास गेटात त्यांची वाट पहात तिष्टत राहू लागले.आपली रिव्हाल्हिंग चेअर त्यांना ऑफर करून त्यानी बसा म्हणे पर्यंत अदबीनं अंग चोरून उभे राहू लागले. अर्थात तो त्यांचा शहाणपणाच म्हणायला हवा. ते अस न वागते तर सगळया स्टाफ देखत, “ऊठ की भाडया! आन्नासायबाचं खर्कट खाऊन प्राचार्य झालाईसा आणि माझ्या म्होरं खुर्चीत झुलत -हातोस काय रे ए ऽऽ कस्तान्या?” अशी मुक्ताफळं झाडली असती बाळासाहेबानी.

व्हा. प्रिन्सिपॉल वष्ट हे तसे असंतुष्टंच्या गटातले. पण अण्णांची खुशामत करून या पदापर्यंत त्यानी मजल मारलेली. उद्या पीएच.डी. पुरी झाली की बोंडल्याला धत्तुरा दाखवून खुर्ची पदरात पाडून घ्यायची त्यांची मोर्चेबांधणी कायम सुरू.प्रसंगाच गांभीर्य ओळखून ते पुढे सरसावले......“मॅडम प्लीज ऽऽप्लीज बी क्वाइट. तुम्ही परमिशन न घेता डायरेक्ट केबिन मध्ये घुसलात.तुम्ही कुणापुढे उभ्या आहात याचं भान ठेवा. ” मॅडमच्या दर्शनाने घायाळ झालेले चेअरमन बाळासाहेब वष्ट सराना हाताने थांबण्याची खूण करीत म्हणाले, “ ही बाई कोन हाय? संवस्थेशी हिचा काय संबंध? आमच्या नामगुडयांनी यांच्यावर हात का टाकला? त्ये आदी कळूद्या.”त्यावर डॉ. बोंडल्यानी मोठया तत्परतेने माहीती पुरविली. चार महिन्यांपूर्वी सायन्स

फॅकल्टी मध्ये क्लॉक अवर बेसिसवर नेमणूक दिलेल्या ह्या प्रा. कु. बिजली भोसले. अण्णांचे मित्र आमदार येडवे यांचे खास शिफारस पत्र घेऊन आलेल्या वगैरे वगैरे......

मोठया वशिल्याचे बिरूद घेऊन स्टाफवर आलेली माणसं स्वत:ला एस्टॅब्लिश करण्यासाठी इतराना डॉमिनेट करून आपले महत्व वाढवित रहातात. वेगवेगळया कार्यक्रमात शायनिंग मारून विद्यार्थ्या मधले आपले महत्व वाढवू पहातात. प्राचार्य व्हा.प्राचार्यांचे लांगूलचालन, लाव्यालाव्या, स्टाफमधील बोलणी इत्यंभूत पोहचविणे अशा नाना खटपटी लटपटी अवलंबू पहाणा-यांपैकी एक म्हणजे बिजली मॅडम... आधी स्त्री, त्यात टंच नी ब-यापैकी रंगरूप असलेली खेरीज एम्.एस्.सी ला बी प्लस मिळालेला. आपले स्त्रीत्व आणि बुध्दीमत्ता दोन्ही पणाला लावून पर्मनण्ट पोस्टींगकडे त्यांची वाटचाल सुरू! अल्पावधीत त्यानी ब-यापैकी जम बसविलेला. साटेली कॉलेज मध्ये इंटर कॉलेज टूर्नामेण्टस् ॲरेंज करण्याचा घाट घातल्या पासून त्या अक्षरश: वीजे सारख्या तळपत राहिल्या.हा प्रांत वस्तुत: नामगुडयांचा......पण श्रेय लाटण्यासाठी गुळाला झटणा-या मुंगळयागत स्टाफ मेंबर्स पुढे सरसावले.

अनाउन्समेंटची स्क्रीफ्ट तयार करून बिजली मॅडमनी वष्ट सरांपुढे 'नजर टाकण्यासाठी' ठेवली तेव्हा स्क्रीफ्ट वाचूनही न बघता बिजली वरून लोचट नजर फिरवीत " एक्सलंट रिअली सुपरस्टीशस" असा शेरा त्यानी मारला. इंग्रजीचे कामत हात चोळीत बसण्या पलिकडे काही करू शकले नाही.एल्.एम्.सी. चेअरमन अण्णा भिंग-यांचे चिरंजीव दस्तुरखुद्द बाळासाहेब इनाग्युरेशन साठी येणार म्हटल्यावर बिजलीची कळी खुलली. काहीही करून त्यांच्या नजरेत

भरायचे......रिलेशन्स डेव्हलप करायची म्हणजे पर्मनंट पोस्टींगचे दरवाजे आपोआप खुले...बिजली हरखून गेली. पण प्रत्यक्ष प्रोग्रॅमच्या वेळी मात्र अनाऊन्सरचा पेंडॉल एका बाजूला असल्यामुळे बाळासाहेबांचे दर्शनसुध्दा बिजलीला झाले नाही. मराठीचे प्रा. भैरव (सिनीअर पे स्केल रखडलेले) आणि हिस्टरीच्या साळुंखे मॅडम (कन्फर्मेशन लेटरच्या इच्छुक) दीप प्रज्वलन, ईशस्तवन स्वागत या वेळी पुढे पुढे करून भाव खाऊन गेले. "हार्टीएस्ट वेलकम टू रिस्पेक्टेड चेअरमन बाळासाहेब भिंगरे पाटील, द मोस्ट डिअरेस्ट पर्सनॅलिटी ऑफ स्टाफ ॲण्ड स्टुडंटस......" बिजली मॅडमचे मधाळ शब्द उमटले आणि हवेतच विरून गेले. एकतर अनाउन्सर मुख्य स्पॉट पासून दूर, स्पिकर साउंड सिस्टिम कॉलेजची अन् बाळासाहेबांचे इंग्रजीचेअज्ञान या साऱ्यात बिजलीचा लखलखाट कसा पडावा? उलट कायम अनाउन्समेंट जॉबमध्ये जखडबंद झालेल्या बिजली मॅडमना इनॉग्युरेशन उपरान्त चहापानासाठीही जाता आले नाही. मुरब्बी सिनीअर मेंबर्सनी योजनापूर्वक आपला 'भोज्जा' केला हे उमगून बिजली पुरती खट्टू झाली. काही तरी करून नवीन संधी शोधण्यासाठी तिचा भेजा कामाला लागला.

दोन तास घसा फोड करून बिजली पुरती हैराण झाली. कॅंटीनमधून शीत पेये, सॅंडविचेस घेऊन वेटर्स ग्राउंडकडे निघाले. नेमक्या त्याच वेळी थोडी उसंत मिळाली म्हणून बिजली टॉयलेटकडे निघाली. अख्ख ग्राउंड पार करून स्टाफसाठी खास बांधलेल टॉयलेट गाठणं......चेहेरा धुवून पुन्हा पावडरचा पफ मारणं, ओठावरून हलकी लिपस्टीक फिरवणं, केस मनाजोगते विस्कटून ३|३ वेळा डिफरंट ॲंगल्सनी स्वत:ची छबी आरशात निरखून पेंडॉल गाठी पर्यंत

खूप उशीर झाला. कोल्ड्र िंक्स, सॅंडविचेसचा पोरानी पार फन्ना उडविला. टेबलवर पडलेले टोमॅटो सॉस, ब्रेडचे तुकडे, टेबलक्लॉथवर सांडलेले कोल्ड्र िंक याकडे अंगूली निर्देश करून, भुवया उंचावीत ओठांचा चंबू करून बिजली कडाडली,"व्हॉटस् दिस नॉन्सेन्स? हु डेअर्ड टु एंटर दिस टेण्ट?" मान खाली घालून एल्.आर्.म्हणाली, "मॅडम तुम्ही गेलात अन आपले ॲथलिट, व्हालिंटीअर्स सगळयांनी एकच गिल्ला केला.आपल्यासाठी आणलेले स्नॅक्स, कोल्ड्र िंक्स सगळी फस्त केली की पोरांनी." नामगुडयाना जाब विचारायची आयती संधी बिजलीला मिळालेली.

ॲरेंजमेंटच्या धसक्याखाली चितागती झालेले बिच्चारे नामगुडे सर. ब्रह्मचारी पैलवान गडी; बाईमाणसाला कमालीचा बुजणारा. बिजली आपल्या दिशेने येताना दिसल्यावर बिच्चारा घामाघूम झाला. भरीसभर म्हणून सुपले सरानी, टोणगे सरानी कोपरखळया मारून त्यांची टेर खेचली. "हाय बुवा! लई दमात काम हाय गडया तुजं......बिजली बाय अंगावर येतीय..आता तिला शिंगावर कशी घेतुयास बगु की!" कलिग्जना टिझिंग करायला नवीन विषय मिळाला, आपण पुन्हा टार्गेट झालो या विचाराने नामगुडेजाम उखडले. भुवया उंचावीत, नाक फुलवुन तर्जनी रोखत बिजली कडाडली, " काय हो एच्.ओ.डी स्पोर्टस्......! हा काय चावटपणा चालवलायत तुमी......!" सटपटलेला नामगुडे बिजलीची नजर टाळीत पुटपुटला. "कुठं काय? काय झालं वो म्याडम? म्या कंचा चावटपणा क्येला गा?" खरं तर सुदद् भाषेतले शब्द वापारायची नामगुडयाची खटपट चाललेली पण बिजलीच्या अनपेक्षित बोलानी गडी कोलमडला.योजूनसुध्दा जानपद गावरान शब्द त्याच्या मुखात आलेच. 'त्याच्या आयला हिच्या . हि बया

समूर आली की आपली अशी दैना का व्हते?' नामगुडे मनात म्हणाला.

नामगुडे सटपटलेला बघून छद्मी हसत अंग वेळावीत बिजली म्हणाली, "चावटपणा नाहीतर दुसर काय? मी अगोदर वॉर्न करून सुध्दा हाऊ डिड यू अलाऊ जेण्टस् टू एंटर माय टेण्ट? सॉरी हं. रागाच्या भरात माझ्या लक्षात नाही आलं......तुम्हाला इंग्रजी समजत नाही हे. माझ्या टेण्टमध्ये जेण्टस् व्हॉलिंटीअर्स घुसले कसे...... त्याना तुम्ही अलाऊ कां केलत? त्यानी माझी कोल्ड्र िंक्स, स्नॅक्स सफाचाट केलीच वरती आणि टेबल वर ही घाण केली त्यानी. मिस्टर नामगुडे यू आर रिस्पॉन्सिबल फॉर इट......आय वॉर्न यू......आधी मला कोल्ड्र िंक्स, स्नॅक्स द्या अन् टेबल साफ करून नवीन टेबल क्लॉथ टाकून द्या. अदरवाईज आय् विल रिपोर्ट टू द रिस्पेक्टेड वष्ट सर ॲण्ड यू वील बी फायर्ड......" अजिजिच्या सुरात नामगुडे म्हणाले, "बिजली बाई......न्हायी बिजली म्याडम बाई......न्हाई नुसतच म्याडम......ख-यान मी तुम्हासाठी क्वलड्र िंग आनी स्यांडवीचा लावून दिल्या होत्या की. माज्या वाटनीची ज्यादाची कोल्ड्रिंक बी दिलती की. लई ब्येष्ट अनवंसमेण केल्यात की तुमी. माज्या डिपारमेंटसाटी येवडं राबलायसा त्येची जाण ठेउन. खरचं आयच्यान म्या दिलंती की कोल्ड्रिंक. आता पोरानी आगावपण केल त्याला मी वो काय करनार. मी पुन्ना व्हालिटियरनावार्निग देतू की. स्वारी. खरच व्हयेरी व्हयेरी स्वारी......" बिजली मनातून सुखावली पण नुसत्या बोलानं कोल्ड्रिक्सची तल्लफ थोडीच भागते? हात नाचवीत बिजली वेडावल्यागत म्हणाली,"म्हणे दिलंती क्वलड्रिंक. मला कुठं मिळाली ती? तुम्ही काहीही सांगाल नी टेबल घाण झाल त्याच काय? ते काय तुम्ही साफ करून देणारायत्? यू आर डिसीव्हींग मी! मला

कोल्ड्रिंक पाहीजे म्हणजे पाहीजे. मला कूपन्स् द्या. मी कॅटीन मध्ये जाऊन घेईन."

पॅटीचे खिसे उलट करून दाखवीत प्रामाणिकपणे नामगुडे म्हणाले, " म्याडम बाई. न्हाई नुसतचं म्याडम योक बी कूपन शिल्लक -हायल न्हाई.माजा काय विलाज. प्लीज स्वारी करा की मला" नामगुडयाच्या पाठीत दणका घालीत सुपले सर म्हणाले, "हा बजरंगबली कधी शहाणा होणार गॉड नोज्......! चला मॅडम मी पाजतो तुम्हाला कोल्ड्रिंक्स!" सुपल्यांची विनंती नाई लाजाने मान्य करीत असल्याचा आव आणून त्यांच्या पासून सुरक्षित अंतर राहील याची खबरदारी घेत बिजली कॅटीनच्या दिशेने रवाना झाली. आपल्या लॉकरमधून नवा टेबल क्लॉथ आणायला व्हॉलिंटीअरला पिटाळून नामगुडे टेबल साफ करून घ्यायलाबिजलीच्या पेंडॉलकडे निघाले. 'च्यायला कूपन्स संपली तर आपण खर्च करून बिजलीला कोल्ड्रिल प्यायला ला म्हणायला आपणाला का सुचू नये? मोक्याच्या क्षणी आसल शाणपण सुपल्यानाच कस सुचल?' हे विचार नामगुडयांचा भेजा पोखरू लागले.

कोल्ड्रिंक पाजताना बिजलीला नामगुडयांविरूध्द फुल्ल चार्ज करून खर्च केलेले चाळीस रूपये सव्याज वसूल करण्याची तरतूद सुपल्यानी केली अन् नामगुडयाना धोबी पछाड घालायचे बेत बिजलीच्या मेंदूत आकार घेऊ लागले.पेंडॉल मध्ये खुर्चीवर बसुन समोरच्या शेडयूलकडे नजर टकताना एक स्पार्किंग पॉईंट तिच्या समोर उलगडला.शेडयूलप्रमाणे साडेबाराला लंच ब्रेक होता मुळात प्रोग्रॅम लेट सुरू झाल्यामुळे मॉर्निंग शेडयूल साडेबाराला पूर्ण होण शक्यच नव्हतं. प्लॅनिंगप्रमाणे साडेबारानंतर थांबण बिजलीवर

बंधनकारक नव्हतं. बस्स चांगला प्रेस्टीज पॉईंट करता येईल. बिजलीला अनाहूतपणे खुदकन् हसू फुटल. भारावाजले. मिनीट हॅंड सहावर गेला मात्र.बिजलीने टेण्टबाहेरच्या व्हॉलिंटीअरला बोलावल."हे बघ असाच नामगुडे सरांकडे जा. त्याना म्हणावं मी अर्जण्टली बोलावतेय्. काय कळल ना ? अन हे बघ ताबडतोब त्याना सोबत घेऊनचं ये ह ंऽ" बिजलीच्या इशा-यासरशी व्हॉलिंटीअर धावतच नामगुडे सरांच्या दिशेने रवाना झाला.

मॅडमचा निरोप सांगून व्हॉलिंटीअर त्याना हात धरून चला चला म्हणून विनवू लागला. 'आत्ता आनी ही बया कस्याला बलवाय् लागलीय?' असा विचार करीतच नामगुडे झपझप निघाले. त्यानी पेंडॉलमध्ये पाऊल टाकताच क्षणाचीही उसंत न घेता बिजली फणफणली, "अहो डायरेक्ट ऑफ स्पोर्टस्...इटस् थर्टी फाईव्ह मिनीटस् पास्ट ट्वेल ओ क्लॉक . इटस् टाइम फॉर लंच ॲज पर युवर शेडयूल. लेट मी गो नाऊ. गीव्ह सबस्टीटयूट फॉर अनाउन्समेंट. आय् वील बी बॅक ॲट टू थर्टी अन् हो संध्याकाळी मला दोन कुपन्स पाहीजेत कळल ना?" नामगुडयाना थोडफार इंग्रजी कळायच. बिजलीच्या बोलण्याचा त्याना उमगलेला अर्थ वेगळाच होता.

महीनाभरापूर्वी -डिस्ट्रिक्ट स्पोर्ट ऑफिसरच्या पोस्टसाठी ते इंटरव्हयू देऊन आलेले. त्यानंतर स्टाफ मेंबर्स त्याना डायरेक्टर ऑफ स्पोर्टस् म्हणून संबोधित अन् नामगुडे सुध्दा सुखावत. तोच संर्दभ त्यांच्या डोक्यात आला अन् सकाळच राहीलेल कूपन संध्याकाळी तिला द्यायला हव. बस्स नामगुडेना एवढच कळल. "येस येस म्याडम......संध्याकाळच्याला दोनच काय आजून येक जादा कूपन देतो की लावून. येवडयासाटनच बोलावलायसा व्हय. दीन की जादा

कूपन. "नामगुडे खुशीत म्हणाले. कपाळावर हात मारून घेत बिजली म्हणाली, "तुम्ही म्हणजे कहर आहे कहर. अहो तुमच्या शेडयुल प्रमाणे बारा तीसला लंच ब्रेक आहे. आत्ता बारा अडतीस झाले. माझी डयुटी संपली. कुणा दुस-याकडे अनाउन्समेंटचा चार्ज द्या......मी निघाले लंच घ्यायला......"

तावातावाने पेंडॉल बाहेर जाऊ पहाणा-या बिजली मॅडमना अडवीत हात जोडून अडवीत हात जोडून अजिजीच्या सुरात नामगुडे विनवू लागले, "म्याडम. आहो आसं का करायल्यात हो न्हान्या पोरावानी. हे काम काय माज घरचं काम हाये का? आता हया टायमाला अनावंसर दुसरा कोन पघू म्या? सिनीअर मेंबर गेले असत्याल घरला. आता आनी कोन गाट पडनार?" बिजली मानेला झटका देत हात वेळावीत म्हणाली, " दटस् युअर बिझनेस रूल इज रूल. मी शेडयुल प्रमाणे ऑनेस्ट डयुटी बजावलीय्. टाईम इज ओव्हर अँड लेट मी गो . खडड्यात गेली तुमची स्पोर्टस् मीट अन् अनाऊन्समेंट. " रागाच्या भरात बिजली मॅडम चार जोडे मारती तरी नामगुडयानी ते हसत हसत खाल्ले असते. पण स्पोर्टस् मीट खडड्यात गेली हे शब्द झोंबले. त्यांच्या डोळयात अग्नी उतरला. भान हरपून मुठी वळीत ते म्हणाले, " खडड्यात ग्येल तुमच सायन्स् डिपारमेण् आन् तुमची ल्याबोरेटरी......तिच्यायला स्पोर्टच काम काय ये-या गबाळयाच काम न्हायी......धरला बेडूक अन् कापला चरा ऽऽरा. तुमी मनान ह्ये डिपारमेण घेतलायसा की वष्टाच्या मागे लागून. आता नेट लागला व्हय तुमासनी? आजून दोन यॉटम पुर व्हायच्यात्. तवर बसा गप गुमान बोंबलत. कसं जाताय बगतोच मी. माजं डिपारमेण खड्यात घालीवनारी तू कोन मोटी बया लागून ग्येलीस. " झालं. शब्दाने शब्द वाढत गेला. वातावरण तापलं. पोर स्टंपिंग करायला

लागली तशी बिजली जाम बिधरली.

"यू ऽऽयू - यू मिस्टर नामगुडे होल्ड युवर टंग! यू आर क्रॉसिंग द बाऊंडरी. स्टॉप इट नाऊ. आय् वील लुझ माय बॅलन्स. कीप मम्......डोण्ट स्पीक फर्दर." इंग्रजीतल तिच कडाडणं न समजल्यामूळे आणि तीने यू यू करीत आपल्याला कुत्तरडयाप्रमाणे हिणवल अस वाटून गडी जाम तडकला. "ये बिजली बाय. का उगं यू यू करतीस? कुतरं समजलीयास काय मला? विंगरजी आल म्हंजे काय शानपन वाडल का काय मानसाचं? लईच दिवटीवानी लचकायलीस की आवा. तिच्यायला क्लाक हावर बेशिकवर काम करती आनी तोरा प्रिन्शिपॉलचा.म्या शिनियर मेंबर हाये तू जाच कशी टेण्ट सोडून. बोंडलसायबाना सांगून न्हाई तुला म्येमो दियाला लावला तर मी नामगुडे न्हायी."

पोरानी नुसता हुर्यो केला......रागाच्या भरात बेताल बडबड करून नामगुडयाने स्वत:साठी पुरेसा मोठा खड्डा खणलाय याची खातरजमा होताच बिजलीने हुकुमी अस्त्र काढलं......डोळयाना रूमाल लावीत हातातले कागद टेबलाच्या दिशेने भिरकावीत "आय वील रिपोर्ट युअर मिस कॉण्डक्ट टू द प्रिन्सिपल......यु सी मिस्टर नामगुडे! यु हॅव एक्सप्लॉयटेड मी...आय...आय...वोण्ट टॉलरेट... यु हॅव क्रॉस्ड् द बाऊंडर......" जी.एस्.एल्.आर या दोघाना सोबत घेऊन बिजली पेंडॉल बाहेरपडली अन् तिने थेट प्राचार्यांची केबिन गाठली. चेअरमन बाळासाहेब केबिनमध्ये असतील याचा मात्र तिला अंदाज नव्हता. त्यानाबघितल्यावर या संधीचं सोनं झाालं असच तिला वाटल.

वष्ट सरानी खडसावल्यावर डोळयात पाणी आणून बाळासाहेबां कडे मोहरा वळवून अजीजीच्या सुरात बिजली

म्हणाली“सॉरी. आ एम् रिअली व्हेरि सॉरी हं बाळासाहेब. नामगुडे सरानी माझ्या टेण्टमध्ये ट्र ेसपास करून सर्वांसमक्ष मला चक्क एक्सप्लॉइट केल. अस्तन्यावर करीत चालच करून आले की हो ते माझ्या अंगावर.काही मानमर्यादेच भान मुलांसमक्ष त्यांच ते असभ्य वर्तन......ती रानवट गावंढळ भाषा !” घशात हुंदका दाटून त्याना पुढे बोलवेना. रूमाल डोळयाना लावीत त्या स्फुंदुन स्फुंदुन रडू लागल्या. रडण्याच्या भरात त्याना पदर सावरण्याचं सुध्दा भान राहील नाही...... समोरचं दृश्य बघून बाळासाहेब बर्फासारखे वितळले.हे असल गिर्रेबाज कबूतर आयत घावल की जाळयात.आता हे कसं मुर्गळाव की कच्च खाव आसं वाटल त्याना.



गेले वर्षभर बाळासाहेबांच्या २|३ खेपा झालेल्या. अधिकार ग्रहण करून त्यांच्या व्हीजीट सुरू झाल्या पण आपला रूबाब दावायची, सगळया स्टाफपुढे शायनिंग मारायची संधीच त्याना मिळालेली नव्हती. बिजलीच्या निमित्ताने असा दाब चानसच जणु घावला की त्याना. शब्द जुळवीत खास ठेवीणीतला घोगरा आवाज काढून बाळासाहेब गुरगुरले. "अर्रा ऽऽरा तिच्या मायला तिच्या नामगुडयाच्या......मास्तार ह्यो ल्येकाचा आन् यवढं ताळतंत्र बी बाळगू न्हये व्हय सुक्काळीच्यान? ह्ये क्वालेज हाय की फोरास रोड तिच्या मायला. काय वो बोंडल साब? लोकाच्या तरन्याताटया पोरी मुरगायसाटी श्यालरी दिऊन आनी आसलं टोणगं पाळल्यात काय क्वालेजात......? खुद्द आमी हित आल्याल हाऊत ह्याची सुदिक दकल घ्येत न्हायती तुमचं मास्तार लोकं ? भरग्राऊंडवर तलंगीवानी गिर्रेबाज बाईचा हात धरतूया ह्यो भाडया. " त्याना शांत करण्यासाठी बोंडले, वष्ट हात जोडून म्हणाले. "शांत व्हा.. साहेब जरा दमानं घ्या.. आधी नामगुडयाना बोलावून शिस्तवार विचारून घेऊया अन् कायद्याच्या चौकटीत राहून काय तो निर्णय घेऊया की सवडीन......"

त्यांची ही नरमाई-सबूरीची भाषा ऐकून बाळासाहेब ज्याम उखडले. "करून करून भागल्यालं नामर्द तुमी दोगं बी! आमी काय बडिवल्याल बैल हाऊत काय तुम्हावानी? बाई यवढा सपष्ट पुरावा घिऊन आलीया आनी तुमी फौजदारावनी तुम्हावानी?" बाळासाहेबांच बोलणं ऐकून बिजली थंडगार झाली. वष्ट, बोंडले बाळासाहेबांची नजर चुकवीतं कसनुसा चेहरा करून गप्प झाले. बाळासायबांचा मैतर बोलता झाला. " आता तुमी इचार करा की साएब......ह्या नामुगडयाचं काय नडलं व्हत या बिजलीबाईच्या मांडवात

जायाच. ग्येला तो ग्येला आनी वर आसा अती परसंग करायचा म्हंजे.." त्याच्या बोलण्यावर खुशीत मान डोलावून बाळासाहेब म्हणाले, "हांग्गाश्शी......ह्यो पाईंट माज्या ध्येनातच आला न्हाई...... ही आशी टर्बुजावानी बाय दिसली नी पागल झाला की नामुगडया.भाडं भर ग्रावंडात इनयभंग करतं व्हय बाईचा. काय वं बाई? त्यानं काय क्येल अस मघा विंग्रजीत म्हटलाया तुम्ही. कंचा शबुद म्हटलासा......"

"एक्सप्लॉइट......एक्सप्लॉइट केल त्यानी. म्हणजे तसा डायरेक्ट विनयभंग नाही म्हणता यायचा."बिजलीबाईना पुढे बोलायचा अवसर न देता गडबडीने बाळासाहेब म्हणाले." आवो येक्सप्लाईट म्हनला तवा कळलं आमास्नी...हिंदी पिच्चरमधी हिरॉईनवर रेप करण्या आदुगर त्ये शक्ती कपूर हुबलाकपन करून दावतय न्हव. आनी मागन शिस्तवार कापड उतिरतो की बाईची. तस झाल की वो ह्ये.इनयभंग आनी काय वेगळ आसतय. नाक्यावरचं मवाली आदी शिटी घालतेत मंग हात धरतेत बाईचा नी पार भुस्काटच करतेत की त्याच्या म्होरं.त्ये काई न्हाय च्याप्टर केस भरून सस्पेंड करूया की भाडयाला.ाई तुमी रडू नगासा.आमी हित आसताना तुमच्यावर अन्याव करतय बेनं.वष्ट आवं बगीत काय-हायलासा कोल्यावानी.बाय येवडी रडायलीय्. जावा आदी जावा आनी चिल्ड वॉटर घिवून यावा. जा म्हंतोय न्हवं ? आनी बोंडलं तुमी राण्यानला बलवून चार्टशीट भरा की त्या नामुगडयावर. नी सांजच्याला इनकूरीच लावून टाका......"

रिव्हॉल्विंग चेअर सोडून बाळासाहेब पुढे आले... रडत बसलेल्या बिजलीच्या बाजूला ते उभे राहिले. तर्जनी अन् अंगठा जूळवून 'कंडा माल गावला बेन्या' अशी खूण करणा-या मित्रांना डोळा

मारीत त्यानी बिजलीच्या केसावरून हात फिरवला. तिच्या खांद्यावर थोपटीत ते म्हणाले, " घाबरू नका म्याडम . . . ह्या नामुगडयाला न्हाई चितपट क्येल तर नावाचा भिंगरे पाटील न्हाई म्या . . . ! म्होरं बगाच तुमी काय व्हतं ते. इनकूरीत त्येची कापडचं उतरोतय् की तुमा म्होर. " तेवढयात ट्रे मध्ये फ्रिज्ड वॉटर बॅग अन् ग्लास घेऊन शिपाई पुढे घालून वष्ट सर केबिनमध्ये शिरले . . नाईलाजाने बिजली जवळून बाजूला होता होता तिचा पुष्ट खांदा दाबल्यासारखा करून बाळासाहेबानी ट्रे मधली बॉटल हातात घेतली. ती स्वत: खोलून ग्लास भरून मॅडम समोर धरीत. "प्या म्यॅडम पानी प्या" असं म्हणत मित्राला निर्देश करीत बाळासाहेब बोलले. "आनंतराव ह्या म्याडमान्ला आमच्या एशी गाडीतून बि-हाडापातोर घालवून या जावा. म्याडम तुमी जावा बिनघोर ट्रे सांच्याला संवस्थेच्या ग्येस्ट हाऊसवर इनकूरीला आनाय पुन्ना गाडी पाठवतोय आमी. आनंतराव म्याडमची रूम नीट बघून पत्त्या ध्येनात ठेवा......सांच्याला परत जायाच हाय तुमास्नी......"

भोसले मॅडमनी चेअरमनकडे नामुगडयानी इनसल्ट केल्याची तक्रार केली......बाळासाहेब भलतेच गरम झालेत......चार्जशीट भरून नामुगडयाना सस्पेंड करणार! ही बातमी लांबोरे क्लार्कने कॉलेजभर पसरवली. कोण कोण काय काय तर्क कुतर्क करू लागले. बाळासाब जहांबाज गडी......एका दगडात दोन पक्षी मारतयं बेण......नामुगडया जीवानिशी गेला आन् बिजली चांगलीच घोळात आली की मर्दा......आता बाई जरा आगाव हाय ही गोस्ट खरी पन...... समजलचं की म्होरं काय काय व्हतय!. बिजली 'त्यातली' निगाली तर बाळासाबाची कायमची नाष्टा पान्याची सोय झाली म्हणा की साटेलीत......झांबाज बाई आसलं तर हळूहळू प्रिन्शिपालच्या खुर्चीपतोर

जातीया की...... येकदा का बाळासाबाच्या मांडीवर बसली की फुरं झाल. त्ये बोंडल बसल दूद पीत आन् वष्ट सर बसतयं वाळला चगाळा बडवीत. ही बया बाळासाबाची शिडी करून डोक्यावर मि-या वाटतीया की समद्या ष्टाप मेंबरांच्या......काय खरं न्हाई आता. स्टाफ मेंबर्स रंगवून रंगवून चर्चा करीत बसले.

बिजली मॅडमला बि-हाडी पोचवून गाडी माघारी आली. मंडळी गोवा बॉउंड्री क्रॉस करून थ्री स्टारकडे रवाना झाली. चिकन हांडी अन् फेणी बरोबर पुढचे बेत रंगले. मित्र मंडळीनी सावध सल्ले दिले. नामुगडया विरूध्द बाईचं स्टेटमेंट लिहून घ्यायचं अन् विनयभंगाची कंप्लेंट देउन पोलिस स्टेशनला एन. सी. करायची. मग नामुगडयााला पेचात पकडून त्याचं स्टेटमेंट लिहून घ्यायचं. स्पर्धा संपेपर्यंत दमादमानं चौकशीचा घोळ सुरू ठेवायचा. कॉलेजला स्पर्धेनिमित्त सुटी डिक्लेअर करायची. त्याच दिवशी इनक्वायरीचा फायनल राऊंड ठेवायचा. बिजलीला पर्मनंट पोस्टींगच मधाचं बोट लावायचं. मग वष्ट, बोंडले, राणे सुपरिटेंडं समद्याना रेस्ट हाऊस समोर कुत-यागत राखणीला बसवून बाईला चाबलायची. पुढे मिटवामिटवी करून प्रकरण दाबून टाकायच. नामुगडयाला फकस्त दम द्यायचा. जनलोकात चर्चा होईल इतकं पुढचं टोक गाठायचं नाही. आपला मतलब फक्त बाईशी उद्या बाई फिरलीच तरी गोष्ट अंगलट येणार नाही. नामुगडयाला सस्पेंड केला नाही म्हणून बाई इरेला पेटली......भलतं काही घडलं नाही असं म्हणून केल्या कर्मावर बोळा फिरवायला मोकळे. मुरब्बी मित्रांनी नामी बेत आखला.

बरोबर तीन वाजता वष्ट अन् बोंडलेना रेस्ट हाऊसवरून निरोप आला. घटना घडली त्यावेळी बिजलीच्या पेंडॉलजवळ असलेली

मुलं, त्यानाही पाचारण करण्यात आलं. चार्टशीट टाईप केलेले कागद शिस्तीत पोलिओत बांधून सुपरिटेंडंट राणेसुध्दा साहेबांच्या बरोबर निघाले. फेणीची नशा बाळासाहेबांच्या डोळयात पुरेपूर उतरलेली! मंडळी व्हरांडयाच्या पाय-या चढताना दिसताच बाळासाहेबांची तिखट जाळ जिव्हा जशी आगचं ओकू लागली! “ कसली फाजील मास्तरं स्टापच्या दावणीला बांदल्यात. आसलं बुळग प्राचार्य घावल्यावर नामुगडयासारखं सोद सोकावनार न्हाईत तरच नवाल... भर दिवसा ढवळया ष्टापवरच्या बाईची छेड काडत्यात मास्तर लोकं. उद्या अन्नासाब जितं गाडत्याल की येकेकाला......बंद करा ह्ये कालिज आनी फर्मास लेडीजबार सुरू करा की भाडयानो मुंबईगत. अन् मग हावी ती थेरं करा समद्यानी मिळून! डान्सिंगफ्लोरच्या बाजूला तुमासंग खुर्चीला खुर्ची लावून आमी बी व्होडका पीतोय की तुमासंग! तिच्यायला आमी चेरमन हाऊत येलेमशीचं आनि आसली टर्रेबाज बाई घेतलाया नेमून त्याचा पत्त्या सुदीक लागू नै व्हय आमास्नी! त्ये नामुगडं ल्येकाचं मजा मारतयं तकडं आन् समदं ष्टाप जिभा पागळत मजा करत्याले की आंबटशोकाच्या!! आमच्या नदरं आड बाई परमनंट व्हउन कोनाची तरी धन केली आसती की तुमी बुळग्या निंबरमोडयानी... थू:तिच्यायला......आमी येवढं हुम दांडग आसताना टेनर केल की स्टड फार्मातल्या घोडयावानी!!!

त् त् ऽऽ प प करीत राणे सुपरिटेंडंट म्हणाले, “ साहेब, वर्कलोड पुरा करण्यासाठी सी.एस.बी.वर दोन प्राध्यापक नेमून घ्यायची मंजुरी आपणच दिलीत की साहेब......मागच्या वेळी अपॉईंटमेंट लेटरवर ओ.सी.ला तुमच्या सह्या मीच नाही का घेतल्या? अहो दोन अडीच हजार रूपये एवढं नॉमिनल पेमेंट......त्यात बिजली

मॅडमसाठी अण्णांचे मित्र खासदार येडवे......त्यांचा फोन आल्याचं मी बोललो की तुम्हाला . . ." त्यावर थोडा पारा खाली उतरला आणि आठवल्यागत करीत बाळासाहेब म्हणाले, "हांग्गाश्शी......त्ये काळयालं वडराचं कोन पोरगं दावलतं की तुमी आर.डी. का फारडी साटी घेटल्याल. (त्यावर राण्यानी मान डोलावली) पर काय वो राणे......ही फाकडू बाय? आमच्या म्हेरबानीनं हीतं नौकरीला लागली की......उद्या क्यॉपुटरचं तास जर वाडलं तर फुल्ल पोष्ट व्हतीया नव्ह ती? येवढा दाब चानस मिळवतीया ही बया......आनि ती कोन? कुटची? दिसतीया कशी? ह्ये समजू नये का आमास्नी? सकाळी आमी वळाकलच न्हाई की हि बया आमच्या ष्टापवर हाये त्ये! चेरमन आमी आन् स्टाप वरचं टोणगं हुंगत बसलयात म्हना क......चेरमनकी आमची डब-यातच मग......ह्या थेरडयास्नी दम द्याय पुरती. वष्ट, बोंडले यांच्याकडे तर्जनी रोखीत बाळासाहेब गुरगुरले. राणे तुमी सुपरीटेनगीरी करताय का हजामती......? आमचीच बाई आन् आमाला पत्त्या बी न्हाई......वा ऽऽ रे गब्रु!"

बोंडले सारवासारवी करत म्हणाले, "अहो साहेब...... त्यावेळी वूमेन्स सेलच्या मिटींगसाठी युनिवरसिटीत लाऊन दिलत की बिजली मॅडमला." वष्ट म्हणाले, " हां हां खरी गोष्ट आहे ही. नाहीतर फॉरम्यालिटी म्हणून मॅडमना तुम्हापुढे आणल असतं की राण्यानी. त्यांची काय चूक नाय." हे ऐकल्यावर तांबारलेले डोळे गरागरा फिरवित बाळासाहेब तारस्वरात रेकले, "तिच्या मायला मारी सोद्यानो तुमच्या! शीयशबी वरच्या टेंपरवारी बाईला क्वालेजच्या खर्चानं युनवर्शिटीत धाडून तिच्या म्होरं शायनिंग माराय मोकळं की तुमी...... येवडा बेत शिजवलाया तुमी लोकानी! भले रे भाद्दर......वीमेन शेलाच्या मिटींगासाटनं बाईला केबिनीत बोलवून गुलुगुलु करायचं

बरं निमित्त घावल की बोंडल्याना बी आन् वष्टाना बी. बरी बेष्ट को-आपरेटीव सोसायटी सुरू केलिया की मर्दानो तुमी. टेंपरवारी बाइ......तिला येवडं फुडारपन क्वालेजच्या खर्चानं फिरायचा तोबरा चारताय तुमी आन् बाय कबूतरागत माना येळावीत येस् सर येस सर करीत पदर पाडून खुश ठेवतीया की तुमास्न. तुमा दोगांचं टाक्याचं नसबंदीचं आपरीशन करून टाकतू मी! आमच्या मागारी आसलं चाबराट धंद करता व्हय तुमी? आता भेटू देत आन्नासाब. तुमची करतुक घालतू की त्येंच्या कानावर. मग बसा की हाका मारत."

दुपारी हॉटेल मधे ठरलेला बेत. त्यातला बाळासाहेबांचा हेतू वगळून. त्याच्या मित्रांनी सांगितला.त्यावर उलट- सुलट चर्चा झाली. को-या कागदांवर मुलांच्या सह्या घेऊन त्यांची आयकार्डस् ताब्यात घेतली. "आता आठ दिवस बाहेरगावी जाऊन दडी मारा... गावात कोणी सापडता नये." राण्यानी दम भरला. वष्ट, बोंडले समक्ष जाऊन पी.एस.आय.ना घेऊन आले. साहेबांची त्यांच्याशी चर्चा सुरू झाल्यावर साहेबांची गाडी घेऊन वष्ट सर बिजली मॅडमला आणायला रवाना झाले. खलबत शिजू लागलं. बिजली मॅडम रेस्ट हाऊसवर यायला तयार होइना "चेअरमन साहेब अगदीच पॅनीक असल्यागत लघळपणा करतात मला नाही त्यांच वागण आवडलेलं." त्यानी तक्रार केली. पण वष्ट सर मुरब्बी. कॉम्प्युटरचे तास वाढल्यावर फुल वर्कलोड होणारी पोस्ट......ओपनची क्लीअर पोस्ट......अस गाजर दाखवीत आपण जबाबदारी घेतो, बारीक सारीक गोष्टींकडे जरा दुर्लक्ष करायचं......पी.एस.आय. समक्ष बाळासाहेब झाला तरी भलतं डेअरिंग काय करील? असं काही बाही

सांगून त्यानी बिजलीला रेस्ट हाऊसवर नेलं. मॅडमच स्टेटमेंट घेऊन राणे, वष्ट यांच्या सह्यानिशी कागद रंगले. पी.एस.आय. पेपर्स घेऊन निघून गेल्यावर बाळासाहेबांनी बिजलीशी जरा लघळपणा चालवला. पण मित्रानी त्याना आवरलं अन् इनक्वायरीचा पहीला राऊंड आटोपला.

दुसरे दिवशी हँग ओव्हर उतरल्यावर दहा साडेदहाच्या सुमारास बाळासाहेब प्रिन्सिपल चेंबरमध्ये दाखल झाले. नामगुडे सराना बोलवायला शिपाई रवाना झाला. चळचळ कापतच नामगुडे केबिन समोर उभे राहीले. "राजे ऽऽ या की आत. टर्बुजावानी बाई बगून पागळालायला. तवा बगून बरं वाटल आसल की. आता आनी घाबरायच नाटक करायलेत व्हय आम्हा म्होरं. काय लाज अब्रु हाय का मर्दा तुला ? भर गराऊंड मदी बाईचा हात धरून आडवी घालाय निगालास की निलाज-या ! बाळासाहेब गरजले. "ब-या बोलानं आपली चूक काय झाली त्याच टेशमेण आत्ता या सायबांम्होरं लिवून त्येच्यावर शिग्नेचर कर बेन्या. आता त्वा सुटत न्हाईस माज्या तावडीसन्. " त्यांच्या सुरात सुर मिळवीत जरबेच्या सुरात वष्ट कडाडले, " घ्या तो कागद अन् काय कर्तुक केलीत ते चटशिरी लिहा अन् सही करून द्या. आता नाटकं पुरे झाली."

मिशांवरून पालथा पंजा फिरवीत वष्टांच्या नजरेला नजर देत खणखणीत आवाजात नामगुडे बोलू लागले......"साहेबऽऽ! मी फिजीकल इंस्ट्र क्टर. सरळ धोट मार्गाने जाणारा पैलवान गडी......आता भाषा 'सुद्द' न्हाई माजी......हे मान्य हाए मला.कामाच्या टेंगशनमध्ये जास्त कमी शबुद ग्येला आसल की तोंडातनं...... सा वर्ष हितं काम करतुया की. कदी कुटच्या

पोरीबाळीकडे डोळा वरकरून पगितल न्हाई.या......बाळासाहेब म्हणत्यात आसली आगळीक म्या केल्याली न्हाई. भाई अनावन्समेंट आर्दवट टाकून जायाला निगाली नी टाळकचं फिरलं आपल......आपून आडमाप बोललो आशेल त्या येळी ......आनी पोरांच्या सामनी क्लाक हावर बेशिकची बाई झोनल गाजवून शिल्ड आनना-या मला गबरूला पेचात आणाय निगाली.आता स्पोर्टमीट म्हंजी काय माजं घरच काम हाय व्हय......बोललो की म्या आवाज चडवून."



नामुगडयांच्या वरचढ आवाजात बाळासाहेब गुरकावले, "तुज्या

मायला तुज्या नामुगडयाच्या. बिजली बायची आब्रु लुटायचा परयत्न क्येलास की भाडया! त्वा यक्सप्लायटेंगशन केलस तिच्यासंग आशी तकरार केलीया तिन आमापाशी......तसं लेखी ष्टेटमेण लिवलया आन् यन्.शी.बी केलिया की पोलिस ठेशनवर......झालच तर टयेण्टवर आसल्याली पोरं......कोरं कागाद दिऊन सया घितल्यात की त्येंच्याबी......पुराव्या साटनं काय बी लिवाय घावतय की आमास्नी......काय लबाड न्हाई बोलत. तुज्या मायला तुज्या नामुगडयाच्या." रागाने हाताची मूठ वळीत नामुगडयानी जो दणका हाणला टेबलावर की बस्स रे बस्स.बाळा साबाची बोलती बंद झाली.अन् बोंडल्याच्या टेबलावरची अडीच सूत जाडीची काच पण फुटली खाळ्ळकन.त्या वरकडी टिपेचा सुर चढवीत नामुगडे चवताळून म्हणाले,"खबरदारऽऽए टिनपाट भिंग-या......लई भुंकतयस् की कुतरडयावानी. मायचं माज्या नाव घेशील तर मुंडी पिरगाळून टाकीनबसल्या पटाला.तुजे चमच्ये हाईत संगाती आन् बोंडलं......वष्ट हुबं रायल्यात हात जोडून म्हनून लई चाबराट बोलतूयास व्हय रे सोकाज्याऽऽ"

नामुगडयांचा दणका ऐकून ऑफिस मधून क्लार्क, प्यून सगळे केबिनकडे धावले.नामुगडयाना जसा चेवच आला."धा जणाना भारी हाय ह्यो गडी.समद्यांच बारसं जेवलो की मी. बिजली बायची कड घीऊन तुमी मला - ह्या नामुगडयाला घोळात घियाला बगताय व्हय तुमी? डब-यात गेली की नौकरी तुझी.गाडाव बशीवल ह्या कॉलीजावर. म्या सडाफटींग गडी.मुलुख मोकळा हाय की मला. कुटं बी पेट्टाला नौकरी घावती मला आनी न्हाई बी घावली तरी हमाली करून न्हाई तर कुस्तीच फड मारून प्वॉट भरायची हिम्मत हाय आपली......पुन्ना वाकडा शबुद काडच की तु. न्हाई अन्ना भिंग-याला

तुज बारावं घालाय लावल तर नामुगडया न्हाई कंजारी म्हन मला. म्या काय कडुची अवलाद न्हाय." अशा गंभीर परिस्थितीतही धोरणीपणाने वष्ट सरांनी तोंड उघडल."अहो डायरेक्टर ऑफ स्पोर्टस्, इतक डोक गरम करू नका. आता मॅडमनी लेखी तक्रार केली की तुमच्या विरूध्द मग बाळासाहेब काय नी आम्ही काय. कोण काय करणार? जबाबदारीच्या पोस्टवर काम करायच म्हणजे जरबेनच बोलाव लागतय माणसाला.तक्रार एवढी गंभीर आहे म्हटल्यावर इनक्वायरी ही लागणारच!"

खुद्द वष्टांच्या तोंडून डायरेक्टर ऑफ स्पोर्टस् ही उपाधी ऐकून नामुगडे जरा शांत झाले. " बाईचीच तक्रार हाय म्हनता मग लावा की इनक्वॉयरी! म्या थोडच भितूय. राजीनामा द्यायच्या तयारीनच आलूय मी. पण तुमास्नी मोकळ न्हाई सोडनार. ह्या झिंगुरटया चेरमनानं माज्या आयचा उद्दार केलाया की. इनकूरीच्या रिपोटात त्ये बी लिहाव लागेल वष्ट सर! बाळासाबाच्या तालावर नाचणारी तुमी बुजगावणी.कसल प्रिन्शिपाल आनी कसल व्हाईस प्रिन्शिपाल. परमिशन घेऊन मगच केबिनमदी यावा आस खुद्द आन्ना भिंग-याला ठनकावून सांगनार सावंत प्रिन्शिपाल साहेब कुट नी हे बुळगं बोंडल साहेब कुट! थू ऽऽ तिच्या आयला तिच्या. म्या आसा गावरान गडी पर खाल्ल्या ताटात वकनारा न्हाई. चुकुन शबूद गेला रागाच्या भरात. मला माफ करा बोंडले साहेब. पन सा वर्स नाव कमावल म्या ह्या कॉलिजच्या जीवावर......ह्ये सरस्वतीच मंदिर हाये... भाषा माजी आसुद्द आसली तरी म्या प्राद्यापक हाय, वस्ताद म्हणा हाव तर. देना-याच टांगं मोजनारी आन्ना भिंग-याची चाबरट औलाद न्हाई ही. हितनं जायाच तर मानात जाईन म्या. डाग न्हाई लावून घिनार."

"आवो इकती शिकल्याली शाणी सुर्ती मानस तुमी, ह्यो

चवकशीचा आनी फार्स करून उग कस्याला घोळात येतायसा? ह्ये कलियुग हाय.......खऱ्याच दगडं पान्यावर तरंगायचं रामायणातल दिवास आता -हायल न्हाईत पर खोटयाच दगडं बी आजून बुडत्याती. केल्याल पाप शाबित कराया बी भक्कम पुरावा मागतोय कायदा......आनीतुमी खोट शाबीत कराया निगालायसा...... बाळासाबा सारखा भुजंग फडा वर करून चालतोया आन् ह्यो नामुगडया मर्द गडी काय खाल मानेन चालेल व्हय?ह्ये प्रकरण इकत सादं सरळधोट न्हाइ......बाळासाबाचा डाव सादण्यापाई बिजली म्याडमचा बळी देणाराइसा तुमी......नामुगडे फकस्त निमित्त सादाय पुरता...... ह्ये आसल भाड खायाच काम......ह्ये सोबतय का तुमास्नी? म्या काय आज हित उद्या दुसरीकड जाईन की......हितली पुन्याई मला दुसरीकड शेर मिळवून दिलच की......पन तुमी ह्या सापाला पोसताया......ह्येची भूक वाडतच जाईल की......कुट कुट फुर पडशीला तुमी? जरा इचार करा......"

बोंडले मुखदुर्बळ असले तरी 'प्राचार्य' त्यांच्या अंगात पुरता मुरलेला! नामुगडयांच्या पाठीवर थोपटीत ते म्हणाले, " अहो नामुगडे सर ......तुम्ही राईचा पर्वत करताय.आमच्या कॉलेजची टीम युनिव्हर्सिटी लेव्हलपर्यंत जिंकून देऊन मोठा लौकिक मिळवून दिला तुम्ही......आम्ही अभिमानाने सांगतोय की सगळयांना......पण आताची ही सिच्युएशन......ती माझ्या कंट्र ोलमध्ये नाही. आम्ही काय खुशीन तुमच्या विरोधात गेलोय? इनक्वायरीच हे झंझट करायची आम्हाला थोडीच हौस आहे? आता तुमच्या विरूध्द असभ्य वर्तनाची तक्रार केली की बिजली मॅडमानी. पी.एस.आय. समोर तशी जबानी देऊन एन्.सी. झालेली आहे. आताा तुम्हीच सांगा, संस्थेची इभ्रत

आली ना धोक्यात? अहो उद्या व्ही.सी.चा फोन येईल. झालच तर येडवे साहेबांकरवी होम मिनीस्टरचा दट्टया आणील ती बया! पोरं नाक्या नाक्यावर बोर्ड लावतील की हो तुमच्या नावाचे! गाव हे अस नाठाळांच! आता तुम्हीच आपण होऊन रिझाईन करणार म्हटल्यावर काय हो! सगळा विषय मिटवायला लावतो की बिजली मॅडमना!! काय आमच्या शब्दाबाहेर जाते मॅडम बघू की......तुम्ही एक्सप्लॉईट केल म्हणजे हात तर नाही धरला त्यांचा......पहातोच मी कशी ऐकत नाही ते! तुम्ही अगदी निर्धास्त रहा नामुगडे सर......पण हे पहा......भलत सलत बोलल्याबद्दल आधी माफी मागा बर बाळासाहेबांची. पाच सहा महीन्यांनी हे प्रकरण निवळल्यावर पुन्हा फ्रेश अपॉईंटमेंट करतील बाळासाहेब तुमची!"

"डॉक्टरसाहेब!"खळखळून हसत नामुगडे म्हणाले."आत्ता खरं प्राचार्य शोबताय तुमी......वाऽऽ रे गबु......भले बहाद्दर! परसंगाला बगल कशी द्यायची ते तुम्हा कडन शिकाव की कुनी बी! पन मला आजून वळीकलं न्हाई तुमी..अहो येवडा मोठा तालेवार गडी ह्यो बाळासाहेब......आज पतुर मुत जाळतोय कॉलेजमदी......पन म्या नुसता हात बी वर न्हाई उचलला तर गप बसला की कोल्ह्यावानी......नदरला नदर द्येयाला भीतोय की आता . ह्ये वष्ट सर नाना फडणवीसच की कालिजातलं......पन त्येनी बी वळीकलं न्हाई नामुगडे सराला. म्या कच्च्या गुरूचा चेला वाटलो व्हय तुमास्नी? तुमाला कसं ठाऊक असनार म्हना. तुमी भय दावताय मला......त्ये पी.एस.आय.! गाववालं की त्ये आमच......काल रातच्याला आल्तेकी माज्या रूमवर...... बिजलीबायची कंप्लेंट खिशातच हाय की माज्या...... ही चांडाळ चौकडी बाळासायबाची......दारवेच्या नादात काय काय बोलली......त्येंचा काय बेत हाय......समदं कळलय आमाला.

तुमाला वाटतय की ह्यो बिनडोक पेलवान गडी आसल नामुगडया......त्येला चुना लावून पाटवू की! पर तुमचा डाव सादणार न्हाई आता......आनी बिजलीच भ्या कुनाला दावताय तुमी...? ह्या नामुगडयाला?अहो मर्द मराठा गडी हाय मी......लोकाच्या बायाबापडयावर डोळा ठिवणारा टोणगा - बाळासाहेब नव्हं मी ! आज सकाळी मी गेल्तो बिजली म्याडमला भेटाया...... पी.एस.आय. साहेब आल्ते माज्या बरोबर......हाय कुट तुमी......आवं ऽऽ नामजद श्याण्णवकुळी मराठयाची औलाद हाय बिजली......तिला टार्गेट करून चाबलाया बगतोय बाळासाब !"

"समदी मसलत ध्येनात आलीया तिच्या बी......अशी लांडग्या गिधाडाच्या तावडीत न्हाई घावनार ती.आन् म्या येवडा मर्द गडी हित आसताना ह्या ह्या हलकट लांडग्याचा कावा सादायला बरा दीन की! बोंडले साहेब, वष्ट साहेब आनि ह्ये बग भिंगुरटया तु बी आयक कान खोलून...... म्या नोकरीसोडून निगालोय तो बिजलीला संगत घेऊनच ! ब्यागा भरून वाट बगत आसल की ती...... जिच्यासाटन खोटयाच नाटं कराया निगालाय तुमी समदं टोणग ...... ती बिजली ...... केसाला ढका बी न लागता अल्लाद सुटली की तुमच्या जाळयातन ...... म्या सोडिवल तिला लांडग्याच्या तोंडातन!" खिशातून कागद काढून तो टेबलवर फेकून नामुगडे म्हणाले, " ह्यो घ्या माजा राजीनामा ...... विंग्रजीत हाय ...... त्या बिजली म्याडमनचं लिवलाय माज्यासाटनं ...... फकस्त सई न्हवं न्हवं त्ये आपलं शिग्नेचर......तवडी म्या केलीया ...... आनकी धा रोजानी सिंधुदुर्ग जिल्ह्याचं स्पोरट् ऑफीसर म्हणून जॉईन होतोय मी ......!" पालथ्या पंजाने मिशा सारख्या करीत छातीपुढे काढून दमदार मार्चपास्ट करीत

नामुगडे केबिन बाहेर पडले.वष्ट, बोंडले अन् बाळासाहेब अवाक् होऊन पहातच राहीले. बाळासाहेब चितागती झाल्यागत विचार करून -हायले की, ‘ ह्या नामुगडयान बिजली मॅडमला यक्सप्लाईट केल म्हणजे नेमकं काय बरं केल असेल?’

☺ ☹ ☺

# ४. बॅड कमाण्ड

कमांड-डॉसमध्ये काम करताना गोपूची नजर फिरून फिरून कुंदनकडे वळत राहिली... प्रॉम्पटस् चुकत गेले... मॉनिटरच्या स्क्रीनवर बॅड कमाण्ड..... बॅड कमाण्ड असा रिस्पॉन्स मिळत राहिला. सकाळी असाईनमेंट सुरू केल्यावर असाच घोळ होत गेला.ग्राफिक डिझायनिंगमधल्या फाईल्स उडाल्या. जॉब पूर्ण करणं दूरच... डिस्टर्ब झालेली विंडो फॉरमॅट करून नव्याने सेटअप मारायचं झंझट मागे लागलं. नव्यानं ट्र ेनिंग मधे रूजू झालेला गोपू... डॉस प्रॉम्पटस् देताना आधीच कोण टेंशन यायचं... त्यात माथं फिरवायला शोल्डर कट टॉप घालून टंच दिसणारी, मधाळ हसणारी कुंदन! सेटअप मारून वैतागलेला गोपू ताडकन उठून मागे वळूनही न पहाता ए.सी. कॉंप्युटर लॅब बाहेर आला. हात ताणून आळोखे पिळोखे देताच मणक्यातून कटाकटा आवाज आले. थोडा रिलीव्ह झालेला गोपू टॉयलेटमध्ये शिरला. बेसिनचा नळ सोडून गार पाण्याचे सपकारे तोंडावर मारून जरा फ्रेश झाला. सालं हे असंच होत राहिलं तर सीडॅकमधलं ॲनिमेशन, ग्राफिक डिझाईन कसं काय पुरं व्हायचं... इथे दांडी उडाली तर मग जॉब सिक्युरिटी... काकांकडून, आत्याकडून कोर्ससाठी कर्जाऊ घेतलेली चाळीस हजाराची मोठी अमाऊंट... ती कशी काय फेडायची? छे... छे साला हा पोरींचा फंद आपल्या सारख्या थर्डरेट मिडलक्लासवाल्यांसाठी नसतोच मुळी.

पॅव्हेलियन समोरच्या लॉनमध्ये, कोपऱ्यातल्या गुलमोहोराच्या

झाडाखालची पेटंट सीट गाठून गोपूनं चक्क मारूती स्तोत्र म्हणायला सुरूवात केली. 'ध्वजांगी ओचली बाहो आवेशे लोटिला पुढे...' मनात मात्र विचारांची वेगळीच आवर्तनं सुरू झालेली. कर्दळीच्या फुलासारखी सोनवर्णी रसरशीत अंगकांती असलेली कुंदन... खुडिपाटच्या कोनीत गर्द हिरवी बकुळीची झाडं बघून 'हौ नाईस... सिंपली बिवीचींग' म्हणत सित्कार करणा-या कुंदनला आपल्या पुष्ट भुजांवर अल्लाद उचलून गोपू धावत सुटला. बकुळीच्या फुलांची पखळण पडून गंधमय झालेली पाण्याची तळी...कुंदनला धप्पकन त्या तळीत टाकून गोपू अनिमिष नेत्रांनी बघतच राहिलेला. 'पुच्छ ते मुरडिले माथा किरीटी कुंडले बरी...' तोच चरण पुन्हा पुन्हा आर्वतन घेत राहिला... हनुमान जन्माचं आख्यान ऐन रंगात आलेलं... 'न्हाणी न्हाणी त्या निर्मळाते न्हाणी हो' रसाळवाणीने भिडे बुवांचा पाळणा सुरू झाला... सेवेकरी चंदनी पाळण्याच्या दोहो बाजूला उभे राहून खणाच्या कुंचीत वेष्टीलेला असोल्या नारळरूपी बाळ हनुमान पाळण्याच्या वरून खालून गोविंद घ्या ऽऽ गोपाळ घ्या म्हणत एकमेकाहाती सोपवल्यावर अलगद पाळण्यात ठेऊन झोप्या काढीत राहीले... छोटा गोपू हनुमान जन्माचं ते कौतिक डोळयात साठवत राहिला.

हनुमान जयंतीच्या उत्सवातली कीर्तनं हे भिडेबुवांच वर्षासन...अशीच कुठे कुठे वर्षासनं असायची... कीर्तनाच्या तुटपुंज्या मिळकतीवर खुटु रूटु चाललेला त्यांचा संसार... या वेळी छोटा गोपू हट्ट करून बाबांबरोबर आलेला... तालाचं ज्ञान अगांत जन्मजात असलेला गोपू झांज किती सुरेख वाजवायचा... तबलजीच्या चुकलेल्या मात्रा कळायच्या ... बुवांचा तराणा ऐन रंगात आला, लय वाढू लागली की तबलजीची उडणारी तिरपीट अचूक हेरून मुरब्बी हसणारा गोपू ... पोराला उपजत तल्लख कान आहे ... आवाजसुध्दा ब-यापैकी गोड

आहे ... कीर्तनकार झाला तर भिडे घराण्याचा वारसा संभाळून लौकिक करील ही बुवांची इच्छा. पण हा दरिद्री पेशा पत्करून दरवेशागत हिंडायचं, रिकामी झोळी हालवीत गाठीला गाठ मारून पोट जाळीत रहायचं ... त्या पेक्षा शिकून सवरून नोकरी मिळाली तर घरातलं दैन्य तरी फिटेल ... ’ ही गोपूच्या माऊलीची इच्छा ... यावेळी ती माहेरी गेलेल्याचा मोका साधून गोपू त्यांच्याबरोबर आलेला ... आई असती तर चार दिवस शाळा बुडवून कीर्तनं ऐकायला जायची त्याची काय बिशाद...!

गोपू तीन वर्षाचा झाल्यापासून त्याला शिक्षणाचं बाळकडू पाजायची आईची जिकीर सुरू झाली. स्कॉलरशिपमध्ये तो जिल्ह्यात पहिला आला. पुढे इंग्रजी शाळा सुरू झाली. पहाटे नित्यनेमाने अभ्यासाला बसवून तिने गोपूचा अभ्यास मागे पडू दिला नाही. तो ८९ % मार्क्स मिळवून एस्.एस्.सी पास झाला. तालुक्याला नव्याने सुरू झालेल्या सायन्स शाखेतले प्राध्यापक त्याला मुद्दाम भेटायला आलेले.

एफ.वाय.बी.एस्सी पासून तर रोजच्या एष्टीच्या वाऱ्या करण्यात अभ्यास बुडेल म्हणून आईनं तालुक्याला कॉलज संनिध बिऱ्हाड केलं. गोपू ‘ए’ गुप घेऊन डिस्टींक्शन मध्ये बी.एस्सी झाला. आता पुढे काय करायचं? विद्यापीठात राहून एम.एस्सी करणं खर्चाच्या दृष्टीने आवाक्या बाहेरचं...पण परमेश्वरानं सत्व परीक्षा घेतली नाही. नेमक्या त्याच वेळी नाशिकच्या बँकेत सर्व्हीस करणारे गोपूचे काका सहाय्याला आले. गोपूने नाशिक गाठलं. टाईम्स ऑफ इंडियातली जाहीरात वाचून फॉरीन कंपनीत ॲप्रेण्टिसशीपसाठी त्याने अर्ज केला. हजारोंच्या संख्येने आलेल्या अर्जाना चाळणी लावून कंपनीने नेमके पाचच उमेदवार निवडले. गोपू, मुकेश हिरचंदानी, कुंदन

पितलिया, प्रणीत मुकर्जी, रॉजर गोन्सालविस ही पाच टॅलेंटेड मुलं ॲप्रेण्टीस म्हणून रूजू झाली. गोपू सोडला तर उरलेली मुलं सुखवस्तु श्रीमंत कुटुंबातली. पण गोपूचा स्मार्टनेस ओळखून कलिग्ज त्याला बरोबरीनं वागवायचे. कुंदन पितलिया तर चक्क त्याच्यावर भाळलीच. गोरापान, चित्पावनी निळसर घा-या डोळयांचा, सशक्त अंगकाठी असलेला सात्विक वृत्तीचा गोपू... 'घाटी है लेकिन लेडीकिलर है' कुंदन म्हणायची.

ॲप्रेण्टिसशीपचं वर्षभर चुटकीसरशी संपलं. जॉईण्ट डायरेक्टर खोसलानी सगळयांची मिटींग घेतली. "कंपनी कॉंप्युटर सॉफ्टवेअर, ग्राफीक डेव्हलपमेंट लॉंच करू इच्छितेय... पाचही जणानी सीडॅक जॉईन करा... नव्या प्रोजेक्टाध्ये पाचही जणाना पाच स्वतंत्र सेक्शन्समध्ये असिस्टण्ट डायरेक्टर म्हणून कंपनी अपॉईट करील. कंपनीकडे फायनान्स अपुरा आहे... कोर्स फी तुम्ही बेअर करा. कंपनी स्टायपेंड सुरू ठेवेल. कोर्स कंप्लीट केल्यावर ट्वेंटी फाईव्ह थावजंट रूपीज पर मंथ, स्वतंत्र कार असं ॲग्रीमेंट करून देतो." ऑफर चॅलेंजिंग... कंपनी बॉण्ड करून द्यायला तयार... पाचही जणानी पूर्ण विचार करून 'हो' म्हणायचं ठरवलं. इतर चौघाना घरच्यांचा फक्त कन्सेण्ट अपेक्षित... गोपूला मात्र समोर सत्तर ऐंशी हजारांचा खड्डा दिसायला लागला. आई बाबांचा सल्ला घ्यायला चार दिवसांची रजा घेऊन गोपूनं खुडीपाट गाठलं.

संध्याकाळच्या वेळी झोपाळयावर बसून परवचा म्हणण्या ऐवजी हिंदी गीताची धून आळवीत गोपू शीळ घुमवित राहिला. शहरी पाणी अंगात मुरून पोर बहकला तर नाही ना अस मनाशी म्हणत आई बाहेर आली. "गोपू ऽऽ कातरवेळ झालीए. असं अवेळी शीळा घालणं बरं नव्हे. जरा रामरक्षा म्हण... तोच आपला वाली...

निर्वाणीच्या वेळी तरी देवाचं नाव तोंडात येऊ दे...” काहीतरी उडवाउडवीचं उत्तर देणं अगदी तोंडावर आलेलं. पण प्रसंग ओळखून गोपू रामरक्षा पुटपुटायला लागला. पोरानं गरीबपणानं ऐकून घेतलं... अगदीच वाह्यात नाही झाला अजूनही. आईला वाटलं. गोड आवाजात आई बोलली, “ अरे गोपू असं तोंडातल्या तोंडात काय पुटपुटतोस...? मला माहितीय्... वर्षभर सगळा अनाध्याय... बिनचूक म्हणता येईल अशी खात्री नाही तुला... चल आपण दोघानी मिळून म्हणूया...” मुलाजवळ झोपाळयावर बसून तिनं रामरक्षा सुरू केली.

रात्री जेवणखाण झाल्यावर आईनं हडपा मोकळा केला. जीव जीव म्हणून राखलेली ठेव आईबाबानी मोजली. सहा हजार रूपयात वीस कमी भरले. गोपूने स्टायपेंड मधून दरमहाच्या खर्चाचे एक हजार काकाना देऊन साठवून ठेवलेले साडेअकरा हजार... त्याच्या भरीला आईचं स्त्री धन एकदाणी, अग्रफूल, बुवांचा सल्लेजोड अन् भिकबाळी, गोपूच्या मुंजीत हौसेनं केलेली हसोळी... सगळी मिळून तीसेक हजारांची भर झाली. “आमची आमदनी एवढीच... निम्मे खर्चाची भर सुध्दा नाही... पण तू काळजी करू नकोस... भगवंताच्या मनात असेल तर तो कुणाच्या ना कुणाच्या रूपाने उभा राहील... चार दिवस निश्चिंत रहा... आमची पुण्याई अजून शिल्लक आहे...” बुवानी उपोद्घात केला. ताण कोणाच्याच मनावर नव्हता. इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत सगळीजणं निश्चिंत झोपली.

बुवांचा विश्वास फळाला आला. काका, कमल आत्ते दोघानी स्वत:हून मदतीचा हात पुढे केला... चुटकीसरशी रक्कम उभी राहीली. आई बाबांच्या श्रध्दा-संस्कार यांची शिदोरी घेऊन गोपू मोठया उमदीने नोईडात सीडॅक साठी रूजू झाला. हे ट्रे निंग अक्षरश: घामटं काढणारं! रोज १४|१६ तास हार्डवर्क... लॅब चोवीस

तास उघडी असायची. कधीही जाऊन प्रॅक्टिस करीत बसायची मुभा... नव्हे ती जणू सक्तीच! काही वेळा असाईनमेंट पुरी करण्याच्या नादात जेवण सोडाच , साधा चहा घ्यायचीही फुरसत मिळणं मुष्किल व्हायचं. बेसिक फंक्शन, डॉस कमांड झाल्यावर ॲनिमेशन, ग्राफिक डिझाईन सेशन सुरू झालं. आय. आय.टीतले एक्सपर्ट रिसोर्स पर्सन अभ्यंकर सर आलेले... एक एक चॅलेंजिंग जॉब द्यायचे. त्यानी एडस्वर आधारीत होर्डिंग करायचं असाईनमेंट दिलेलं...

नोईडात जॉईन झाल्यापासून कुंदनची गोपुशी सलगी वाढलेली. उज्ज्वल भविष्याची चाहूल, मोकळं वातावरण आणि प्रदीर्घ सहवास यामुळे हळूहळू गोपूही कुंदनमधे इनव्हॉल्व्ह होऊ लागलेला. मुकेश, प्रणव गोपूवर अक्षरश: जळायचे. कुंदनचा वचपा काढण्यासाठी कॉलगर्ल्स शोधीत हिंडायचे... भविष्याची चिंता नव्हती... पैशाची कमतरता नव्हती... हेवी फिज देऊन कोर्स जॉईन केलेला... नापास व्हायची चिंताच नव्हती... दिल्लीचा मझा पुन्हा चाखायला मिळणार थोडाच... कुंदन नही तो और सही...

त्या दिवशी कहरच झाला. वैतागून गुलमोहोराखाली बसलेला गोपू भानावर आला तो कुंदनच्या 'हाय स्वीट' या शब्दानी... 'चलो कॉफी पिएंगे' तीनं इनव्हाइट केलं. कँटिनमधे बसल्यावर लाडिकपणे कुंदन म्हणाली, " देखो गोपूऽऽ ये दूरी अब कितने दिन रहेगी? हमको तो सहा नही जाता... आज हमारी पार्टनर्स छुटी मनाने गई है ... मैं रूमपर अकेली हूँ... तू ऐसा कर... नौ बजे रूमपर आ जाओ ... मैं वही पर टिफीन मंगाऊँगी ... और बादमें ... तू समझ गया ना ? जरूर आओ... मैं राह देखूँगी..."

कुंदनची ऑफर ऐकून गोपू अक्षरश: उडालाच. विवाहपूर्व संबंध... छे... छे... अब्रह्मण्यम्... भलतंच... "तू पागल हो गई क्या?

शादी के पहले ये बाते सोचना भी पाप है कुंदन... बस्स एक दो साल सबर करो... फिर शादी मनाएंगे..." गोपूला थांबवीत कुंदन उसळून बोलली, "ए बुद्दुऽऽ तु कौनसे जमाने की बात कर रहा है रे? बडे भागसे ये मौका मिल रहा है... तू हां कह दे... रूम पर आ जाओ तो... फिर देखती हूँ... शादी ब्याह की गाँठ तो उपरवाले के हाथ में है... फिर घरवालों की एक्सपेक्टेशन भी क्या होगी राम जाने... शादी तो अपने बस की बात थोडी ही है...? आज मौका है खुशिया मनाएँगे... कल क्या होगा कौन बता सकता है...?"

गोपूला काही सुचेनासं झालेलं... कुंदनची जात-संस्कृती, संस्कार आई बाबाना कितपत रूचतील हा प्रश्नच! बाबा कदाचित संयम दाखवतील... आईला सुध्दा आवरतील... सगळं खरं पण उंब-याच माप ओलांडून आत गेल्यावर कुंदनसह आईला नमस्कार करताना तिच्या नजरेला नजर देण्याचं धैर्य आपल्याला होईल का? बिनदिक्कतपणे विवाहापूर्वी शेज सजवायला तयार असणारी बिनधास्त कुंदन...! सणावाराला सोवळयानं स्वयंपाक करणारी... वैश्वदेव, नैवेद्य झाल्याशिवाय अन्न ग्रहण म्हणजे पाप समजणारी संयमी आई...!

त्याच्या मनात व्दंव्द सुरू झालं... कुंदनची ऑफर हा पौरूषाचा जणु सन्मान... कुठल्या खुळचट विचारंच्या आधीन होऊन ही सुवर्ण संधी दवडायची म्हणजे चक्क मुर्खपणा... आपण काँप्युटरच्या युगातले आहोत... स्त्री पुरूष संबंध हा निसर्ग आहे... हा दोघांच्याही खुशीचा मामला... मनाशी निर्धार करून कुंदनला आवडणारी ॲश कलरची सफारी घालून गोपू रूम बाहेर पडला... तो मेन रोडला आला तेव्हा समोरचं दृष्य आपण नव्यानेच पहतोय अशी जाणीव त्याला झाली. आजपर्यंत कामाच्या धिबीडग्यात ह्या सगळया गोष्टी कधी डोळाभर बघितलेल्याच नव्हत्या. समोर क्रॉसिंगच्या बाजूला कचरा कुंडीच्या मागे

भिंतीवर लावलेलं एडस्चं होर्डिंग... ‘यौन संबंध जब जब... कंडोम तब तब’ कडेला उघडया गटाराच्या बाजूला हारीने लावलेल्या भेलपूरी, कुल्फीच्या हातगाडया...

गटराच्या दुर्गंधीची, गलिच्छ कचरा कुंडीची पर्वाही न करता भेलपूरी, भजिया, पाव चबाचबा खाणारी थर्डक्लास माणसं... त्याला अक्षरश: शिसारी आली. नैवेद्य दाखविल्याशिवाय पंचपक्वान्नाना सुध्दा रूची येत नाही. चंदनी पाट, स्वच्छ धुतलेलं केळीचं पान, त्यावर सुबक वाढलेलं अन्न, ताटाभोवती रांगोळीची वेलबुट्टी अन् समोर मंद गंध पसरीत जळणारी उदबत्ती... अन्न पूर्णब्रह्म वाटतं ते त्यामुळे... बुवानी कुठल्याशा कीर्तनात पूर्वरंगाला केलेलं निरूपण त्याला आठवू लागलं... ‘स्थल काल स्थितीचं भान ठेऊन वागतो तो मनुष्य... दमन, शमन, उन्नयन ही आर्य संस्कृतीची त्रिसूत्री... विधीनिषेधांच पालन हा मनुष्य धर्म... नव्हे नव्हे विश्वधर्म...!

निषिध्द गोष्टीना निसर्गधर्माचा मुलामा देऊन स्वत:च्या शेण खाण्याचं निर्लज्ज समर्थन?बॅड कमांड... बॅड कमांड ! मन:चक्षू समोरच्या अंधा-या पटलावर उमटणारी बॅड कमांडची पांढरी शुभ्र अक्षरं आईच्या आवाजात बोलायला लागली. रामरक्षेतले चरण कानात घुमायला लाग्ले... “जितेंद्रियं बुध्दीमतां वरिष्टम् वातात्मजं वानर युथ मुख्यम्...” गोपू क्षणभर थांबला. मग निर्धारपूर्वक त्यानं कॉम्प्युटर लॅब गाठली. सी. पी. यू. चंबटण स्वीच ऑन केलं... विंडोफ्लिकर झाली... “इंप्रॉपर शट डाऊन डिटेक्टस...” मेसेज आला.

खुशीत हसत गोपू पुटपुटला, “गडया ऽऽ कॉम्प्युटरा ! विंडो प्रॉपरली शट डाऊन नाही झाली तरी चालेल... फाईल्स लॉस्ट झाल्या, करप्ट झाल्या तर पुन्हा सेटप् मारून ताळयावर आणीन मी तुला... आता मला छान जमतंय की ते ! तुला संभाळायला मी समर्थ

आहे... अन् तु सुध्दा बॅड कमांडचा मेसेज देऊन ताळयावर ठेवलस की गडया मला...” मग तो सकाळी दिलेल्या जॉब मध्ये गढून गेला. दुस-या दिवशी अभ्यंकर सर गोपूच्या ग्राफीकवर जाम खूश झाले.



"बॅक ग्राऊंडला लाल-जांभळी सर्कलस्... कचरा कुंडीच्या बाजूला तंग कपडयातल्या तरूणीची निळसर धूसर आकृती... तिच्या बाजूला क्षितीजापर्यंत विरत गेलेला रस्ता आणि कचरा कुंडी जवळचं रोड क्रॉसिंग... तुम्ही कुठच्या दिशेला वळणार हे क्रॉसिंग जवळ ठरवा असंच जणु सुचवायचय्... मर्यादा सुचविणारी जणू ती लक्ष्मण रेषा अन् कोप-यात हताश चेहे-याचा तरूण... रिअली मार्व्हलस... सगळयाच्या वरकडी म्हणजे होर्डिंगला दिलेलं शीर्षक... 'रिस्ट्र ेंट इज बेटर दॅन रिपेंटन्स... पश्चात्ताप करण्यापेक्षा संयम ठेवा... वेरी नाईस... आत्मसंयमन, मर्यादापालन हेच एडस् वरचं खरं उत्तर आहे...!' त्यांनी दिलखुलास दाद दिली.

अभ्यंकर सरांच सेशन आटोपल्यावर लंच घ्यायला गोपू लॅब बाहेर आला. पाठोपाठ कुंदनही आली. पॅसेजच्या बाहेर आल्या आल्या त्याचा हात खेचून थांबवीत ती फसफसली, "यू मीन... यू चिटेड मी... तू मर्द कहने के लायक नही रहा... तुमने मुझे क्या समझ रखा है? तू तो बिल्कुल घाटी निकला !" तिचा हात झिडकारून गोपू म्हणाला, " प्लीज होल्ड ऑन युअर टंग मिस् कुंदन... खुदको सुश्मिता समझती है क्या? तू पागल कुत्ती है कुत्ती...! मै मर्द हूँ! लेकिन मेरी मर्दानगी तुम क्या खाक समझोगी... आय् ॲम नॉट मेल प्रॉस्टीटयूट...! और देखो... फिर कभी मेरी औकात निकाली ना तो जबान खिंचके रखदूँगा! जा किसी कुत्ते को ढूँढ..."

कुंदनने त्याचा सल्ला शब्दशः अमलात आणला. संध्याकाळीच ती मुकेशला घेऊन बाहेर पडली. मग जसा रतिबच सुरू झाला.प्रणीत मुकर्जीला संधी मिळाली. बिचारा रॉजर गोन्सालविस...! काळा कुट्ट... दात पुढे आलेले... तोंडावर देवीचे व्रण... त्याचं भाग्य मात्र उजळलं नाही. मुकर्जी पाठोपाठ कुंदननं थेट कॉम्प्युटर

इन्सट्र  क्टर चोपडांशीही सूत जमवलं. कोर्स पूर्ण झाला. फायनल एक्झाम झाली. रिझल्ट दुस-या दिवशीच जाहीर झाला. कुंदन आणि गोपूला ए ग्रेड तर रॉजर, प्रणीत, मुकेश याना सी प्लस मिळाली. चमू नाशिकला परतला. कंपनीच्या बॉण्डप्रमाणे पाचही जण पाच वेगवेगळया ब्रँचेसमध्ये रूजू झाले. पाच सहा महिन्यानी कुंदन मॅरेज इन्व्हिटेशन कार्ड द्यायला गोपूच्या ब्रँचमध्ये येऊन गेली. तिने उत्तमचंद नावाचा कुणी जातवाला गाठलेला.

सगळे कलिग्ज शादीशुदा झाले. गोपू सेटल होईपर्यंत दोन अडीच वर्ष थांबला. मग मात्र आईने जशी मोहीमच उघडली. शोध चवकशा करून आपल्या माहेरच्या नातेसंबंधातली कुणी योगिता नावाची बी.एस्सी. झालेली मुलगी तिनं हेरली. पत्रिका बत्तीस गुणानी जुळली. मुलामुलीची पसंती झाली आणि साखरपुडा पार पडला. पत्रिका छापून झाल्यावर चारही कलिग्जना गोपूने समक्ष निमंत्रण द्यायचं ठरवलं. तो इनव्हाईट करायला गेला तेव्हा कुंदन सिकनोट देऊन घरी असल्याचं कळलं. तो मुद्दाम तिच्या स्टाफक्वाटर्सवर गेला पण तिथे कुलुप लावलेलं... कुंदन कुठे गेली समजलं नाही.

कणकवलीच्या मंगल कार्यालयात गोपूच्या लग्नाला मॅनेजिंग डायरेक्टर आणि इतर टॉपरँकचे ऑफिसर्स कंपनीची स्पेशल गाडी घेऊन आले. कलिग्ज पैकी फक्त रॉजर एकटाच आला. अहेराची धामधूम उरकल्यावर रॉजरनं तोंड उघडलं, “गोपू तुम्हे कुंदन के बारे मे कुछ पता लगा?” गोपू उत्तरला, “नही तो... मै खुद उसे इन्व्हाईट करने गया था... लेकिन कुंदन सीक नोट देके बाहर गई थी... वो क्वार्टर में भी नही थी...” दीर्घ उसासा सोडून रॉजर म्हणाला, “तुम्हे पता नही शायद... कुंदन बहोत बीमार है... उसकी एम्. आर्. आय्. हुओ... एच.आय्.व्ही. पॉझिटीव्ह रिपोर्ट है... उसे जसलोक में

ॲडमिट किया है... वो चोपडा साब कंप्यूटर इन्स्ट्र क्टर! वो तो उपर गये... !! पंद्रह दिन पहले मै दिल्ली गया था... नोईडा से होके आया...वहाँखबर मिली...वजह एकही है... एच.आय.व्ही. पॉझिटीव्ह...! हिरचंदानी और मुकर्जी सलामत है लेकिन... गॉड ब्लेस देम... वो भी इस चक्कर में फँसनेवाले है...! ये व्हिशस सर्कल है गोपू... पूरा होकर ही रहेगा...!! तुझे तो बुद्दुपन ने बचाया... और मैं... बुरे रंग की वजह से मैं बच गया रे ! वरना...... !!!”

OOOOOOOOOOOOO

# ५. जांभळीचा साणा

अच्युतरावांचा निरोप सांगायला शिपाई भिकु गोताड परटवण्यात बाबा भिशांच्या घरी गेला.त्यांचा मुलगा घन:शाम नुकताच बी.एस्सी.झालेला.त्याला अच्युतरावानी भेटायला बोलावल म्हणजे पटवर्धन हायस्कूलमध्ये नोकरी संदर्भातच विचारणा होणार असं बाबा भिशांनी गृहित धरल.त्याना शिक्षकी पेशाचा फार अभिमान वाटायचा.चहा घेता घेता त्यानी भिकुकडे खडा टाकला.भिकु अच्युतरावांच्या खास मर्जीतला. बऱ्याच आतल्या गोटातल्या बातम्या त्याला असायच्या.पण तो नकारार्थी मान हालवित बोलला,"तसा काय माला वाटत नाय, कारण आमच्या सालंत हिंदीची जागा मोकली झालली हाय.तुमचा श्यामा बी.एस्सी.हाय म्हंजे तसा काय नसनार.आनी म्हत्वाचा म्हंजे आमच्या संवस्थेत सगला बामनी काम सामनी,बामनांशिवाय दूसऱ्या जातवाल्यान्ला संवस्था घेयाची णाय.पन सायबानी माला पाटवला म्हंजे कायतरी म्हत्वाचाच काम आसेल."भिकु निघुन गेला आणि झटपट तयारी करून शाम बाहेर पडला.

शाम गाडी तळावर पोचला तोवर अच्युतराव लता टॉकीजकडून येताना दिसले.तीनचा सिनेमाचा शो सुरू झाल्यावर ते अधुन मधुन टॉकीजवर फेरी मारायचे.चुकुन माकुन कोणी विद्यार्थी शाळा चुकवून सिनेमा बघायला गेलेला असलाच तर तो अचुक सापडायचा.सरानी हसून शामच्या पाठीवर थोपटीत म्हटल,"लेका, फर्स्ट क्लासमधे पास झालास ना? मग पेढे कुठे आहेत?" शाम मानखाली घालत म्हणाला,"म्हणजे येणार होतो सर पण....सर अजुनही

तुम्हाला भेटायला यायचं म्हणजे भिती वाटते."दिलखुलास हसत सर म्हणाले,"अरे वेडा की काय तू ,आता तू मोठा झालास.फर्स्ट क्लास मिळवुन पास झालास. मला अभिमान वाटतो माझा विद्यार्थी ग्रज्युएट झाल्याचं ऐकल्यावर." बोलता बोलता गोखले नाका आला.शामच्या खांद्यावर हात टाकीत अच्युतराव म्हणाले,"चला लेको आज छाया हॉटेलमध्ये पॅटिस खाऊया."वेटरला ऑर्डर दिल्यावर सर सांगायला लागले.

"तु पुढे काय करायचं ठरवलयस्?काल हेडमास्तरांची मिटींग होती. माझे एक स्नेही आहेत गाखलेसर .तुला आचरा माहिती आहे?मालवण तालुक्यातलं गाव आहे.त्याच्या शेजारचं गाव भगवानगड.तिथे हायस्कुल आहे .त्याना गणितचा शिक्षक हवा आहे. तु जा तिथे." शाम सरांच बोलण ऐकून सटपटला. "पण सर.... मला जमेल शिकवायला? आणि मला खर तर बँकेत जॉब करायची आवड आहे." पॅटिस खाता खाता सर म्हणाले,"तुला बँकेत जॉब करायचाय् हे ठीक आहे.शाळेपेक्षा बँकेत पगार चांगला असतो हे खरच पण बँकेत जॉब मिळेपर्यंत रिकाम बसण्यापेक्षा तु मिळतेय ती नोकरी स्वीकार. बँकेच्या परीक्षा, इंटरव्ह्यू प्रयत्न सुरू ठेव. बँकेत सिलेक्ट झालास तर जा मग .मी गोखलेसराना तशी कल्पना देतो." पॅटिस संपल्यावर वेटरला दोन कॉफीची ऑर्डर सांगतानाच वीस रूपयांची नोट देत सर म्हणाले,"आजची पार्टी मी दिली.तुला बँकेत जॉब मिळाला की तुझ्याकडुन मी पार्टी घेणार."

अच्युतरावांची चिठ्ठी घेऊन शाम भिसे रवाना झाला.कणकवलीला ऊतरून गाडीची चौकशी केली. तासाभरातच आचरापार गाडी लागली तिकिट काढताना त्याने कंडक्टरकडे चौकशी

केली . नशिबाने हायस्कुलचे सुपरवायझर जोशी त्याच गाडीत होते . त्यांच्याशी कंडक्टरने त्याची गाठ घालुन दिली . जोशीसर शामला घरीच घेऊन गेले . "भिसेसर,आपण आंघोळ करू, चहा फराळ करू आणि मग शिस्तीत सराना भेटायला जाऊया ." जोशीसरांच्या आदरातिथ्याने अन् त्यापेक्षाही सर असा त्याचा उल्लेख ऐकुन शाम भलताच ओशाळला . तासाभरातच दोघेही हेडमास्तरांच्या घरी पोचले . सरानी अच्युतरावांची चिठ्ठी वाचली . "ठीक आहे, तुम्ही कसलीही काळजी करू नका . दोन दिवसात तुमच्या खोलीची,जेवणाची व्यवस्था करूया . तोवर तुम्ही शाळेच्या होस्टेलमध्ये थांबा ."त्यावर जोशीसरानी शामची सोय लागेपर्यंत त्याला आपल्या घरीच ठेवायचा आग्रह केला .

हायस्कुल सुरू होऊन पंधरा वर्ष झालेली . पण गणितासाठी बी . एस्सी . मथ्स शिक्षक शाळेला प्रथम शामच्या रूपाने मिळालेला . सगळया गावालाच या गोष्टीचं अप्रुप . नववी,दहावीची एक एक तुकडी आणि भिसेसर नाही नाही म्हणत असतानाही अकरावी एस . एस्सी . च्या दोन्ही तुकडयांच गणितही गोखलेसरानी त्यांच्यावरच सोपवलं . अच्युतराव पटवर्धनांसारख्या नामवंत हेडमास्तरांची शिफारस गोखलेसरांना पुरेशी वाटली . जोशी आणि गोखले दोघांच्याही अचूक मार्गदर्शनाखाली भिसेसरांची करियर सुरू झाली . गोखलेसरानी शाळे जवळच भावल्या गावकराकडे दोन खोल्यांची जागा बघून दिली . स्वतः आणि लक्ष घालुन खोलीत आंघोळीसाठी मोरी बांधून घेतली . शाळेत इन्स्पेक्शनला साहेब येत कधि ऑडिटर येत तेव्हा त्यांच्या जेवणची व्यवस्था शाळेचा शिपाई जगन देवळी करायचा . जेवणारी मंडळी अन्नाची तोंडभरून वाखाणणी करीत . भिसे मांसाहारी असणार हे ओळखुन जेवणाची व्यवस्था गोखलेसरानी जगन देवळयाकडे लावुन

दिली. त्यांच्यासाठी आठवडयातून दोन तीन वेळा मांसाहाराची सोय करण्याची सक्त सुचना जगनला दिली. सगळया मंडळींच्या अगत्याने शाम एवढा भरावून गेला की त्याने कामाला अगदी वाहून घेतल.

त्यावेळी अकरावीला बोर्डाची परीक्षा हा शाळांचा मानबिंदू समजला जायचा. भगवानगड हायस्कुलमध्ये गणिताचा क्वालिफाईड शिक्षक नव्हता. बी.एस्सी.मथ्स शिक्षकच मिळणं मुष्किल होतं.गणिताचा रिझल्ट म्हणजे शाळेचा रिझल्ट हे समिकरण आहे.असं गोखलेसर नेहमी म्हणायचे.भिसे सराना प्रोत्साहन देऊन शाळेचा रिझल्ट सुधारण्याच्या खटपटीत सर गढुन गेले.भिसे हुशार, होतकरू निघाले. अकरावीच्या प्रश्नपत्रिकेचा ढाचा लक्षात घेऊन हुकमी गुण मिळवुन देणाऱ्या गणितांचा सराव हा गोखलेसरानी दिलेला गुरू मंत्र भिसेसरानी अंमलात आणला.न रागावता न मारता मुलाला समजेपर्यंत तोच तोच भाग शिकवणारे भिसेसर मुलांचे लाडके सर बनले.गणितासाठी रोज जादा तास सुरू झाले.मुलांची नियमित हजेरी रहावी,आबधाक रहावा,आपल्यालाच कामाला लावल असं भिसेसरना वाटू नये म्हणुन हेडमास्तर आणि सुपरवायझर दोघेही रोज आळीपाळीने जादा तासाना शाळेत हजर रहात.भिसेसर तास घेऊन स्टाफ रूम मध्ये आले की गरमागरम कॉफीचा कप मिळेल अशी सोय असायची.

भिसेसरांचं शिकवणं, जादा तास हा गावात मोठा कौतुकाचा विषय झाला. गावातले प्रतिष्ठित लोक, व्यापारी भिसेसर रस्त्यात दिसले की हसुन आदराने रामराम करीत.सर संध्याकाळी आचरा तिठयापर्यंत फिरायला जात.तिठयावर अशोक बागवेच्या टपरीत सर गेले रे गेले की अशोक दुकानातली एकमेव खुर्ची त्यांच्यासाठी मोकळी करायला लावायचा. हायस्कुलमध्ये सरांच्या बरोबरीच्या वयाचा कुणिच शिक्षक नव्हता.मग सर एकटेच फिरायचे.आचरा बंदर, माऊलीच

देऊळ, वायंगणिचा सडा अन जांभळीच्या साण्यावरची देवराई, तिथे डाक बंगल्या समोरचा ऑबझर्वेशन पॉईंट सराना आवडायचा. डाक बंगल्या समोर पन्नास फुट खोल कडा अन त्यापुढे उसळणारा अरबी समुद्र हे दृष्य खुपच लोभसवाणं दिसायच.तिथे चोविस तास झुळु झुळु वारा लागायचा.या गोष्टी अचुक हेरून ब्रिटिश काळात कुणि कलेक्टरने तिथे डाक बंगला बांधला.पण तो भाग एका बाजुला निर्मनुष्य.कुणीच त्या बाजुला फिरकत नसे.पण तो स्पॉट सराना भलताच आवडायचा त्यानी आपल्या वर्गाच वनभोजन मुद्दाम जांभळीच्या साण्यावर नेलं.

जगन देवळीसरांचा डबा दुवक्त खोलीवर पोच करायचा.पण एका रविवारी त्याने सराना घरी जेवायला बोलावलं. त्याच घर सरांच्या खोलीपासुन हाकेच्या अंतरावर.बारा  वाजता सर जगुच्या घरी पोहोचले.अंगणात पाऊल टाकल्यावर दारासमोर काढलेली रांगोळी सराना खुपच आवडली.सदु स्वागताला पुढे आला.सर ओसरीवर जाऊन झोपाळयावर बसले.ओटीच्या दारावरचं सुंदर विणलेलं तोरण भरत कामातल्या कौशल्याची साक्ष देणार होतं.त्या बाजुच्या भिंतीवर साईबाबांच वॉटर कलरमध्ये रंगवलेलं  सुंदर चित्र! न राहवून भिसेसर म्हणाले,“जगन, हे तोरण कुणी विणलेलं?” “ते होय माझ्या भावाची मुलगी आहे सुनीती तिने विणला.आणि साई बाबांच चित्र पण तीनेच काडलला आसा.”सर कौतुकाने म्हणाले “व्वा ! आर्टिस्ट दिसतायत.”खोखो हसत जगन उत्तरला,“कसली आर्टिस घेवन् बसलास.गेल्या वरसाक अकराव्वीत नपास झाल्ला.तसे अडसट टक्के मिळवल्यान पन गनीतात ढगाळला.पंदरा मार्कान नपास.फारम भरताना गनीत नको म्हनत व्हतो आमी पन गोखलेसरांचो आग्रव.हां तेचा ड्र  ईंग चांगला आसा.दोन परीक्षा झालल्यो आसत.आमच्या

शाळेत सरस्वतीचा चित्र तेचाच आसा.''

आकंठ जेऊन सर उठले.आंबोळया त्याना भलत्याच आवडल्या.हात धुवून ते झोपाळयावर टेकले.त्यांच्या पुढयात पानाचं तबक ठेवीत जगन म्हणाला ,''माज्या भावजयीक जरा तुमच्याशी बोलाचा आसा.'' तेवढयात आतून एक प्रौढ स्त्री व तिच्या पाठोपाठ अठरा एकोणिस वर्षाची मुलगी बाहेर आली. ''सुनीती सरांच्या पाया पड.''प्रौढ स्त्री बोलु लागली.''मी जगन भाऊजींची वहिनी.'' सुनीतीने सरांच्या पायाना स्पर्श करीत वाकून नमस्कार केला.टपोरे डोळे,लांबसडक केस,लालचुटुक जिवणी,गौर वर्ण,चंद्रबिंबा सारखा गोल चेहेरा असलेली लावण्यमूर्ती सुनीती....सर भान हरपून बघतच राहिले.सुनीतीची आई पुढे म्हणाली,''सर गणितात नापास झाल्यामुळे सुनीती खुपच नाराज आहे.सर तुम्ही शिकवणी घ्याल ना तिची?आम्ही तुमचे उपकार विसरणार नाही.'' त्याना थांबवीत सर बोलले ,''आई रोज तुमच्या हातचं सुग्रास अन्न खातोय मी.प्लीज उपकार वगैरे म्हणून मला लाजवू नका. मी खात्रीने सांगतो,तुमची सुनीती नक्की पास होईल, नुसती पास नव्हे सत्तर टक्के मार्क मिळवील.''

सुनीती अन् गणितात गचकलेली आणखी पाच मुलं -मुली सकाळी आठ वाजता सरांच्या खोलीवर हजर झाली. आठवडाभरात एक एक करीत आणखी चौदा मुल दाखल झाली.शनिवारी शाळा सकाळची अन् रविवारी सकाळी शाळेत जादा तास असायचे.म्हणुन दुपारी शिकवणी घ्यायची गळ सुनीतीनं घातली.एका शनिवारी क्लास सुटल्यावर सुनीती सराना म्हणाली,''सर आमची एक विनंती आहे.उद्या सकाळी शाळेत जाण्यापूर्वी मी भावाला पाठवीन.त्याच्याकडे खोलीची चावी द्या.आम्ही क्लासची खोली सारवणार आहोत.'' सरानी हो नाही म्हणायचा प्रश्नच नव्हता.सर म्हणाले ठीक आहे ,''पण सारवण

केल्यावर मस्तपैकी रांगोळी काढायची."दुसऱ्या दिवशी सर शाळेत गेल्यावर सुनीती अन् कमल पाडावे दोघीनी रूम उघडली.छपरासह आटेकोपर केर काढुन सारवण घातलं.मग सुनीतीने सरांच्या अंथरूणाचे कपडे धुतले.शेवटी चादर, बेडशीट, पिलो कव्हर लक्स साबणान घासून रूमच्या मागील बाजुला वाळत घातले.रूमसमोर व्हरांडयातसगळं कसब पणाला लावून छानशी रांगोळी काढली.आतल्या खोल्यांमध्ये चारही कोपऱ्यात स्वस्तिक- कमळांची नक्षी काढली.

दुपारी घरी आल्यावर रांगोळी बघताना किती वेळ सराना दार उघडायचही सुचेना.दुपारनंतर मुल शिकवणीला आली.चार वाजता क्लास सुटल्यावर मुल घरी निघाली.सरानी सुनीतीला माघारी बोलावल."सुनीतीऽऽ सारवण रांगोळी ठीक आहे पण माझ अंथरूणसुध्दा? मला लाजवलस तू!" सुनीती लाजून म्हणाली ,"सर एवढ काय वाटायला नको.तुम्ही जे कष्ट घेता त्याची थोडीशी जाणीव ठेवली आम्ही." अन् मान खाली घालून ती पळुन गेली.रात्री सर अंथरूणावर आडवे झाले. लक्स साबणाचा मंद वास आला. सुनीतीची कल्पकता लक्षात आल्यावर सर बेहद्द खुष झाले.सरांच्या मनात सुनीतीची अनावर ओढ निर्माण झाली. सुनीती तु माझी हो ऽऽ त्यांच मन साद घालु लागलं.आता काहीही करून आपल्या भावना सुनीतीकडे व्यक्त करून तीचा होकार मिळवायचाच असा निश्चय करीत शाम झोपला. ती रात्र सुनीतीच्या गोड स्वप्नानी भरलेली होती.

सरानी ठरवल खर, पण प्रत्यक्ष सुनीती समोर आल्यावर मात्र त्यांचा धीर खचायचा.अशा घालमेलीत चार दिवस मागे पडले.सरानी किती पत्र लिहीली अन् फाडून टाकली.शेवटी खंबीर निर्धार करून सरानी पत्र लिहील.दुसऱ्या दिवशी रविवार होता.सरानी मुलाना उजळणीसाठी गणितं घालुन एकेकाच्या वह्या तपासून मुलाना

मोकळं केल. सुनीतीला मुद्दामच शेवटी ठेवलं होत.तिची वही तपासून देताना सरानी खिशातल पत्र वहीत ठेवल. थरथरत्या हातानी वही सुनीतीकडे देताना पुटपुटल्यासारख सर बोलले ,"सुनीतीऽऽ प्लीज, हे वाच, तुला पटल रूचल तर उत्तर दे! नाही आवडल तर फाडुन टाक अन् मला माफ कर.पण प्लीज, याचा बभ्रा करू नकोस अन् क्लासही बंद करू नकोस." सुनीती निघुन गेल्यावर मात्र सराना गिल्टी फिलींग झाल.भावनेच्या भरात आपण नकोते साहस तर केल नाहीना? तक्रार झालीच तर काही आपली धडगत नाही.त्या रात्री सराना जेवण गेल नाही.रात्रभर विचार करकरून डोक पुरतं चक्रावल.त्याच अंतर्मन मात्र सांगत होत की सुनीती रूकार नाही द्यायची कदाचित पण बेअब्रू तरी नाही करणार.उत्तर रात्री सरांचा डोळा लागला.सकाळी क्लासला आलेल्या मुलानी दार ठोठावल्यावर सर जागे झाले.चटकन लुंगी गुंडाळुन शर्ट अडकवीत सरानी दार उघडलं.सगळी मुलं दिसली त्यात मान खाली घालुन सुनीती उभी होती.

चार दिवस निघुन गेले.नेहेमी प्रमाणे क्लास सुटून मुल बाहेर पडली.पण सुनीती मागे रेंगाळली.सराना खुण पटली.सुनीती काही बोलण्यापूर्वीच सर म्हणाले ,"सुनीतीऽऽ मला समजल तुला काय सांगायचय् ते.आज संध्याकाळी पाच वाजता जांभळीच्या साण्यावर ये. मी वाट पहातो." हातातलं पाकिट सरांच्या अंगावर टाकुन हसतमुखाने सुनीती निघुन गेली.संध्याकाळी पावणेपाचलाच सर संकेतस्थळी पोचले.त्यानी घडयाळ बघितलं.अजून पंधरावीस मिनीट वाट पहायला हवी अस मनाशी म्हणत सर ऑबझर्वेशन पॉईंटकडे निघाले.ते डाकबंगल्यापर्यंत पोचले अन् सुनीती पुढे आली. परस्परांविषयीची ओढ, आतुरता मुक्तपणे व्यक्त करीत जन्मभर साथ

देण्याच्या आणाभाका देऊन दोघही माघारी वळली.दिवस जात राहिले.त्यांच प्रेम बहरत गेल.जाहीर प्रदर्शन करणं दोघानी कटाक्षाने टाळलं. त्यांच संकेतस्थळ दुर्लक्षित ठिकाणी असल्यामुळे त्यांच्या प्रेमाचा बभ्रा गावभर झाला नाही.मार्चमध्ये बोर्डाची परीक्षा पार पडली.शिकवणीला येणाऱ्या सगळयाच रिपीटर्सनी पास होणार अशी ग्वाही दिली.अकरावीचे वर्ग बंद झाले अन भिसेसरना निवांतपणा मिळाला.त्या दरम्याने रामेश्वराचा उत्सव सुरू झाला. सुनीती आचऱ्याला मावशीकडेच राहिली.सर उत्सवाला गेले.रात्री देवाच्या पालखी समोर सुनीतीने 'वाजवी मुरली शामसुंदरा' हे पद म्हटलं.तिचा गोड स्वर सरांच्या कानात घुमत राहिला.

किर्तन सुरू झाल. सरांकडे सूचक कटाक्ष टाकीत सुनीती बाहेर पडली.मागोमाग सरही बाहेर गेले.निवांत कोपरा गाठून किर्तन संपेपर्यंत दोघानीही मनसोक्त गप्पा मारल्या.दोन दिवस हा प्रकार झाल्यावर मावशीला संशय आला. तिने आडून आडून चौकशी केल्यावर खरा प्रकार तिने ओळखला.तिसऱ्या दिवशी दोघी देवळाकडे जात असताना वाटेतच सरांची गाठ पडली. सुनीतीने मावशीची सरांशी ओळख करून दिली. सराना जेवायला यायचं आमंत्रण दिल.मग पुढचे चार दिवस संध्याकाळी शाळा सुटल्यावर भिसेसर थेट मावशीकडे जायचे.तिथे रात्रीच जेवण होईपर्यंत दोघाना मोकळेपणाने वावरता येई.त्यांना कोणाचा व्यत्यय येणार नाही याची पुरेपूर खबरदारी मावशी घ्यायची. उत्सव संपल्यावर घरी जाण्यापूर्वी सुनीतीने अंदरकी बात स्वत: होऊन मावशीला सांगितली.

सरानी जानेवारीत स्टेट बँकेची रिटन टेस्ट दिली होती.फेब्रुवारीत ओरलही झाली.सरांचे मेव्हणे पुण्याला कंपनीत नोकरीला होते. स्टेट बँकेचे रीजनल ऑफिसर दळवीसाहेब त्यांच्या

नातेसंबंधातले . सरांच सिलेक्शन झाल्यातच जमा होतं, पण सुरूवातीची पोस्टिंग विदर्भ, मराठवाडा भागात असल्यामूळे दळवीनी सरांच प्रपोजल मुद्दामच मागे ठेवलेल . पुणा रिजनचं पोस्टिंग सुरू झाल आणि पहिल्याच लॉटमध्येच भिसेसराना लेटर मिळाल . त्यावेळी शाळेच्या वार्षिक परीक्षा सुरू झाल्या होत्या . बँकेच्या लेटर प्रमाणे आठ दिवसात हजर व्हायच होत . भिसेसरानी घाबरतच बँकेच लेटर हेडमास्तरांकडे दिल . लेटर वाचल्या वाचल्या हेडमास्तरांनी हसून भिसेसरांच अभिनंदन करीत म्हटल, ''तुम्ही लकी अहात ! तुम्ही इथे राहिला असतात तर शाळेच भाग्यच उजळल असत . पण तुम्हाला जी संधी मिळतेय् ती दवडणं म्हणजे मूर्खपणा ठरेल . अहो पगारातच दीडपट तफावत आहे . शिवाय पुढे वरच्या पोस्ट मिळत जातील तशी मिळकतसुध्दा वर्धिष्णु होत जाईल . इथली नोकरी टिकवायची तर तुम्हाला आज ना उद्या बी . एड् . करायला हवं . मग वार्षिक पंधरा रूपये  पगार वाढ घेत वर्षच्या वर्ष घटवायला हवीत . एकी एक दुरकी दोन अशी सरधोपट उजळणी केल्यासारखी आर्थिक कमान!

तुम्ही जादा कष्ट घेतलात तरी आर्थिक लाभ शून्य . अर्थात पैसा हे काही जीवनसर्वस्व नव्हे . समाजात केवढ मानाच स्थान आहे शिक्षकाला!अच्युतराव पटवर्धनांच उदाहरण आहे तुमच्यासमोर . मानसिक समाधान आणि साफल्याचा आनंद पैशात मोजता  येत नाही अन नावलौकिक काही रूपये मोजुन विकत घेता येत नाही . हे श्रेय तुम्हाला शिक्षकी पेशातच मिळेल . बॅंकेतला जनसंपर्क नाती अन् जिव्हाळा निव्वळ कॅज्युअल! हे माझ तत्वज्ञान मी तुमच्या गळी उतरवणार नाही . प्रत्येकाच ईप्सित वेगळ असत . काय धरायच नी काय सोडायच हे तुम्ही ठरवायच . तुमच्या निर्णया आड मी येणार नाही . तुम्ही इथे आल्यापासून जे कष्ट घेतलात त्याची नोंद मी घेतलेली

आहे.यंदा गणितचा निकाल सत्तर टक्क्यांच्या पुढेजाईल याची मला खात्री आहे.मी तुम्हाला अडवणार नाही.हां एक अट आहे.जूनमध्ये रिझल्ट लागल्यावर तुमचा सत्कार करू, तुमचा निरोप समारंभ त्यावेळी करू! त्या कार्यक्रमाला यावच लागेल तुम्हाला! तसं वचन द्या मला." भिसेसरानी हेडमास्तरांना मनापासून नमस्कार केला.

हेडमास्तरांनी तातडीची स्टाफ मिटिंग घेऊन भिसेसरानी सरांना स्टेट बँकेत नोकरी मिळाल्याची घोषणा करून जूनमध्ये एस. एस्सी.चा रिझल्ट लागल्यानंतर सरांचा जंगी सत्कार करून त्याना निरोप द्यायचा बेत जाहीर केला. भिसेसर शाळेबाहेर पडले .त्यानी थेट सुनीतीचं घर गाठलं.त्याना बँकेत नोकरी मिळाल्याची बातमी ऐकल्यावर सुनीतीला आनंदाने नाचावस वाटलं.संध्याकाळी दोघही जांभळीच्या साण्यावर गेली. रडणाऱ्या सुनीतीचा हात हातात घेऊन सर म्हणाले,"मी शरीराने दूर जात असलो तरी मनाने तुझ्याजवळच असणार आहे.मी बँकेत हजर होतो.माझ बस्तान बसू दे.लग्नासाठी थोडे पैसे साठवीपर्यंत आपण धीर धरायला हवा.एकदा सगळया गोष्टी मनासारख्या मार्गी लागल्या की मी तुला न्यायला येईन.तो पर्यंत तू वाट पहात रहा.मला नियमित पत्र पाठव." दुसऱ्या दिवशी सर निघून गेले. सराना निरोप द्यायला सुनीती राजरोसपणे स्टॉपपर्यंत गेली.गाडी सुटल्यावर गोखलेसरांच बोलण त्याच्या कानात घुमत राहिल.शिक्षकी पेशा सोडुन बॅकेत हजर होण्यापेक्षा असच उतराव आणि परत जाऊन शाळेत रूजु व्हाव अशी अनावर ऊर्मी आली.पण बँकेतल्या नोकरीच अन् त्याहीपेक्षा जादा पगाराच मृगजळ खुणावीत राहिल.

सुनीती सरांच्या आठवणी कुरवाळीत रहायची.अधून मधून जांभळीच्या साण्यावर जाऊन मनावरचं ओझ हलकं करायची. जूनच्या पहिल्या आठवडयात एस. एस्सी.चा रिझल्ट लागला.शाळेचा रिझल्ट

अडुसष्ट टक्के लागला. भिसे सरांकडे शिकवणीला जाणारी सगळी मुल गणितात पास झाली. सुनीतीला पासष्ट गुण मिळाले. हेडमास्तरांनी भिसेसराना सत्काराच्या निमंत्रणासह मुलांच्या नावानिशी गणिताच गुणपत्रक पाठवून दिलं. सरांच उत्तर आल. त्यानी सत्तावीस जून येतो अस कळवल. सर सव्वीस तारखेला भगवानगडला आले. ते राजरोसपणे सुनीतीकडेच राहिले. सर अन सुनीतीच्या गप्पा सुरू असताना ओसरीवर ती दोघच होती. दुसऱ्या दिवशी सत्काराचा जंगी सोहोळा झाला. सगळे पालक, माजी विद्यार्थी जमा झाले. कार्यक्रमाच स्वागत गीत सुनीतीने म्हटल. एवढया मोठया सभेत बोलायची भिसे सरांच्या आयुष्यातली पहिलीच वेळ. सगळयांच्या कौतुकाच्या वर्षावामुळे सर एवढे भारावून गेले की योजलेल भाषण त्याना आठवलच नाही. सरांच ऋण व्यक्त करून अन् मुलांच कौतुक करून सरानी भाषण आवरतं घेतलं. निरोपाचे शब्द उच्चारताना हेडमास्तर गोखले सरांचा स्वरही कातर झाला.

"भिसेसरांच्या निरलस कष्टांमुळे शाळेला प्रथमच एवढं देदिप्यमान यश मिळालेलं आहे. या शाळेच्या इतिहासात सरांच नाव कोरल गेलय. तसच त्यांच्या वैयक्तिक उत्कर्षाचा शुभारंभ या प्रशालेतून झाला हा सुध्दा दैवी योगच म्हणायला हवा. माझ शंभर टक्के निकालाच स्वप्न मात्र अपुर राहिल." भाषणाचा समारोप करताना सरानी अशी कोपरखळी मारली की त्यांच्या बोलण्यातल मर्म ध्यानात आल्यावर जाणत्यांच्या मनावरचा ताण हलका होऊन सभेचा शेवट गोड झाला. "भिसेसर शाळा सोडून गेले म्हणजे फक्त नित्यसंपर्क कमी झाला एवढंच! अल्पावधितच या गावाशी त्यांचा जो ऋणानुबंध जुळला आहे त्या खातर भविष्यातही सरांच येणं जाणं राहणार आहे, ते आम्हाला भेटत राहणार आहेत असा माझा भरवसा आहे. शुभास्ते पंथानः संतु!"

टाळयांच्या कडकडाटात गोखलेसरांच भाषण संपलं. त्या दिवशी संध्याकाळी प्रथमच भिसेसर आणि सुनीती राजरोसपणे जोडीन जांभळीच्या साण्यावर फिरायला गेली. या वेळी निरोप घेताना सरांचा गळा भरून आला. सुनीतीलातर अश्रु आवरेनात. पुढच्या गोष्टींसाठी अनिश्चित काळ वाट पहात थांबावं लागणार ही कल्पनाच भीषण होती.

पाच सहा महिन्याचा काळ मागे पडला. भिसेसरांच्या जॉबचं काम करणारे दळवीसाहेब, त्यांच्यासाठी सावंतानी मोठया हॉटेलमध्ये पार्टीचा बेत ठरवला. नियोजित वेळी दळवीसाहेब फॅमिलीसह आले. त्यांच्या सोबत त्यांची बहिण वंदना पण आली. सावंतानी शामला सगळयांचा परिचय करून दिला. मग ड्रिं क्स आली. शाम भिसेसाठी ही पार्टी नवीन असली तरी इतरांसाठी ते रूटिन होत. शामची बहिण,दळवीसाहेबांची मिसेस,त्यांची बहिण या महिला वर्गासाठीही ग्लास भरले गेले. रात्री उशिरा मंडळी घरी परतली. दोन दिवसानंतर गप्पांच्या ओघात सावंत म्हणाले,“शाम, परवा पार्टीला दळवी साहेबांची बहिण वंदना आली होती ना, ती गरवारेमध्ये स्टेनो आहे. तीला कंपनीचा फ्लॅट आहे. ती मुलगी कशी काय वाटते तुला?”मेव्हण्याना नेमकं काय म्हणायच आहे ते शामला कळल नाही. तो प्रश्नांकित चेहेरा करून म्हणाला,“मी काय सांगणार! ”त्यावर हसून शामची बहिण म्हणाली,“अरे बुद्दू त्याना असं विचारायचय की तुला आवडली का वंदना?आज दळवीसाहेबांचा फोन आला होता याना,दळवीसाहेबांनी वंदनाला प्रपोज केलय तुझ्यासाठी.”बहिणीच बोलण ऐकून शामला पायाखालची वाळुच सरकल्यासारख वाटल. “मी मागाहून सांगतो विचार करून.”त्याने वेळ मारून नेली. सावळया रंगाची, बॉब कट केलेली,भडक लिपस्टिक लावुन बोल्ड वागणारी,घमेंडखोर वंदना...

सहधर्मचारीणी? त्याला कल्पनासुध्दा करवेना. त्या रात्री शामला झोप लागली नाही.

दुसऱ्या दिवशी बहिणीला एकटी गाठून शामने आपल्या अफेअरची कल्पना दिली.आपण वचन देऊन गुंतल्याच कबूल करीत सुनीतीचा फोटो समोर ठेवला.बहिणी झुरळ झटकाव अशा आविर्भावात बहिण म्हणाली,"कोण ती गावंढळ पोर...अन तीच्यासाठी चालून येणाऱ्या लक्ष्मीला लाथाडतोस? वंदनाच क्वालिफिकेशन, तिचा जॉब,दळवी फॅमिलीच सोशल स्टेटस....तिच्या चपलेशी तरी बरोबरी होईल का तू ठरवलेल्या त्या गावंढळ मुलीची?"त्यांच बोलण सुरू असतानाच सावंत आले. त्यानी शामला सगळं सविस्तर विचारून घेतल.शामला त्याच्या प्रेमप्रकरणातून बाहेर काढायचा क्ल्यू त्यानी अचूक शोधला. "शाम! मी काय सांगतोय ते नीट लक्षात घे.तू पुण्यात आहेस.इथे सेटल होणं सोप नाही.आम्ही दोघही नोकरी करतोय पण दहा वर्ष दोन खोल्यांच्या जागेत काढल्यावर हा फ्लॅट घेतला आम्ही.तरीही बँक लोनमध्ये एकाचा पगार कापून जातोय.तुझी नुकतीच सुरूवात होतेय.पैसा पैसा जोडुन सेटल होईतो तुझी चाळीशी उलटेल.बर तू जी मुलगी ठरवली आहेस ती देवदासी समाजातली!आमच सोड पण तुझे वडिल बाबा भिसे ...तू जातीबाह्य संबंध केलास तर तुझ नाव टाकतील ते!आयुष्याची माती करून घ्यायचीय का तुला? नीट विचार कर.वंदनाच्या रूपाने मोठी संधी चालून आलीय.दळवींशी सोयरीक जुळली तर वर्ष दोन वर्षा मॅनेजरच्या पोस्टपर्यंत जाशील तू.नीट विचार कर आणि चार दिवसात तुझा निर्णय सांग."

मेव्हण्यांचा उपदेश पचवणं शामला खुपच जड गेल.पण हळुहळु त्याचा निर्णय पक्का होत गेला.एका रात्री निर्धार करून

शाम उठला. सुनीतीची सगळी पत्र, तिचा फोटो बॅग मधून बाहेर काढला.ते सगळ बाड सुनीतीने दिलेल्या पिलो कव्हरमध्ये भरल अन् त्याच घट्ट पुडक करून रद्दी पेपरमध्ये गुंडाळल.दुसरे दिवशी बँकेत जाताना कॉर्नरजवळच्या कचरा कुंडीत ते पुडक फेकून दिल्यावर त्याच्या उरावरच दडपण हलक झाल.ब्रँचमध्ये पोचल्यावर त्याने झोनल ऑफिसला दळवीसाहेबाना फोन केला.सावंतांच्या बोलण्याचा रेफरन्सरून देऊन आपल्याला प्रपोजल मान्य असल्याच सांगितल.पुढच्या गोष्टी रितसर घडत गेल्या.लग्नाची तारीख तीन महिन्यानंतरची ठरली.मध्यंतरी सुनीतीच पत्र आल. शामने पोस्टमनला पाच रूपयाची नोट देऊन पत्रावर मालकाचा पत्ता बदलला असा रिमार्क लिहून ते पत्र सुनीतीच्याच नावे रिडायरेक्ट केल.त्या नंतर मात्र कधिच सुनीतीच पत्र आल नाही.

लग्न चार दिवसांवर आल.शामने दोन पत्रिका भगवानगडच्या पत्त्यावर पाठवल्या.एक शाळेला अन् दुसरी जगन देवळीला.दळवीनी अक्षरशः पिक्चरमध्ये दाखवतात तसा लग्नाचा थाट उडवून दिला.त्या चकचकाटात शामला पुसटशीसुध्दा सुनीतीची आठवण आली नाही.लग्नानंतर हनिमूनला जाऊन वंदनाच्या कंपनी क्वार्टर्समध्ये शाम वंदनाच सहजीवन सुरू झाल.पहिल्या दिवशी बँकेत जाताना डबा करून हवा असा हट्टच शामने धरला म्हणून वंदनाचा नाईलाज होता.वंदना लाडाकोडात वाढलेली, टिपीकल पुणेरी कल्चर हाडीमाशी भिनलेली,प्रच्छन्न स्वातंत्र हा हक्क मानणारी ललना.तिला कंपनीत लंच मिळायचा,तिच्यामते शामने दुपारच जेवण कँटिनमध्ये घ्यायला हरकत नव्हती.लंच अवरमध्ये टिफीन उघडल्यावर वास्तवाची भीषणता त्याच्या लक्षात आली.अर्ध्या कच्च्या वेडयावाकडया आकाराच्या पोळया आणि एकीकडे तिखट दुसरीकडे मीठ अशी करपलेली भेंडीची

भाजी . टिफीन डस्टबीममध्ये फेकून तो कँटिनला गेला . प्रत्येक घासा गणिक सुनीतीकडे खाल्लेल्या खरपूस भाकऱ्या,मटण वडे,मच्छीकढी,नीर फणसाची काप,आंबाडयाच रायतं,वालीच्या शेंगाची भरपूर खोबर घातलेली भाजी अशा स्वादिष्ट मालवणी अन्नाची चव जिभेवर घोळवीत तो समोरच बेचव अन्न चिवडु लागला .

हायफाय सोसायटी लाईफचा खरा दणका आणखी आठवडाभराने वंदना नित्यनेमाने क्लबात जायला लागल्यावर त्याला कळला . तिथे फरी लाईफच्या नावाखाली चालणारे स्त्री पुरूषांचे प्रच्छन्न व्यवहार बघुन त्याला शिसारी आली . आर्थिक सुबत्तेच्या हव्यासाची भीषण किंमत आपल्याला मोजावी लागणार हे तो पुरतं समजून चुकला . सुनीतीची जी दारूण प्रतारणा आपण केली त्याचा पुरेपूर वचपा नियती काढणार हे आपल प्राक्तन असल्याच शाम समजून चुकला . बँकेत जॉईन व्हायला गाडीत बसुन निघल्यावर झालेली घालमेल त्याला आठवली . तो आपल्या संयमी मनाचा कौल होता . शाळेतला जॉब सोडायचा निर्णय घेण्यापूर्वी गोखलेसरांसारख्या निर्लेप प्रांजल माणसाचा सल्ला विचारायचही आपल्याला सुचल नाही . दुसऱ्याने कितीही माथी मारल तरी  काही निर्णय आपले आपण घ्यायचे असतात हे साध व्यावहारीक गणित तत्त्वनिष्ठ पित्याच उदाहरण समोर असुनही चुकल . एवढा मोठा निर्णय घेण्यापूर्वी सगळी वस्तुस्थिती आपण वडिलांच्या कानावरही घातली नाही . मुळात त्यांच्या इच्छेविरूध्द शिक्षकाची नोकरी सोडुन बॅकेत जॉब स्विकारला हीच मोठी चुक झाली . सुनीतीच्या निर्मळ प्रेमाचा चोळामोळा करताना आपण माणुकीशीच उद्दामपणाने फारकत घेतली, याचं अतीव दुःख शामला झाल . पण आता खूप उशिर झाला होता .

बावीस वर्ष मागे पडली...... शामच्या मुलीने बारावी झाल्यावर हाय्येस्ट मेरीटच्या बळावर इंजिनिअरींगला प्रवेश मिळवला. म्हणून मग तिला प्रॉमिस केल्याप्रमाणे गोवा,सावंतवाडी,मालवण असा चार दिवसांचा दौरा शामने आखला. परतीच्या प्रवासात रत्नागिरी करून यायचा बेत ठरला. मालवणला आल्यावर जैतापूर पावस कोस्टल हायवेने शॉर्ट कट आहे अस कळल. शामची कार कोळंब पुलावरून पुढे आली. वायंगणी आल्यानंतर परिसर ओळखीचा भासला. वंदनाला कोड्रिंक प्यायची लहर आली. आचरा तिठयावर गाडी पार्क करून मंडळी खाली उतरली. शामने बघितलेला आचरा अन समोर दिसणार चित्र यात जमीन अस्मानचा फरक शामला वाटला. पूर्वस्मृती जाग्या झाल्या. डावीकडुन पुढे जाणारा रस्ता सुनीतीच्या मावशीच्या घरी जातो हे शामने ओळखल. वंदना आणि मुलगी प्रभात कोड्रिंक मध्ये शिरल्या. शामची नजर अशोक बागवेच्या टपरीकडे वळली. शाम टपरीत शिरला. आत प्लास्टिकची टेबल खुर्च्या आाणि खाद्य पदार्थाच्या बरण्या एवढाच माफक बदल झालेला. समोर गल्ल्यावर बसलेला,टक्कल पडलेला,गालफडं बसलेला अशोक बागवे शामने अचूक ओळखला. अशोक भिसेसराना ओळखणं शक्यच नव्हतं. भिसेसरानी कॉफीची ऑर्डर दिली.

"काय होऽऽ हा उजवीकडचा रस्ता भगवानगडवरून कणकवलीला जातो ना?" अशोक बागवेनी मुंडी हालवली. "तिथे जांभळीच्या साण्यावर तो डाक बंगला नी देवराई आहे ना?" दाढी खाजवीतअशोक म्हणाला,"आसा आसा. पन मदी जोऊळ झाला. डाक बंगलो कोसाळलो. देवराई लय वाडली."समोरचा कॉफीचा कप उचलीत उत्साहाने भिसेसर म्हणाले,"तो स्पॉट फारच सुंदर आहे. समोर निळाशार समुद्र, हिरवीगार वनराई,पर्यटक जात असतील

ना तिथे?"त्यावर च्यक च्यक असा आवाज काढीत अशोक बोलला ,"छ्या! थयसर कोण्ण्येक जायत नाय. आसा काय थय. पानी दुकु भेटनार नाय थयसर. आनी दुसरा म्हनशात तर ती जागापन बादिक. म्हनान गावातले लोकाव जायत नाय थंय."



अचंबित होत भिसेसरानी विचारलं, “कां.. कां बरं?काय बाधिक आहे तिथे?”दीर्घ उसासा सोडीत अशोक म्हणाला,“काय सांगा तुमका सायब भगवानगडात देवळयाची पोरगी व्हती तेचो प्रेम झालो हायस्कुलतल्या मास्तराबरोबर.तेका बॅंकेत मोटया पगाराची नोकरी गावली म्हनान हायसकूलतली नोकरी सोडुन ग्येलो तो.पन जाताना लगीन करूचा वचन दिला त्याने पोरगीक.पोरगी मास्तराचा मागणा येयत म्हनान वाट बगायची.फुडे त्या मास्तराचा लगीन झाला.तेच्या लग्नाची पत्रिका इली.मग मातर पोरगी भयाभित झाली.जेवीना खायना.तेचा डोका फिरल्यासारका झाला.सकाळी उजाडला काय पोरगी मास्तराची वाट बगुक जांभळीच्या साण्यावर जावन दिवसभर बसायाची नी एक दिवस थयच गळफास लावन मेली ती.अमवाशे पूर्णिमेक थयसर फिरताना दिसता आजुन.” कॉफीचा घोट घेता घेता भिसेसराना जोरकस ठसका लागला.लगबगीने पुढे येऊन त्यांच्या पाठीवर थोपटीत अशोक म्हणाला, “बेतान ऽऽ बेतान सायब वयच पानी प्या बगु.”

☺ ☺ ☺ ☺

# ६. काळ सोकावलो

सगळा थाटमाट करून सुमलीवैनी घराबाहेर पडेपर्यंत पावणे दहा होत आले.वाट बघून दीडतास कुचंबलेला दिगू रिक्षावाला जाम वैतागलेला.... पण करतो काय? रिक्षा ड्र ायव्हिंग लायसन, बॅच काढणे ते रिक्षासाठी बँकलोन प्रापोजलपर्यंत सगळी मदत सुमलीवैनीच्या नवऱ्याने - बाबलशेठने केलेली, दिगू त्याचा मिंधा ! वैताग गिळुन मऊ आवाजात दिगू म्हणाला,"वैनीबायऽऽ, बेगुन आवरा नी भायर पडा ....कणकवली मालवण गाडयो इल्यो काय पोरकरणींची आनी वांगडच्या मानसांची झुंबड होतली, मगे नंबर लागान् तुज्या झीलाक ढोस पाजान होयसर दीड वाजतलो.... म्हनान सांगतय..लवकर हास्पिटल गाटुया नी नंबर लावया...." खानदानी तोऱ्यात दिगुकडे तुच्छतेचा कटाक्ष टाकीत कानातल्या कुडयाचे मळसुत्र फिरवून घटट् करीत सुमलीवैनी गरजली , "नंबराची भिती माका? ह्या गावकारनीक भिती घालतस तू नंबराची?म्येल्या शिरा पडो रे तुज्या तोंडार....तू माका हेलकारीन समाजलस कायरे कोल्या? आमचे ह्ये पंच्यायत समितीचे मेंबर आसत ह्या इसारलस की काय बाळेढोका....आचरा तिटयार क्येदा मोटा दुकान आमचा....धा

गावात ह्येंची काय 'वट' हा ह्या   वळाकतस ना तू?अरे परत्यक्ष मांगले डाक्टरांची बदली ह्येंनी फिरवल्यानी, ते दुकु ह्येंच्ये वशाळे , आनी नंबराचो कायदो तू माका शिकवतस? "

सुमलीवैनीची सरबत्ती ऐकून दिगु चूप झाला. सगळा जामानिमा करून ठीक दहा वाजता सुमलीवैनी रिक्षात चढली. तिच्या मागोमाग नवसाच्या बाबूला कोऱ्या दुपटयात गुंडाळुन अलवार जोजवीत रूक्मिन काकी आणि दुधाची बाटली, जादाची झबली - दुपटी अश्या सरंजामाची ठेली सांभाळीत गोठणकराची आकवार पोरगी मीना रिक्षात बसली.सुसाट पळत रिक्षा हॉस्पिटलच्या मेन गेटवर पोचली.बारा डिसेंबरला डोस पाजायची तारीख असल्याचे   बोर्ड पंधरा दिवसापूर्वीच झळकलेले.दशक्रोशीतल्यापोरकरणींची नुस्ती झुंबड जमलेली. खाली उतरण्याचा निर्देश करीत दिगुने मान पाठी वळवली मात्र, त्यासरशी फिस्कारत सुमलीबाय गरजली, "रे घुबडा ऽऽ हय खय थांबलस?रिक्षा भुतू घी...." मग रिक्षातून मानबाहेर काढुन तोंडाने,"गावकारीण ईलीऽऽ बाजूक होवा" अशी दमदार हाळी दिगुने घातली मात्र! अन् काय आश्चर्य !! वसुदेव बालकृष्णाला घेवून यमुनेच्या पात्रात शिरल्यावर त्या कृष्ण परमात्म्याचा अंगुष्ट स्पर्श झाल्यावर यमुनेचे पात्र दुभंगले तव्दत्   नवल घडले."ग्ये बाय् माज्येऽऽ बाबल शेटची घरवाली ...."असे कुजबुजत बाया बापडया चटाचटा बाजुला झाल्या. हॉस्पिटलच्या दारासमोर नाव नोंदणीसाठी मांडलेल्या टेबलापुढे दिगुची   रिक्षा थांबली.तेवढयात कोरलेल्या भुवयांची धनुकली करीत किनऱ्या पण जरबेच्या सुरात नाव नोंदणी करणारी नर्स कडाडली,"कोण रे तू टिकोजी? काय अक्कल नावाची वस्तु आहे का तुझ्याकडे ?एवढया गर्दीतून रिक्षा आत आणायची हिंमत

कशी झाली तुझी?''

मिशीवरून पंजा फिरवीत दिगु म्हणाला ,''अवो नर्शिण बाय, रिक्षात बाबल शेटची घरवाली आसा , झिलाक ढोस पाजूक आनललो हा ....'' दिगुने केलेला नर्शिण बाय हा उल्लेख ऐकुन ती कुर्रेबाज नर्स तडकून म्हणाली ,''शीऽऽ काय गावंढळ माणसं आहेत.मला सिस्टर म्हणतात , कळलं का गावंढळा ? पहिले रिक्षा मागे घे.'' यावर ओशाळुन हात जोडून अजिजीच्या सुरात दिगु बोलला ,''स्वारी हां शिस्टर , आपले बाबलशेट हायत ना ते पंचायत समितीचे मेंबर...''त्याच बोलणं तोडीत टिचकी वाजवुन हाकलल्याचा आविर्भाव करीत सिस्टर म्हणाली,पहिले रिक्षा मागे घे, कोण कुठले बाबल की ठाबल शेट? मंत्री, आमदार, सीईओ कि कलेक्टर ? मी ओळखत नाही.''त्यावर तिच्या कानाशी लागत शेजारी उभी असलेली आया म्हणाली,''अहो म्याडम, तिठयावर मोठ्ठ दुकान आहे ते ... आपल्या मांगले डॉक्टरांचे मित्र आहेत ते.'' आयाचं बोलणं उडवून लावीत नर्स फणकारली,''असुदेत असले तर! फुकटात डोस पाजुन घेणार हे सोकाजी आणि रूबाब केवढा तालेवाराचा! मी मोजीत नाही असल्या गावंढळ पुढाऱ्याना.''

दिगुने रिक्षा मागे फिरवून उभी केल्यावर सुमलीवैनी खाली उतरली.''वैनीबाय , मिया अदर्या घंटयात येतय् , तंवसर तुमी ढोस पाजून घेवा.'' अस सांगुन दिगु तिथून सटकला. सुमली वैनीने मिनीटभर विचार केला अन् डोक्यावरच्या पदराच टोक धरून ती पुढे सरकली. सिस्टरच्या टेबलसमोर थांबलेल्या सगळया बायका आचऱ्यातल्या.वैनीबायचा दबदबा जाणणाऱ्या नी मानणाऱ्या. त्या चटचट बाजुला झाल्या.टेबलासमोर गेल्यावर उसनं हसु आणित सुमलीवैनी म्हणाली,''आमी पैल्यानाच इलंव बाबुक ढोस पाजूक ,

आमचे यजमान पंच्यायत समितीच्ये मेंबर आसत ...” तिला थांबण्याची खुण करून नर्स म्हणाली,“हे बघा बाई तुमचे यजमान कोण आहेत नी काय आहेत ते नकोय् मला. ते कोणीही असूदेत , तुम्ही नंबरात थांबा आधी. या बायका किती वेळच्या थांबल्यायत् अन् तुम्ही मध्येच कशा काय घुसताय्? लोकप्रतिनिधी आहेत ना तुमचे मिस्टर?जनतेचे सेवक म्हणवतात ना स्वत:ला? मग तुम्हीही शिस्त पाळायला नको का? बघताय काय माझ्या तोंडाकडे? जा मागे सरका नी नंबर धरा पहिले.”



सुमलीवैनी मान खाली घालुन मागे फिरणार एवढयात टेबला समोर नंबर धरून असणारी कोळशेकारीण भालावत म्हणाली,“ जावने हो नर्शिणबायनू सुमलीवैनीक फुडचो नंबर दिलास तरी कोणव काय तकरात करनार नाय.घेवा तेचो नंबर.”तिच्या बोलण्याला रांगेत थांबलेल्या इतर बायानीही मान डोलावून होकार दर्शविला.वैतागलेली नर्स म्हणाली,“तुम्ही मला शहाणपणा नका शिकवू.शिस्त म्हणजे शिस्त.ही काय मोंगलाई आहे होय? भलताच आगावुपणा मला नाही चालायचा.” सुमलीवैनी हिरमुसली होउन मागे होत नंबरात उभी राहिली.बोलल्या प्रमाणे अर्ध्या तासाने दिगु आला. सुमलीवैनी गेटसमोर नंबरातच उभी होती.ती फणकाऱ्याने दिगुला म्हणाली, “तु थांबा नुको आनी पुन्ना येवव नुको.माजो नंबर कदि लागतलो देव जाना.तु ह्येंका जावन् सांग की माका नर्शिणीन नंबराचो कायदो दाकवल्यान हा, तवा तुमी आदी हय येवा आनी तुमचा फुडारपान त्या नर्शिणीसमोर गाजौन दाकवा.” बाबल शेटला सुमलीवैनीचा निरोप सांगायला दिगू सुसाटत निघाला.तो फाटयापर्यंत पोचला अन नेमका टायर पंक्चर झाला.

बाबल शेटची वाट बघुन सुमलीवैनी कंटाळली.चांगले दोन अडीज तास नंबरात तिष्ठंति झाल्यावर एकदाचा डोस पाजून झाला नी सुमलीवैनी माघारी निघाली.वाटेत कुणीच काही बोलले नाही.घरात पोचून पाणी –बिणी घेतल्यावर रूक्मिन काकीच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला.“जळ्ळी म्येली नरशिन ,तेका खाल्यान वाघान.... घुडग्या आमका कायदो शिकवता नंबराचो.आमच्या सुमलीबायची तालेवारी आजून वळकल्यान नाय हा. म्हनान नाचान देकवल्यान. बाबलशेटका नाय तेची घमेंड उतरूक लावलय तर नावाची रूक्मिन नाय मी."आता

सुमलीवैनीनेही गुळणी सोडली. “काय गरगरौन दाकवल्यान माका .... बिचारी कोळशेकारीण दुकु मज्यासाटना आपलो नंबर सोडुक तयार झाली , पण ह्या ‘आधला’ म्हंता कसा ....” नेमक्या ह्या वाक्यासरशी गोठणकराची मीना फस्सकन् हसली आणि आपली चुक लक्षात येऊन सुमलीवैनीने ओशाळून जीभ चावली. तिच्या ओशाळण्याचं कारणही तसच भारदस्त होतं. तिने नर्सला उद्देशून म्हटलेला शब्द ‘आधला’ त्या शब्दाला अख्ख्या आचरा गावात वेगळा संदर्भ होता अन् तो रूक्मिन काकीला भिडणाराच नव्हे तर झोंबणराही होता.

रूक्मिन काकीचं माहेर देवगड तालुक्यात फणसे हे गाव. त्या भागात सापाची एक बिनविषारी जात आहे त्याला ‘आधला किंवा आधेल ’ म्हणतात. तर आचरा चिंदर या गावात त्याच जातीला दिवड म्हणतात. रूक्मिन काकी नवी नवरी असताना तिला घरामागे माडाच्या तळीजवळ पिवळं धम्मक आधेलं दिसलं तेव्हा तीने घाबरून दिराला हाक मारली , “भावजीनू ऽऽऽ ह्या बगा केवढा मोठा आधेल ” दिराला ती काय म्हणते हेच कळेना. प्रत्यक्ष जनावर बघितल्यावर तो म्हणाला, “ ह्या व्हय .... आमी ह्येका दिवड म्हंतो.” रूक्मिन दिवडाला आधेल म्हणते यावर सगळी फिस्सकन् हसली. रूक्मिन काकी दिवडाला आधेल म्हणते ही गोष्ट गावभर झाली आणि रूक्मिन काकीलाच ‘आधेल’ हे टोपण नाव पडलं. सुमलीवैनीचं माहेर पण देवगड तालुक्यातलं पुरळ हे गाव. ती सुध्दा दिवडाला आधेल म्हणायची. तीला रूक्मिन काकीला ‘आधेल’ म्हणतात हे माहिती होतं अन् कां म्हणतात हे पण माहिती होतं. म्हणुन अनाहूतपणे ‘आधेल’ हा शब्द तोंडून आल्यावर सुमली ओशाळली, “ काकी चुकॉन शब्द इलो .... मी त्या नर्शिणीक येंगडावसाटी

'आधेल' म्हटलंय नी मीना रांडू हसलां वगीचतरी ....माका माफी करग्ये काकी...."सुमलीची अजीजी बघून सुखावत काकी म्हणाली, "तां जावने ग्ये .... पन दिग्याकडेन निरोप दिलो तरी बाबलशेट कशे इले नाय म्हंतय मी!! "

दिगुचं पंक्चर काढुन बाबलशेठचं दुकान गाठीपर्यंत एक वाजला. सुमलीचा निरोप ऐकुन भडकलेल्या बाबलशेठने टाकोटाक हॉस्पिटल गाठलं .गेट समोर रिक्षा थांबवून बाबलशेठ खाली उतरला.त्याला बघुन आया पुढे आली. सुमलीवैनी बाबुला डोस पाजून घरी गेल्याच ऐकुन शांत झालेला बाबलशेठ मग घरी गेला.तो ओसरीवर खुर्चीत टेकला मात्र .... रूक्मिन काकीच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला.रिक्षा हॉस्पिटलच्या गेट मधून आत गेल्यापासून ते बाबूला ढोस पाजून बाहेर येईपर्यंतची इत्थंभूत वार्ता अभिनयासह सादर झाली. "बाबलशेठ तां काय नाय ,त्या नरशिणीक वडीत हंयसर आनुन सुमलीवैनीची मापी मागुक लावा तर तुमचा फुडारपन खरा म्हनान मी." रूक्मिन काकीचा उपोद्घात झाला तशी सुमली गरगरत पुढे आली. "आनी काय होऽऽ मी दिगुकडेन निरोप धाडललो तुमका .... पन दुकान सोडूण तुमी काय हस्पीटलात इलास नाय. तुमी लगेच इला असतास तर थयच्याथय फैसलो झालो आसतो.चार लोकासामनी माजो इनशाट करनारी ती नरशिण , तेका थयच धडो शिकौक व्हयो हुतो.पन तुमका माजी अगत नाय.खचो तुमचा फुडारपान ....!" सुमली मुसमुसत आत गेली.

दुपारची जेवणं झाल्यावर पुन्हा सगळी कथा झाली.पुढचे बेत ठरले. बाबलशेठने मांगले डॉक्टरांसह नरशिणीच्या झिंज्या धरून तिला घरी आणायची, तिने सुमलीवैनीचे पायधरून माफी मागायची , हा सगळा तमाशा चार लोकांच्या समक्ष व्हायला हवा म्हणून

वाडीतली झाडून सगळी माणसं बाबलशेठच्या घरी जमवायची असा झणझणीत कार्यक्रम आखून चार वाजता बाबलशेठ घराबाहेर पडला आणि वाडीतली माणसं जमवुन आणायला रूक्मिन काकी निघाली. फुल्ल चार्ज झालेल्या बाबलशेठने दिगल्याच्या रिक्षेत बसुन थेट हॉस्पिटल गाठलं.यावेळी दिगूने मुद्दामच रिक्षा हॉस्पिटलच्या दारात पायऱ्यांसमोर भिडवुन उभी केली. बाबलशेठने तडक डॉक्टर मांगल्यांची केबिन गाठली. वॉर्डबॉय लगबगीने पुढे येवून हात जोडीत म्हणाला, "डॉक्टरसायब क्वार्टरवर आसतले, तुमी जातास थडेन काय तेंका बोलावू हंयसर?" त्यावर आवाजाला धार आणीत बाबलशेठ कडाडले, "जाऽऽ जा! ताबडतोब घेवन् ये तुज्या सायबाक. म्हनॉचा बाबलशेठनी लगेच येवक् सांगल्यानी हा."

हात जोडुन ह्यॅऽऽह्यॅऽऽ करीत डॉक्टर मांगल्यांची स्वारी प्रवेशली मात्र.... पुढाऱ्याचा संयम सोडुन टिपेच्या सुरात शेठ गरजले, "डॉक्टरऽऽऽ माका काय डिपॉझिट जप्त झालेलो टिनपाट पुढारी समाजलास काय तुमी? राणेसायबांक डायरेक भेटण्याएवढी पत आसा माजी.आनी माज्या मिसेसका तुमची ती दिड दमडीची नरशिण रांगेचो कायदो दाखवणार? आमची हीच लायकी केल्यात काय?" ही गडबड ऐकून ऑफिसमधली मंडळी केबिनकडे धावली. अजीजीच्या सुरात डॉक्टर म्हणाले , "अहो काय झालं? कोणी कसली आगळीक केली ते तर समजूदे आम्हाला." मग बाबलशेठनी सकाळी घडलेली घटना साग्रसंगीत वर्णन केली.सगळी घटना ऐकल्यावर तोंडावर दु:खाची कळा आणित डोक्यावर मुटके मारून घेत डॉक्टर वदते झाले, "छयाऽऽछया ! हा म्हणजे कहरच झाला म्हणायचा! ! ही काय पध्दत

झाली काय बोलायची? पंचायत समितीचा सभासद म्हणजे काय समजते ही नर्स."

मांगले डॉक्टरांची अशी भलावण ऐकून बाबलशेठचा पारा जरा खाली आला. नेमका हाच मोका साधून सकाळचा प्रसंग घडला तेव्हा नर्सच्या बाजूला थांबलेली आया आगीत तेल ओतीत बोलली, " आनी डॉक्टरऽऽ नर्सबाय येवढाच करून थांबली नाय. रांगेतली बायल मान्सा वैनी बायसाटी आपलो नंबर देवक् तयार झालली , पन तेंकाव गप करून नर्सबायनी वैनीक रांगेत फाटी जावक् लावल्यानी. मी मोजीत नाय असल्या गावंढळ पुढाऱ्यांक असा दुकु सुनावल्यानी वैनी बायका" बिचारे मांगले डॉक्टर! आयाचे बोल ऐकून त्यांची वाचा बंद व्हायचीच वेळ आली. मागचा पुढचा विचार न करता चक्क बाबलशेठच्या पायाला हात लावीत डॉक्टर म्हणाले," मी माफी मागतो तुमची! झाल तर वैनीसाहेबांचीही माफी मागतो. पण बाबलशेठ हा विषय इथेच मिटवुया." जमलेल्या स्टाफला जाण्याची खूण करून मांगले घोगऱ्या आवाजात म्हणाले," जे झालं ते झालं. ती नर्स नव्हे तर मी बोललो असं समजून माफ करा बाबलशेठ. या पुढे अशी वेळ येणार नाही याची खात्री मी देतो. पुढच्या तारखेला तुमच्या घरी माणूस धाडून बाळाला डोस पाजण्याची व्यवस्था मी करीन. हा माझा शब्द आहे."

एका फालतू नर्ससाठी डॉक्टरनी इतकी नरमाई कां दाखवावी हे बाबलशेठला कोडच पडलं. त्यांचे आणि मांगल्यांचे संबंध लक्षात घेता एरवी हे मान्य करणं ठीक होतं. तरीपण दशक्रोशीतल्या बाया बापडयांसमोर आपली पत धुळीला मिळवणाऱ्या मुजोर नर्सला असं सोकळ सोडणं बाबलशेठला पटलं नाही तसच ही गोष्ट अशी गुपाचुपीत मिटवणं सुमलीनेही सुखासुखी मान्य केलं नसतं. बाबलशेठ

मग स्वच्छच बोलले. "डॉक्टर तुम्ही समाजतास एवडी सादी गोष्ट नाय ही. अहो म्हातारी मेल्याचा दुक नाय , पण काळ सोकावता तेचा काय?तां काय्येक चलाचा नाय.त्या नरशिणीन आजच्या आज आमच्या घरी येवन् आमच्या बायलेची मापी मागूक व्हयी." मान खाली घालुन पडेल सुरात मांगले म्हणाले, "हे मोठं अवघड काम आहे. कसं सांगू तुम्हाला ?" संयम सुटलेले बाबलशेठ निर्वाणीच्या सुरात म्हणाले , "त्या नर्सका बोलवा तर आदी.तुमका जमत नसात तर मी सुनावतय तेका.अहो ही लोकशाही हा की ठोकशाही?" शरमिंदे होत डॉक्टर बोलले , "तुम्ही माझी अडचण लक्षात घ्या शेठ, दुसरं कायपण सांगा.खरी अडचण म्हणजे .... अहो घाडगेसाहेबांपर्यंत जातील या गोष्टी...."त्यांच बोलणं तोडीत बाबलशेठ म्हणाले, "मी वळकतय तेंका.हयो विषय मी कानावर घालीन तेंच्या. घाडगेसायब म्हंजे आपले आरोग्य मंत्री बोराडेसायब आसत ना तेंचे पावणेच लागतत.तेंची भिती माका नाय वाटत्." आवंढा गिळुन दीर्घ उसासा सोडीत मांगले म्हणाले, "ती नर्सबाई सख्खी मेव्हणी आहे बरं का डी.एच्.ओ. घाडगेसाहेबांची. आता पुढे कसं कसं - काय काय करायच ते तुम्हीच ठरवा बाबलशेठ ....!"

☺ ☺ ☺ ☺

# ७. मियाँ बिबी राजी

चवेड रत्नागिरी रस्त्याच्या डांबरीकरणाच काम सुरू झाल अन साप्ताहिक रत्नदुर्ग प्रेसच्या मागे वडारांची पालं पडली. मटांगे कॉन्ट्रक्टरकडे खडी फोडणारा कल्लाप्पा अलिकडे चांगलाच वधारलेला चवेड रस्त्याचं टेंडर शेट्टी कॉन्ट्रक्टरला मिळालं. त्याला काळवत्री खडी पुरविण्याचा मक्ता कलाप्पा कडे. स्वतः कल्लाप्पा,त्याचे तीन भाऊ भिमु,भरमु,नामु आणि त्यांचे कुंटुबीय अठरा माणसांचं टोळकं होतं अधिक कर्नाटकातुन चाळीस जोडया कलाप्पाने आणल्या. स्वतःचा क्रशर टाकला. आणि रात्रंदिवस खडीच्या कामाला सुरवात झाली. आता स्वतः कल्लाप्पा,त्याची बायको सुंद्री आणि पोरगी ईमली याचे कष्ट बंद झाले.

कल्लाप्पा स्वच्छ धोतर नेसुन बंडीच्या खिशात नोटांची बंडले सांभाळीत कामगारांवर डाफरत राहायचा. त्याची बायको नी पोरगी पान खाऊन लालबुंद झालेल्या तोंडाने नुसती हिंडत रहात. कल्लाप्पा नी सुंद्री दिवसाचा बहुतांश वेळ साईटवर राहायची. इमलीला मुळी मोकळं रान. ती रत्नदुर्ग प्रेसच्या व्हरांडयात बसुन राहायची. इमलीचा वावर प्रेसच्या अवती भवती सुरू झाला त्याच दरम्याने कंपोझिटर बाबा भुत्यांचा मुलगा सुऱ्या बाबा बरोबर नेमानं कामावर यायला लागला.

सुऱ्या दहावीत नापास झाला. त्यानंतर तीन वर्ष तो आबा भोगल्यांच्या माडी दुकानात कॅश वर बसायचा. सुरवातीला बाबा भुत्यांनी दुर्लक्ष केल. पण तीन वर्ष मागे पडली तरी महिना अडीजशे रूपया पुढे मिळकत होईना तेव्हा मात्र त्यानी सुऱ्याला चांगला खडसावला. अलिकडे रत्नदुर्गचा पसारा वाढत चाललेला. तीन पानांचा अंक सहापानी झाला. गुमास्ता कायदा लागु झाला. प्रेसमध्ये नोकरांसाठी मस्टर सुरू झाल, फंड कापला जाऊ लागला. तेव्हा"तेव्हा काही तरी मगजमारी करण्यापेक्षा कंपोझिंग शिकलास तर कामाला तोटा नाही" अशी समजूत घालून सुऱ्याला ते आपल्या सोबत प्रेसमध्ये नेऊ लागले. पाच महिन्यात सुऱ्या कंपोझिंग शिकला. प्रेसचे मालक मालक भाऊ रायकर यांची स्कुटर घेऊन जाहिराती आणणे, बॅंकेतली कामे इथ पासुन तो कोल्हापूरहून न्युज प्रिंट रोल आणण्यापर्यंत त्याची मजल गेली.

उमेदवारीच्या काळात रायकर सुऱ्याला माहिना तिनशे देत. शिवाय सटर फटर कामांचे कधी पंचवीस कधी पन्नास अलाहिदा देत. वर्षभरानंतर त्याचा मगदुर बघून भाऊंनी त्याला मस्टरवर घेतले अन् महिना बाराशे पगार सुरू केला. प्रेसची बाहेरची कामे करण्यात तो सराईत झाला. भाऊ रायकर अगदी अडेल तेव्हाच प्रेस बाहेर पडायचे. हल्लीतर प्रेसची डुप्लीकेट चावी सुऱ्याकडे असायची. प्रेसची वेळ सकाळी ६ ते १२ आणि दुपारी ३ ते ६ अशी असायची. पण साप्ताहिकाचे अंक पोस्ट करणे, एस. टी पार्सले करणे सभासद वर्गणी जमा

करणे यामुळे वेळ व्हायचा. बाबा भुते प्रेस बंद झाल्यावर जेवायला घरी जात. पण सुऱ्या मात्र जेवणाचा डबा घेऊन यायचा.

गावातली कामे उरकुन तो प्रेसवर यायचा. डबा खाऊन तिथेच ताणुन दयायचा. टाईमपास करायला ईमलीची संगत होती. किंबहुना त्याच कारणा साठी त्याने डबा आणणे सुरू केलेले. ईमली मात्र चार भावंड घेऊन पडवीत गपचीप बसुन असायची. धोतर नेसणाऱ्या कळकट वडारांच्या तुलनेत कमावलेल्या भरदार बांध्याचा छानछोकीत राहणारा सुऱ्या तिला आवडायचाही. पण जात पंचायतीची अन् त्यापेक्षाही हुमदांडग्या बापाची दशहत वाटायची तिला. वडाराच्या पोरीची काय हिम्मंत की परजातीच्या बाप्याकडे वर डोळे करून बघील तर... डोळेच काढले असते ना वडारांनी ! शिवाय इमलीचं चार सालामागेच लग्न झालेलं . न्हाण आल्यावर दोन सालापाठी ती दादल्याकडे नांदायला गेलेली. पण सुरूंगाचं काम करताना जिलेटीनचा स्फोट झाला. त्यात तिचा दादला गमावला. सासु सासरे इमलीचा छळ करायला लागले. मग कलाप्पाने तिला सासरहून काढून आणलेली... सुऱ्याला हे कळले असते तर तीचा स्वीकार तो करणार नाही अशा विचारानेही इमली गप्प राहीलेली.

सुऱ्या मात्र इमलीसाठी पागल झालेला. कोपरा पर्यंत हातावर गोंदण केलेली वडार समाजात न होण्याइतपत गोरी,टॉमेटो सारखी रसरशीत आणि मुख्य म्हणजे झुळझुळीत साडया नेसून स्वच्छ राहणारी इमली त्याच्या मनातच भरलेली.

बरेच दिवस प्रयत्न करूनही इमली त्याला काही प्रतिसाद देईना. पण सुऱ्याने चिकाटी सोडली नाही. हळुहळु गप्पा सुरू झाल्या. इमलीच्या भावंडाना चॉकलेट्स दे ...गोळया दे करताना त्याने इमलीला सेंटची बाटली दिली. अन् एक दिवस तीन ते सहाच्या शोचे सिनेमाचे तिकीट ईमलीला देऊन "तु परस्पर थेटरात जाऊन बसमपिक्चर सुरू झाल्यावर मागाहून मी येईन" सुऱ्या म्हणाला. ईमलीने नाही नाही म्हटले पण पालवर जाऊन साडी बदलून ती बाहेर पडली.

दोन तीन दिवसांनी वरचेवर दोघेही पिक्चरला जाऊ लागली. कुणालाच काही संशय आला नाही. येण्याची शक्यताही नव्हती. तशी पुरेपुर खबरदारी दोघही घ्यायची. सुऱ्याचे मित्र थेटरवर भेटायचे. पण त्यांचा या गोष्टीत आक्षेप कशाला असेल? पिक्चरला जाणे सुरू झाले नि त्यांच्यातला दुरावा संपला. ईमली विधवा आहे हे कळूनही सुऱ्याने माघार घेतली नाही. एवढेच नव्हे ईमलीशी लग्न करायला तो तयार झाला त्याच्या घरात विरोध होण्याचा प्रश्न नव्हता...तसा आई वडिलांचा विरोध झाला असता पण सुऱ्याने जुमानला नसता. प्रश्न फक्त ईमलीच्या आई बा यांनी होय म्हणण्याचा होता. सुऱ्या लग्न करणार म्हणताना त्यांची परवानगी मिळेल अशी ईमलीला आशा वाटत होती.

थोडे दिवस गेले आणि ईमलीने ही गोष्ट आईच्या कानावर घातली. ती कलाप्पाला बोलली. मात्र त्याने आकाशपाताळ एक केले. ईमलीला गुरासारखे बदडले. जातीबाहेर

पोरगी दयायला जात पंचायतीची परवानगी मिळणार नाही. एवढे कशाला ही गोष्ट त्याने पंचायतीपुढे नुसती सांगितली असती तरी पंचानी त्याला मिशी उतरून ठेवायला लावली असती. वडारांच्या पंचायतीचे या संबधातले कायदेकानु भलतेच कडक...कलाप्पाला जिता गाडलाच असता की त्याच्या भावकीने. त्याने ईमलीला सक्त ताकिद दिली.

जवळ जवळ पंधरावडाभर ईमली प्रेसच्या आसपास फिरकली सुध्दा नाही. सुऱ्या डोळयात प्राण आणून वाट बघायचा. प्रेस भोवती चक्कर टाकायचा. पण ईमलीची आई पालावर थांबलेली असायची. त्याचे काही चालेना. थोडे दिवस गेले. सुंद्री पूर्ववत दिवस दिवस बाहेर रहायला लागली. एक दिवस दुपारची ईमली प्रेसच्या व्हरांडयात येऊन बसली. झाला प्रकार तिने सुऱ्याला सांगितला. यापुढे दोघांचे बोलणे झाल्याचे कळले तरी कलाप्पा सुऱ्याला ठार मारील अशी भिती तिने व्यक्त केली. पण सुऱ्या असल्या धमकीला डरणारा नव्हता.

तो राहायचा त्या शिवरे वठारात भंडारी– मराठा समाजची जवळजवळ शंभर सव्वाशे घरे. वठारातले सगळे पोरगे नित्य नेमाने व्यायाम शाळेत जाणारे. एकजुटीने रहाणारे. एवढा मोठा स्मगलर फकीर कासम त्याचे नुसते नाव घेतले तरी रत्नदुर्गातले लोक चळाचळा कापायचे. शिवरे वठारातल्या कोणीतरी पोरगा सायकलवरून जात असताना फकीर कासमच्या गाडीने त्याला ठोकले. पोराला काही लागले नव्हते. सायकलचा चिमटा मात्र

मोडला. पोरगा नुकसान भरपाई मागायला लागला फकीर कासमचे बॉडीगार्ड गाडी बाहेर पडले अन् त्यानी पोराची धुलाई केली. वठारात ही गोष्ट कळल्यावर लोक चिडले. स्मगलिंगचा माल भरून नेणारे फकीरचे तीन ट्रक त्याच रात्री लोकांनी अडवले.

फकीरला कळताच गाडी घेऊन तो शिवरे वठारात आला. वठारातल्या लोकांनी त्याच्या सकट गाडीतल्या सगळयांना बेदम चोप दिलाच पण पोलिस आणुन ट्रक जप्त करायला लावले. असा वठार पाठीशी असताना सुऱ्या कशाला गडबडेल? ईमलीचा विश्वास पटेल अशा शब्दात त्याने तिची समजुत काढली. चांगले मध्यस्त घालून कलाप्पाकडूनच परवानगी घेईन. वेळ आल्यावर तु मात्र कच खाऊन मला तोंडघशी पाडू नको माझे मी बघून घेईन. मी एकदा ठरवले म्हणजे ठरवले. सुऱ्याने शपथ घेतली.

ही गोष्ट सुऱ्याने मित्र मंडळीच्या कानावर घातली. सगळयांनी त्याला मदत करायचे वचन दिले. आधी कलाप्पाला समजूतीने सांगून बघायचे .तरीही तो ऐकला नाही तर सरळ पोरगी काढायची नी रजिस्टर लग्न करायचे असे ठरले. सुऱ्याच्या मित्रांचे टोळके कलाप्पाचा क्रशर –खडीचा डेपो असायचा तिथे जाऊन त्याला भेटले. त्यांचे सांगणे ऐकल्यावर कलाप्पा गरम झाला. पण शिवरे वठाराशी वैर त्याला पत्करणारे नव्हते. शिवाय घडी बसलेला धंदाही विस्कळीत होऊ दयायचा नव्हता. कलाप्पाने पोरांच्या पायाला हात लावला. हात जोडून अजीजी केली. माझाी

जात पंचायत मला जिवंत ठेवणार नाही,आमच्या जातीत हे निर्बंध कडक आहेत असे विनवले. भेटायला गेलेल्या पोरानी कलाप्पाचे ऐकुन घेतले. मग विचार करून एकजण म्हणाला, "आम्ही समजुतीने तुला सांगितले एकतर पोरीला इथून बाहेर काढ. नाहीतर काय होईल ते तुझे तू सहन कर. मात्र कोणत्याही परिस्थितीत सुऱ्याच्या केसालाही धक्का लागला तर याद राख. क्रशर सकट वडाऱ्यांची सगळी पाले आम्ही पेटवून देऊ."

त्या रात्री कलाप्पाच्या पालावर पुन्हा शिमगा झाला. ईमलीला मार बसला. कलाप्पाचे भाऊ मधे पडले. त्यानी तोडगा काढला. त्याचा भाऊ नामु ह्याने चवेडच्या अलिकडे कोतवडयात कामगारांची पाले पडली होती तिथे पाल टाकायचे नी ईमलीला रत्नागिरीतुन हलवून तिथे कायत ठेवायचे असा बेत ठरला. दुसऱ्या दिवशी प्रेस उघडण्यापूर्वीच नामुचे पाल उठले अन् ईमलीसह तो कोतवडयात रवाना झाला.

आठ दिवस उलटले तरी ईमलीचा पत्ता लागत नाही म्हणताना सुऱ्याचा जीव कासावीस झाला. त्याला काहीच तर्क करता येईना. विचार करून करून त्याचे डोके फिरायची. वेळ आली. चार दिवस गेले आणि ईमलीची भावंडे पुन्हा प्रेसच्या व्हारांडयात बसायला लागली. सुऱ्याने त्यांना भजी खायला घातली नी ईमलीची चौकशी केली. "त्ये रोजाला बानी लई हानलं बगा त्येला मंग नामुकाका संगट त्येला आमच्या लोकाच्या वस्तीवर

धाडली की बाऽनं” मग सुऱ्याने खोदून खोदून चौकशी केली. पोराना ठिकाण नेमके सांगता येईना पण “रस्त्याच्या कामावरच्या लोकांची पाले आहेत त्या ठिकाणी” हा धागा पकडून सुऱ्याचे मित्र शोध काढायला लागले.

कोतवड्यात पऱ्ह्या जवळच्या मैदानात वडारांची पाले पडलेली होती. ईमलीचा शोध घ्यायला गेलेल्या मित्राला तिथे इमली दिसली. मग पुढचा मार्ग सोपा होता. कोतवडयातला मंगेश साळवी रत्नागिरीच्या व्यायाम शाळेत यायचा. त्याची नी सुऱ्याची चांगली ओळख. सुऱ्या मंगेशच्या घरी गेला. मंगेशच्या घराजवळ त्यांची माडाची बाग, उन्हाळी भाजी करायचे मळे त्या लगतच वडारांची पाले पडलेली. मंगेश सोबत बागेत फिरताना सुऱ्याला बघितल्यावर ईमली लगबगीने पुढे आली. खुप दिवसानी दोघांच्या मनमुराद गप्पा रंगल्या. मंगेश जरा दूर जाऊन थांबला. सुऱ्या नी ईमली गप्पा मारीत असताना अचानक मंगेशचा अल्सेशियन कुत्रा बादशहा धावत आला. मळयाची राखण करण्यासाठी तो सोडलेला असायचा. कुत्रा भुंकत आल्यावर दोघांची पाचावर धारण बसली. मंगेश धावत आला आणि त्याने बादशाला आवरले. म्हणून ठीक नाहीतर कुत्र्याने दोघांना फाडून खाल्ले असते.

ईमलीचा ठिकाणा कळला आणि सुऱ्याच्या कोतवड्याच्या चकरा व्हायला लागल्या. पालावर दिवसभर कुणीच नसायचे

त्यामुळे अडचण नव्हतीं..... फक्त मंगेश चा कुत्रा असायचा. सुऱ्या दरवेळी न चुकता कुत्र्यासाठी पाव – बटर घेऊन जायचा. सवय झाली तसा कुत्रा ही दोघांना ओळखायला लागला. उलट त्याचा पहारा असल्यामुळे दोधांना निर्वेधपणे गाठी भेटी घेणे सुलभ व्हायचे. काहीही झाले तरी एकमेकांची साथ सोडायची नाही अशा आणा भाका झाल्या. मित्रांशी सल्ला मसलत करून कल्लाप्पाला बरोबर कात्रीत पकडायची नामी युक्ती सुऱ्याने शोधुन काढली. ईमलीनेही होकार दिला. युक्ती एवढी नंबरबाज की, कल्लाप्पाने आपल्या हाताने ईमलीचे सुऱ्याशी लग्न लावुन दिले असते.

सुऱ्याच्या मित्रांनी सांगितलेली हिकमत दोघनी लढवली आणि कल्लाप्पा कधीयेतो या गोष्टीची सुऱ्या वाट पाहु लागला. त्या दिवशी हप्त्याची सुट्टी होती. कामगार मंडळी, बाप्ये –बायका पालावरच थांगलेली, सगळी दारू पिऊन तर्रर चुलीवर बोकडाचे – कोंबड्याचे मटण रटमटत! मटण शिजले की जेवायला बसायचे. इतक्यात पालात वाकळीवर लोळणारी ईमली उठून बसली. सावरून उठण्यापूर्वी बसल्या जागीच तिला कोरडया वांत्या व्हायला लागल्या. पाण्याचा तांब्या घेऊन चुलती धावली. असेल काहीतरी असे आधी वाटले. पण अर्ध्या तासाने पुन्हा तोच प्रकार. चुलता चुलती घाबरली. नामुची दारू खाड्कन उतरली. त्याने जोशी डॉक्टरांना बोलवायला कामगार पिटाळला.

घंटाभराने जोशी डॉक्टर आले. ईमलीला त्यांनी

तपासले. चौकशी करता खरा प्रकार ईमलीने हळूच सांगितला. आपण विधवा असुन खरा प्रकार आईबापाला सांगितला तर ते मला जीती गाडतील,तेव्हा दोन दिवस तरी या प्रकाराची वाच्यता करू नका मग काय सांगायचे कसे सांगायचे ते बघता येईल तुम्ही मला आई वडिलांकडे पाठवायचा सल्ला दया अशी डॉक्टरांना गळ घातली. डॉक्टरांनी मान डोलावली. डॉक्टरांनी बी – कॉम्प्लेक्स चे इंजेक्शन टोचून दोन तीन टॉनिक वजा गोळया, सिरप प्रिस्क्राईब केले. दरम्याने बीलाचे १०० रूपये खिशात टाकताना "तूम्ही हिला रत्नागिरीतल्या चांगल्या डॉक्टरला दाखवा, काळजी करायचे कारण नाही मी इंजेक्शन गोळया दिल्या आहेत. एकदोन दिवस काही काळजी करायला नको." असे मोघमात बोलून डॉक्टर निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच चुलतीने ईमलीला घेऊन रत्नागिरी गाठली. "काल हप्त्याची सुट्टी म्हंताना बोकड रांदीत हुतो बगा आनि काय न्हाई ते ईमलीला भडाडा वकाऱ्या व्हाय लागल्या कीं.....कुठ काय बादलं का पोटात काय ग्येलं हयाचं भ्येव वाटायं लागलं की आमास्नं,मंग त्ये बामनाचं डागतर हाय न्हवं. . त्येला बलिवलं की दादल्यानं.....टचाचा दोन सुया मारल्या न शंबर रूप्पय घेतलं की डागतरानं....पर कसली भावना काय सांगाय यीना त्याला आनी म्हनालं का मोट्या डागतराला दावाय फाजे.....फाटंला पुन्यांदा योक वक्कारी झाली की ईमलीलां.....तरी राच्च्याला मटान न्हाई खाल्लं गां ईमलीनं

वाईच रस्स्यात कुसकरून दोन कोर भाकर तवडी खाल्ली-”

सुंद्री ईमलीची आय हे ऐकूनगडबडलीच.“ आस्सं ऽऽ कां.....तरीच म्या म्हनलं की इतक्या सकाळच्या पारी तुमी आनि ईमलीला घ्येऊन कस्काय आल्यात ? तु घाबरू नगं इमलां..... हत मोठ्ठ डागतर हाईत त्यास्न दावूया की- चुलती निघुन गेली. ईमलीला झोपाय सांगुन सुंद्री झाल्या गोष्टीची कलाप्पाला खबर दयायला क्रशरकडे निघाली. माय बाहेर पडली आणि ईमलीने तडक प्रेस गाठली. तिला गेटात बघितल्या बघितल्या सुऱ्या बाहेर आला. ईमलीने सांगितलेली वार्ता ऐकून सुऱ्या जाम खुलला. कल्लाप्पाला पध्दतशीर कचाट्यात धरण्या साठी त्याने ईमलीला सगळा बेत नीट समजावुन सांगितला.

खाजगी डॉक्टर गाठला तर तो गपाचुपीत गर्भपात करून ईमलीला मोकळी करील आणि सुऱ्या ईमलीचा बेत धुळीला मिळेल,त्यापेक्षा सिव्हील हॉस्पीटलला ॲडमिट व्हायच - आपल्याला सुऱ्यापासुन दिवस गेलेयत्,तो आपल्याशी लग्न करायला तयार आहे, मात्र आईबाबाचा याला विरोध आहे. ते जातपंचायतीला घाबरून आपल्याला जीवे मारतील. तेव्हा सरळ पोलिस केस करा नी सुऱ्याशी माझे लग्न लावून दयायला आईबापाला भाग पाडा..... असे सिव्हील हॉस्पीटल मधल्या डॉक्टरांना सांगायचे. पण या प्रकाराची मिटवा मिटवी करू दयायची नाही असे त्याने ईमलीला बजावले.

कल्लाप्पा नाना भाव्यांची टॅक्सी घेऊनच बि–हाडी आला. ईमली तिची आई टॅक्सीत बसल्या. आपून सिविल हॉस्पिटलमदी जाऊया असं ईमलीने आईला अगोदरच पटवून सांगितलेलं. कल्लाप्पाच्या मनाने चव्हाण किंवा औरंगाबादकर डॉक्टरांकडे जायचं होत पण सिव्हिलमध्ये कमी पैशात सोय असताना उग आनी मोटा डागतर गाटून हज्जार रूप्पय कस्याला वाया घालवायचं? हे सुंद्रिच म्हणणं त्यालाही पटलं. टॅक्सी सिव्हिल हॉस्पिटलच्या आवारात शिरली, माणसं खाली उतरत असताना मटांगे कॉन्ट्रक्टर समोर दिसले. कल्लाप्पा हात जोडीत “राम राम सायब म्हणत त्यांच्या समोर गेला.सगळे सोपस्कार केस पेपर वगैरे झटपट उरकले आणि ईमली तपासणीसाठी आर. एम. ओं. च्या केबिन बाहेर रांगेत बसली. आर. एम. ओ. नी ईमलीला तपासलं. ईमलीने खरा प्रकार त्यांच्या कानी घालून सुऱ्याने सांगितल्या प्रमाणे डॉक्टरांना विनंती केली. ही केस मटांगे कॉन्ट्रॅक्टर मार्फत आलेली या केसमधील गांभिर्य लक्षात घेता ईमलीला बाहेर बसायला सांगून आर. एम. ओं. नी मटांग्याना फोन लावला .

मटांग्यानी कल्लाप्पाला बाजुला घेऊन ईमली गरोदर असल्याचे सांगितले. कलाप्पा त्यांच्या खास ठेवणीतला माणुस, १०/१५ वर्षे त्यांची घसट. सुऱ्या ईमलीच्या प्रेमाची गोष्ट त्यांच्या कानी गेलेली. त्यांनी कलाप्पाला सल्ला दिला.

पोरगा भंडारी समाजाचा आहें.....तुझ्यापेक्षा उच्च जातीतला. रायकरशेठच्या खास मर्जीतलां.....तुझी पोरगी नवरा मेलेलीं..... तुझ्या जातीतला कोण उमेदवार पोरगा ईमलीला पत्करणार नाही मिळालाच तर अर्ध्या वयाचा एखादा बिजवर तीन चार पोरांचं लेंढार असलेला एखादा दारूडा.....तोच तुझ्या पैशावर डोळा ठेवून ईमलीशी म्होतूर लावील आणि सोन्याची कोंबडी देणारी म्हणुन ईमलीला हाताशी धरून तुला धुवील. त्यापेक्षा सरळ तिचे सुऱ्याशी लग्न लावुन दे -

कल्लाप्पा अजिजीच्या सुरात म्हणाला,"मटांगे शेट,तुम्ही म्हंतासा त्ये पटतय गा मला बी- सुऱ्या वडराच पोरगं आस्त तर ईमलीला देवून आनी दोन डंपर बी दिलं आस्तं की जावायाला. माज्या धंधात बी भागीनं घेतलं आस्तं. पर आमची वडराची जात पंचायत अक्षी बेकार बगा." त्यावर मटांगे म्हणाले,"त्याचीबी धास्ती सोड रे. मल्लूला व्हिस्कीचा खम्बा देऊन पटवतोकी त्यालाबी. तू कायतरी खूळ डोक्यात घेऊन आडवं लावाय बघतोएस ईमलीला अन सुऱ्याला! पण प्रकरण जड जाईल कलाप्पा - गाठ भंडाऱ्याशी आहे !" मग कल्लाप्पा बोलला, " मटांगे शेट, पोरगी जाती भाईर ग्येली म्हंजे नाकच कापलं म्हंतील गा समद..... माझं हागणं मुतणं बंद झाल म्हंतील गा त्ये....शेट तुमच्या पाया पडतो पर हया भानगडीत तुम्ही पडू नगासा - माजं म्या निस्तारतो कसतरी" ईमली आणि बायको दोघींना घेऊन कल्लाप्पा बाहेर पडला.

आपल्या बेताचा ईमलीलाच नव्हे आपल्या बायकोला सुंद्रीला सुध्दा पत्ता लागू नये अशा खबरदारीने कल्लाप्पाने पुढच्या हालचाली केल्या. ईमलीला टॅक्सीत घालून कलाप्पाने तिला कोतवड्यात नेली. तिला नामुच्या हवाली करून झाली गोष्ट त्याने कानावर घातली. चार दिवसांनी ईमलीला सांगली – कोल्हापूरकडे नेऊन मोकळी करायची तोवर तिला पाला बाहेर पडु द्यायचे नाही असा बेत ठरला.

सुऱ्या संध्याकाळपर्यंत ईमलीची वाट बघीत राहील. ती भेटल्या वर पुढे कसे काय करायचे हा बेत ठरवायचा होता. प्रेस बंद करून सुऱ्या बाहेर पडला. नाक्यावरच्या पानपट्टी समोर ईमलीचा भाऊ ईराप्पा दिसला. सुऱ्याने काही विचारण्या पूर्वीच ईराप्पा म्हणाला, "सुऱ्यादा . आज सकाळच्याला ईमली आलती मंग आय नी बाबा टयाकशीतून डागदरकडे गेलती ईमलीला कायतर झालया. दुप्पारी भाकरी खावुन कल्लादां ईमलीला कोतवड्यात घालवाय ग्येला. त्यो काय आजून आल्याला न्हाय घरला" एवढी बातमी पुरेशी होती. दुसऱ्या दिवशी सकाळीच सुऱ्याने कोतवडे गाठले.

मंगेशाच्या बागेत संकेत स्थळी जाऊन सुऱ्या वाट बघीत थांबला. अर्धा तास गेला आणि सुऱ्याच्या पायाशी बसलेला बादशा कान ताठ करीत भुंकायला लागला. गडग्या बाहेरून दोन वडारांचे पोरगे सुऱ्याला खुणावीत होते. सुऱ्या गडग्यापर्यंत गेला.

तुमी सुऱ्यादा न्हवं? सुऱ्या मानेनेच हो म्हणाला."आमाला नामुदानं धाडलया.ईमली त्येच्या पालावर हाई.तुमाला संगट घ्येऊन यायला सांगितलया - मनोमन हरखलेल्या सुऱ्याने छलांग मारून गडग्या पलिकडे उडी ठोकली.वडारांच्या पोरांसोबत तो नामुच्या पालाकडे जाऊ लागला.



नामु पालाबाहेर वाट बघीत उभा राहीलेला. सुऱ्या समोर येताच हात जोडीत, यावा सुऱ्यादो....असं म्हणून त्याने

सुऱ्याला पालात नेल. सुऱ्याने पालात प्रवेश केला  मात्र..... काय होतेय हे समजण्यापूर्वीच दोन तीन दांडगे वडार त्याच्यावर तुटून पडले. कापडाच्या पटकुराने त्याचे तोंड करकचुन बांधल्यामुळे सुऱ्याला 'ऊं' करायचीही सवड मिळाली नाही. त्याला लाथा बुक्क्यानी यथेच्छ तुडवूनकाढल्यावर हात पाय दोरीने करचुन बांधून त्यानी सुऱ्याला पालातच खांबाला डांबुन टाकले. सुऱ्याच्या मागोमाग आलेला बादशा ....सुऱ्याला आत मारहाण सुरू झाली हे ओळखुन तो दात विचकुन गुरगुरत पालाच्या कवाडी कडे सरकु लागला. बाहेर आडोसा धरून राहिलेल्या वडारानी दगडधोंडयाचा असा मारा केला की घाबरलेल्या बादशा  माघारी वळला. एक दोन धोंडे अगदी वर्मी लागल्यामुळे  धुम पळत माऱ्या बाहेर सावध अंतरावर जाऊन पालाकडे  तोंड करीत तो भुंकत राहील. दोन चार गडी पुन्हा दगड घेऊन त्याच्या दिशेने आलेले दिसताच बादशहाने पळ काढीत तडक घर गाठले. अंगणाच्या पेळेवर बसून आकाशाकडे तोंड करून तो अवलक्षणी ओरडु लागला.

बादशाचे भेसूर रडणे ऐकुन मंगेशची आई –बहिण दोघी बाहेर आल्या. मंगेशच्या बहिणीने आजुबाजुला नजर टाकली. तिला काहीच अर्थबोध होईना. मग तिने बादशहाला साखळीने बांधले. अन् ती पुन्हा कामाला घरात गेली. दहा पंधरा मिनिटे बादशा भीषण रडत राहीला तेव्हा  मात्र काहीतरी अघटीत घडल्याची चाहुल मंगेशच्या बहिणीला लागली. घरात पुरूष  मनुष्य कोणीच

नव्हते. तिने मागीलदारी जाऊन शेजारच्या भाईला हाक मारली. भाई आला. भाई समोर दिसताच बादशा दोन पायांवर उभा रहात भुंकायला लागला. भाईने बादशाची साखळी हातात पकडून त्याला मोकळं केल मात्र....साखळीला ओढ देत बादशा बागेकडे निघाला.

बागेच्या गेट बाहेर सुऱ्याची बजाज सुपर भाईने ओळखली. सुऱ्या ईमलीला भेटायला आला असेल असा तर्क त्याने केला. बादशा भाईला ओढीत सुऱ्या उभा होता त्या जागेपर्यंत घेऊन गेला. तिथे गेल्यावर वडारांच्या पालाच्या दिशेने मोहरा वळवीत भुंकायला लागला. भाईने बारकाईने निरिक्षण केले. पाला बाहेर नेहमीप्रमाणे वडारांची पाले खेळताना दिसली....एक दोन बाया चुली फुंकीत असलेल्या दिसल्या. बाकी सगळीकडे सामसुम. बहुदा सुऱ्या ईमलीला भेटायला वडारांच्या पालात गेलेला असेल - तो तासाभरात येईल. असा अंदाज करीत भाई बादशाला ओढीत घराकडे निघाला. बादशहा पाय नेटाने रोवीत परत फिरायला विरोध करीत राहीला.

दीड दोन घंटे उलटले तरी सुऱ्या आला नाही की बादशाचे भुंकणे रडणे सुध्दा थांबले नाही. मग मंगेशाच्या बहिणीने पुन्हा आईला हाक मारली. प्रसंगाचे गांभीर्य ओळखून भाईने वठारातले आठ दहा पोरगे जमा केले. बादशाची साखळी धरून भाई अन् त्याच्या पाठी वठारातले पोरगे असे लटांबर वडारांच्या पालाकडे निघाले. सुऱ्या गेला त्या वाटेने माग काढीत जोरदार भुंकत

बादशा निघाला. आता वडारांची पालं दिसायला लागली. दहा बारा माणसांचा जमाव पालांच्या दिशेने येताना बघितल्यावर पाच सहा वडार पाला बाहेर पडले आणि सगळया मंडळींना त्यांनी अध्यीवर गाठले.

भाईने सुऱ्याची चौकशी केली त्यावर समोरच्या वडारानी गळ्याची चामडी चिमटीत पकडून शपथ खात म्हटले “नाय् बा.....तुमचा कर्ता मानुस हिकडं यायला न्हाई- ईमलीचा बा तकड रत्नागिरीला ऱ्हातोय की.....हिकडल्या मान्सांशी त्येचा काय संबंध न्हाई.....बादशा तर गुरगुराट करीत साखळीला ओढ दयायला लागलेला. वडार लपवा छपवी करतायत् याचा भाईला अंदाज आला. जरबेच्या सुरात तो म्हणाला, “तुम्हीआम्हांला फसवशीला..... पन बादशा काय फसायचा नाय. बादशा माग काढील त्या पालाची आमी झडती घेणार.....काय व्हायचं असेल ते होऊन जाऊदे.....” भाईने अशी दटावती केल्यावर मात्र वडार संतापले- पाच दहा मिनिट हमरा तुमरी झाली. त्यांचा गलका वाढल्यावर पाला कडून आणखी १०/१२ वडार पुढे आले-

वडारांचा जोर वाढला. “आमी काय कोणाची चोरी केल्याली न्हाई- तुमच पोरगं आमच्या पोरीच प्वॉट वाढवाय लागलं आनी आमी काय गप बसाव काय? आता गुमान परत जावा न्हायतर येकेकाला पालातच जित्त गाडतु की आमी- आमी काय मेल्याल्या आयच दुद न्हाई पेलो! आमी सांगतु

तेच्यावर ईस्वास ठेवा. काय झाल तरी पालाची झडती घियाला देणार न्हाई!” वडारांची गुर्मीची भाषा ऐकल्यावर मात्र साळवी मंडळी चवताळली. भाईच्या बरोबर आलेल्या पैकी एक पोरगा छाती पुढे काढीत म्हणाला,“ बऱ्या बोलानी आमचापोरगा आमच्या ताब्यात दया. नायतर तुमची  पालं उभी  पेटवून देऊ ” झालं काडी पडली....अन् वडारांनी हाणामारीला सुरवात केली. भाईच्या हाताला हिसडा देऊन बादशा मोकळा झाला अन् हाणा मारीला करणाऱ्या एका वडाराच्या पोटरीचा लचका त्याने तोडला.

मंडळीची हाणामारी जुंपलेली बघताच वडारांच्या पालांमधून घण–पहारी घेऊन बापये पोरगे धावतच पुढे यायला निघाले.प्रसंगाच गांभीर्य ओळखून भाईने सोबतच्या पोराना माघारी फिरायलासांगितलं. साळवी मंडळी आरडा ओरडा करीत, कुकारे घालीत वाडीच्या दिशेने माघारी धावायला लागली. त्यांच्या मागे दगड धोंडयाचा मारा करीत वडारांचे बापये बाया यानी साळवी मंडळीना पिटाळून लावले.बादशाने मात्र त्या धुमश्चक्रीत आणखी दोन तीन वडारांच्या पायाचे लचके तोडले अन् त्यांचा जोर वाढलेला बघून पळणाऱ्या मंडळी सोबत त्यानेही माघार घेतली.

माणसांची आरडा ओरड ऐकून साळवी वठारातली बायका माणसे/पुरूष हातातले काम टाकुन धावतच निघाली. मंगेशाच्या बागेपर्यंत पळणाऱ्या मंडळींचा ताणपट्टा काढून वडार माघारी फिरले. पळणारी मंडळी  मंगेशाच्या घरा समोर अंगणात

पोहोचली. जाणत्यानी विचार विनिमय करून झाली गोष्ट सुऱ्याच्या वडिलांना बाबा भुत्यांना सांगायची असा बेत ठरत असतानाच मंगेश साळवी आला. मंगेशला झालेल्या प्रकाराची कल्पना आल्यावर तो आणि भाई साळवी दोघेही सायकल घेऊन रत्नागिरीकडे रवाना झाले. दोघेही परटवण्यापर्यंत पोहोचले अन् जकात नाक्या समोरच बाबा भुते उभे असलेले दिसले.

बाबा भुत्यांबरोबर मंगेश अन् भाई शिवरे वठरात पोहोचले. शिवरे वठारातले भाऊ शिवरे.....रिटायर्ड पी. एस. आय. हे जाणते माणुस, शिवरे वठरात त्यांच्या घराला मोठा मान. झाली गोष्ट ऐकल्यावर भाऊ शिवऱ्यामधला पोलिस जागा झाला. " वडारानी सुऱ्याला पालात डांबुन ठेवलेले असणार हे नक्की - ही जात भलती इब्लिस - चेहऱ्यावरची सुरकती सुध्दा न हलवता थंड काळजाने समोरच्या माणसाचा गळा चिरणारी क्रूर औलाद ती. पोर जीवंत हाताला लागला तरी पुरे - गोष्ट बरीच पुढे गेली, पार हाताबाहेर गेली !" असे म्हणत त्यांनी भिंतीवरच्या शोकेसमधली डबल बॅरल बाहेर काढली. काडतुसाचा पट्टा कमरेला बांधीत शिवरे वठारातल्या तरण्याताठया पोरांना चौकात जमायचा हुकुम दिला. खन्ना कॉन्ट्रक्टर कडून दोन डंपर आले. उत्साही पोरे धडा धडा उडया मारून हौदात चढली. आधी समजुतीने सांगुन बघा. दम देऊन बघा.....हातघाई करू नका. अजुन दोन ट्रक मधुन मी येतो मी येईपर्यंत मंगेशाच्या घराजवळ दम धरून रहा

उत्साहाच्या भरात कोणी आगाऊपणाकरायचा नाही.....असा खास पोलिसी आवाजात भाऊ शिवऱ्यानी दम भरला नी डंपर सुटले.

डंपर मंगेशाच्या घरासमोर उभे राहिले. पोरे धडाधड खाली उतरली. साळवी वठारातली मंडळी रागाने बेभान झालेली. कुणीतरी तावातावाने सांगायला लागला. आम्ही समजुतीने सांगण्याचा प्रयत्न केला पण वडारानां भलतीच चरबी आहे. आमची जमात अपुरी आहे असे बघून त्यानी हाणामारीला सुरवात केली. आम्हाला शेपुट घालून माघार घ्यावी लागली. आता किती दम आहे वडारांचा तेच बघूया! शिवरे मंडळीनी भाऊंची सुचना असतानाही ट्रक मधुन येणाऱ्या मंडळीची वाट न बघताच वडारांच्या पालावर जायचा निर्णय घेतला. हाणामारीची खुमखुमी असणारी तरणी पोरे धावतच पालांच्या दिशेने निघाली.

साळवी मंडळी माघारी पळाली ती जमात करून चाल करणार हे वडारानी ओळखलेले होतेमंगेशाच्या घरासमोर दोन डंपर थांबलेत्यातून५०/६० मंडळी उतरली..... साळवी वाडीतले वीस पंचवीस लोक सगळे पालाकडे निघाले याची वर्दी वडाराना मिळालेली, ते दबा धरून राहिलेले. मंगेशाच्या बागेतुन माणसे गडग्या बाहेर पडून वडारांच्या पालांकडे जायला लागली अन् अकस्मात दगड धोंड्याचा बेदम मारा सुरू झाला. जमात बघून वडार हातघाई करायचे नाहीत असे सगळयांनी मनोमन गृहित धरलेले पण उलटेच घडले. बऱ्याच माणसांना दगड धोंडयांचा

चांगलाच खुराक मिळाला. खुमखुमी असणारे पोरगे चेन फिरवीत चॉपर सांभाळीत दगड धोंडे चुकवीत बेताबेताने पालांच्या दिशेने पुढे सरकु लागले. पालं अगदी नजिकच आलेली. आता मात्र घण पहारी सावरीत वडार सरळ पुढे आले चेन चॉपर यांचा काहीच उपयोग झाला नाही. वडारांचा हल्ला एवढा तिखट होता की,हाणामारीची सवय असलेली शिवरे मंडळीही अवाक् झाली. पुरूषांच्या बरोबरीने वडारणी सुध्दा खोरी –पिकाव असली नामांकित हत्यारे घेऊन चाल करून आली. वडारांच्या केसालाही धक्का लागला नाही. शिवरे ...साळव्यांच्या पोराना बेदम मार खावालागला. पंचवीस तीस तरणे ताठे पोरगे जायबंदी झाले.एकच हलकल्लोळ माजला. जिगरबाज शिवरे मंडळीना माघार घेणे नामुष्कीचे वाटले. पण परिस्थिती हाताबाहेर जात चालली तेव्हा मात्र काही विचारी माणसानी मागे फिरा.....मागे फिरा.....अशी हाकाटी सुरू केली.

वर्मी मार खाल्लेली पोरे ओरडून किंचाळून राहीली. शाबुत होते ते जीव वाचवण्यासाठी माघार घेऊ लागले. नेमक्या त्याच वेळी ट्रकांचा घरघराट ऐकायला आला. पळणाऱ्यानी जीवाच्या आकांताने हाकरायला सुरवात केली. शिवऱ्यांची नवीन कुमक आल्याचा सुगावा लागल्यावर मात्र वडार हादरले.....आता चिडलेली मंडळी नक्की एकुण एक पाल पेटवून देणार हे ओळखुन म्हातारे वडार, बायका तरण्या वडारांना आवरायला धावले. भाऊ शिवरे आणि इतर मंडळी बंदुका सरसावीत येताना

बघितल्यावर मात्र गळाठलेल्या वडारांनी हात जोडीत भुईवर बसकण मारली.

दोन म्हातारे वडार पागोटी काखेत दाबुन भाऊंना सामोरे गेले. भाऊंच्या पायावर डोके ठेवून, "मालक चुक झाली, आमाला जिवानिशी मारू नगासा.....तुमच्या मुलकात भीक मागुन, खडी फोडून रगात गाळून पोट भरतूया आमी....झालतर चेपलीनी हाना आमाला पर जिवं मारू नगासा " अशा विनवण्या सुरू झाल्या. आया बाया पुढे धावल्या. समोर दिसेल त्याचे पाय धरून दणदणा छातीवर मुटके मारीत रडत ओरडत त्यानी विनवण्या सुरू केल्या. आता बाजु पलटलेली बघून मार खाऊन माघार घेण्याची नामुष्की पत्करणारी मंडळी चिडून पुढे सरसावली. आधी हल्ला करून जमात बघितल्यावर मानभावीपणा करणाऱ्या वडारांची त्यांना चीड आली. मगाचच्या मारामारीचा वचपा काढण्यासाठी त्यानी हात धुवून घ्यायला सुरवात केली.

वडार पक्के बिलंदर यावेळी आगळीक झाली तर पळून मुलूख गाठायचीही सवड होणार नाही हे ओळखुन काही प्रतिकार न करता त्यांनी मार खाणं पत्करल. मगाशी हल्ला करणाऱ्यांपैकी पालात दडून राहीलेल्या वडारांना माणसानी पालात शिरून बाहेर खेचीत लाथा बुक्क्यानी तुडवायला सुरवात केली. मगाचच्या हाणामारीत जायबंदी झालेल्या पोरांना उचलून घेऊन काही मंडळी मंगेशच्या घराकडे निघाली. भाऊ शिवरे हाडाचे पोलिस! सोबतच्या मंडळीना मनसोक्त हात धुवायची संधी दिल्या नंतरच

त्यानी आवरते घेऊन परिस्थती ताळयावर आणली.

मग आलेल्या माणसानी वडारांच्या पालांची झडती घ्यायला सुरुवात केली. बेफाट मार खावून अर्धवट शुद्धीत असलेला सु-या नी ईमली एका पालात सापडली. माणसानी त्यांच्या हातापायाला बांधलेल्या रशा सोडून तोंडात कोंबलेले बोळे काढले. पाणी पाजल्याकर सावध झालेला सु-याने जे सांगितले ते भीषण होते. त्या दोघानाही जिवंत गाडून टाकण्यासाठी मागच्या बाजूला खड्डा खणायचे काम सुरू होते. त्याना रातोरात जीवंत गाडून भिमू पाल उठवून कर्नाटकात पळून जाणार होता. थोड्याच वेळात दडून राहिलेला कल्लाप्पा ही सापडला. त्याला भाऊ शिवरेनी पोलिसी खाक्यात कानाखाली अशी वाजवून दिली की , “ चुकलो चुकलो सायेब.... पाया पडतो.... सांगशीला ते तसं वागतू.... ” असं म्हणत त्याने भाऊंचे पाय धरले.

भाऊ जरबेच्या आवाजात म्हणाले, “ तुझ्या विधवा पोरीला सुऱ्या पेक्षा कोण मोठा तालेवार जातभाई मिळवून देणार होतास तू? सु-या काय तुझ्यापेक्षा खालच्या जातीचा समजलास काय रे बेलदारा? आपली जिद्द पुरी करण्यासाठी पोराना जिती गाडायला निघालास तू .... आमच्याच गावात कमाई करून आम्हालाच दादागिरी?चिडलेली पोरं पालांसकट सगळ्या वडाराना जित्ते जाळून टाकतील .... पोलिस पण नाय वाचवणार तुम्हाला.” आता मात्र कल्लाप्पा सकट म्हातारे कोतारे

भाऊ शिवऱ्यांच्या पायावर लोटांगण घालित स्वत:च्या थोबाडात मारून घेत अजीजीच्या सुरात विनवण्या करायला लागले .

“सायेब , चुकल की आमचं... कुटं श्यान खालो नी ह्या कल्ल्याच्या नादाला लागलो आमीबी... मटांगे सायबानी पंच मंडलीला श्येला पागूट म्हणूनहज्जर रुपय दिवून समजिवलं तवाच जात पंचायतीची पंच मंडली बी आकरा हजार रुपाये दंड घिवून तोड कराय तयार तयार झालंती. आमी बी लय सांगून दमलो की ,पर ह्यो कल्ल्या काय बधंना.... क्रशरचा पैका खावून लई माजाला आलया की ह्ये बेणं. त्ये म्हंतय का भंडाऱ्याच्या पोरानं माजं नाकच कापल.... पोरगी पोटुशी करून पेचातधरल की,मी ह्यास्नी जित्ता गाडनार आता. ह्येच्या जिगरीपायी आता आमाला बी ह्यो मुलुक सोडून भिक मागायची येळ आली बगा .... आनी पोर ह्येची रांड मुंड .....तिला काय जातीतलं कोरं पोरगं न्हाय करून घ्याचं . तुमी सायेब तानून धरू नगासा.... पंचायतीत आकरा हजार दंड आनी बकऱ्याच ज्येवान घालुन न्याव तोडतो आमी आनी पोरगं तुमचं न्हावू द्या लगीन ईमली संगं...”वडार पुरते जेरीला आले हे ओळखल्यावर मग भाऊ शिवऱ्यांनीही फार ताणून धरलं नाही. त्यानीही तजोडीची भाषा सुरु केली.

“ठीक आहे. आधी सु-याला नी विमलला चव्हाण डोक्टरांकडे ॲडमिट करा. आठ दहा दिवसआराम करून पोरं

हिंडती फिरती होऊद्यात. जात पंचायतीला अकराच का? पंधरा हजार रुपये दे.मग साळव्यांच्या मंगल कार्यालयात धूमधडाक्याने लग्नाचा बार उडवून देवूया. कल्लाप्पा कॉन्ट्रॅक्टर आहे... त्याच्या इतमामाला शोभेल असा लग्नाचा धडाका व्हायला हवा. काय मंजूर आहे ना ? " त्यावर कल्लाप्पा म्हणाला, "जी सायेब ,बगाच तुमी. धा बकरं तोडून आख्ख्या भंडार वाड्याला वशाट घालतू की. " मग वडारांच्या पंचांसमोर कल्लप्पाला दिला शब्द पुरा करायची शपथ घ्यायला लावून पंचानाही दम दिला. "तुम्हाला दंडवाढवून दिलाय... अजून काय असेल तर आत्तच बोला " त्यावर पंच मंडळीतला एक म्हातारा बोलला, "शिवरे भाऊ, आता आमची कायबी तक्रात न्हायी. तुम्ही बिबघोर -हावा. साडी चोळी नी चार डगिनं घालून ईमलीचं तुमच्या पोरग्याशी लगीन लावून घेताव .. ह्यो आमा पंच मंडळीचा शबूद हाये. आवो म्हन हाय न्हवं मियाँ बीबी राजी मंग काय करतूया काजी? " नी सगळी मंडळी गडगडा गडगडा हसली.

*************

# ६.चमडा सस्ता है

प्रियांकानं पगाराचं पाकिट उघडून आतले दिडशे रुपये काढून घेतले आणि दहाची नोट ठेऊन पाकिट पर्समध्ये ठेवलं. ती विद्यानगरीत डिस्टंटएज्युकेशनला लायब्ररीत गेलं वर्षभर डेली वेजीसवर जॉब करीत होती. तिला रोज सत्तर रुपये दराने महिन्यातल्या सुट्ट्या नी खाडे कापूनपगार मिळायचा. पगार झाला की सगळे पैसे मम्मीकडे द्यावे लागायचे. मम्मी बसचं तिकिट नी वरा खर्चासाठी दहा रुपये अशी नेमकी रक्कम द्यायची. त्याबाहेर महिनाभरात एक छदामसुद्धा मिळत नसे. उलट तिच्याबरोबर असणारी बहुसंख्य मुलं मुली मिळणा-या पगाराबाहेर वरखर्चासाठी म्हणून घरून जादाचे पैसेमागून घ्यायची. प्रिया या वरून कधि कदि्ह मम्मीशी हुज्जत घालायची . पण मम्मी शांतपणे आपल्या कुटुंबाच्या  फाटक्या परिस्थितीचं विदारक चित्र असं काही वर्णन करायची कि, तिला गप्प बसणं भाग पडायचं. या महिन्यापासून डेलिवेजीसच्या दरामध्ये पाच रुपयाची वाढ झाल्यामुळे प्रियाला अठ्ठावीस दिवसाचे एकशे चाळीस रुपये जादा मिळाले. आता मम्मीला कळू न देता दरमहा चैन करायला जादा पैसे मिळत राहणार या आनंदात प्रिया ऑफिसबाहेर पडली. मेंअ गेट बाहेर पडताच

डाक्याबाजुला असलेल्या चायनिज कॉर्नरमध्ये ती आज पहिल्यानेच जात होती. काऊंटर लगतच्या टेबलवर दोन पॉश मुलं बसलेली होती म्हणून ती दोन टेबलं सोडून पलिकडे बसली.बसल्या बसल्या वेटरला फॅन्लावायला सांगून तिने शांतपणे मेन्यूकार्ड उघडलं.

एकेका पदार्थाच्या किमती बघितल्यावर आपली एकशेचाळीस रुपयांची पुंजी किती नगण्य आहे याची होऊन सगळ्यात स्वस्त मसाला नुडल्सची ऑर्डर तिने दिली. समोरच्या टेबलवर बसलेल्या पोरांपैकी घा-या डोळ्याचा ऋत्विक सारखा दिसणारा पोरगा पुन्हा पुन्हा तिच्याकडे पहातोय हे लक्षत येऊन ती भलतीच सुखावली. त्या हिरोने खिशातून मोबाईल काढला.सोनी कंपनीचा त्या हॅण्डसेटची ।मर्केट प्राईझ पंधरा हजाराच्यापुढे आहे हे ती ओळखून होती. मोबाईलशी चाळा करीत त्याच्या गप्पा सुरू होत्या. ऋत्विक समोर बसलेल्या पोराने काहीतारी निकड सांगून त्याच्याकडे वीस हजार रुपये उसने मागितले. क्षणभरविचार करीत ऋत्विकने बेदरकर्पणे हॅण्ड्सेट बाजुला टाकून सॅक उघडली नी आतून हजाराच्या नोटांचं बंडल काढलं. बंडलाच्या पीनची टोकं बाईकच्या चावीने सरळ करून तो नोटा मोजू लागला. चाळीस नोटां ची चळत मित्रासमोर टाकित तो म्हणाला, “आजही डील हुवा .... पूरे एक लाख मिल गये.” प्रिया डोळे विस्फारून पहातच राहिली. एवढी मोठी रक्कम

एतक्या जवळून ती प्रथमचपहात होती. असंच पुढे जावं नी हळूवार पणे ते बंडल उचलून  हाताळावं नी पुन्हा पुन्हा त्या नोटा मोजाव्यातअसा मोह तिला झाला. ती एकटक पणे बंडल पहात आहे हे लक्षात येवून ऋत्विकने मित्राला डोळा मारला. मित्रांच्या गप्पांमधून त्याचा काही तरी प्रॉडक्ट विक्रीचा धंदा आहे नी त्यात त्याला दरमहा दोन ते अडिच लाख रूपये  मिळतात एकधं प्रियाला कळलं. तेवढ्यात ज्यूस चे ग्लास ठेवलेला ट्रे घेऊन वेटर आला. तरीही टेबलवर पडलेलं बंडल  न उचलता ऋत्विकने  ज्यूसचा ग्लास तोंडाला लावला नी शांतपणे एक एक घुटका घेऊ लागला.

त्याच्या मित्राने मात्र  एका दमात ग्लास रिकामं केलं . मग तो हात जोडीत बोलला, “अरे यार  राकेश... तेरा बडा एहसान हुआ. मुझे जल्दी जाना है... ” नी तो उटःऊन जाऊ लागला.   अच्छा , म्हणजे  या हिरोचं नाव राकेशआहे तर..... प्रिया मानताल्य मनात म्हनाली. वेटरने मसाला नुडल्सची प्लेट  तीच्या समोर ठेवली. राकेशने खूण करून वेटरला जवळ  बोलावलं नी शंभरची नोट दिली. प्रिया चवी चवीनं नुडल्स खात असता तो अधून मधून तिच्याकडे  पहात होता ही बाब प्रियाने हेरली नी  त्याने पुन्हा वळून पाहिल्यावर त्याला स्माईल दिलं. वेटरने बील पेड करून उरलेले  पैसे नी बडिशेपेची प्लेट राकेश समोर ठेवली तेंव्हा दहाची नोट प्लेटमध्ये ठेवून सोपचे चार दाणे त्याने तोंडात टाकले. अर्धवट

प्यालेलाज्यूसचा ग्लासात तसंच टाकून त्याने नोटेचं बंडल सॅकमध्ये टाकलं नी तो उठला. काऊंटर समोर गेल्यावर त्याने मागे वळून हसतच  प्रियाकडे पाहिलं नी तो निघून गेला.”नुडल्स खावून झाल्यावर बिलाचे नेमके पैसे काढून वेटरकडे दिल्यावर शांतपणे अर्धा ग्लास पाणी पिऊन प्रिया उठली. ती राकेश बसला होता त्या टेबल जवळ आली नी तिने पाहिलं तर राकेश बसला होता त्या बाजूच्या खुर्चीत त्याचा हॅण्डसेट होता. तिने चौफेर नजर फिरवून पाहिलं. वेटर आत गेलेला होता नी गल्ल्यावरचा माणूस बाहेर पहात होता. तिने खुर्चितला मोबाईल उचलून पर्समध्ये टाकला नी ती हॉटेलबाहेर पडली.

बस स्टॉप गाठल्यावर तिने पर्समधून हॅण्ड्सेट बाहेर काढला. मेन्यू ओपन करून व्हिडीओ सोंगचा फोल्डर ओपन केला.सगळी लेटेस्ट गाणी भरलेली होती. तिनेआपल्या आवडीचं धूम मधलं गाणं सुरु केलं.पर्स मधून आपला ईअर फोन काढून त्याचा जॅक मोबाईल मध्ये खुपसून तिने व्हॉल्यूम मोठा केला नी ती गाणं ऐकू लागली. हे सुरू असता आजूबाजूची लोकं चोरट्या नजरेने आपला कॉस्टली हॅण्ड्सेट न्याहाळून पहात आहेत हे तिच्या लक्षात आलं. बस मधून जाताना कुर्ला स्तेशन येई पर्यंत. ती मजेत गाणी ऐकत राहिली. या दरम्याने राकेशचा कॉल येईल असं तिला वाटत होतं. तसा त्याचा कॉल आलाचअसता तर मोबाईल

आपल्याकडे आहे हे ती सांगणार होती. हॅण्ड्सेट ढापायचाच असता तर उचलल्या उचल्यातो स्वीच ऑफ करायचा असतो हे तिलाचांगलं माहिती होतं. पण तसा विचारही तिच्या मनाला शिवला नाही.उलट तो परत देऊन राकेशशी चांगली मैत्री जमवायचा तिचा बेत होता. घरी गेल्यावर , " मम्मी... आज ऑफिसमध्ये पार्टी झालिय्... मला चहा खाणं नकोय." असं सांगून ती पाया धुवायला गेली. ऑफिसचे कपडे उतरून गाऊन चढवला . पर्स मधलं पगारचं पाकिट काढून तिने ओट्या पुढे काम करणा-या मम्मी समोर फेकलं. त्यासरशीआवाज चढवीत मम्मी बोलली, "काय गं हे भवान्ये? कष्टाने आणलेली लक्ष्मी अशी फेकायची नसते.... तिच्यासोबत समृद्धि येत असते, एवढी साधी अक्कल नाही का गं तुला? चार टिकल्या कमावायला लागलिस तर एवढा कसला माज आला गं तुला? चल पहिले ते पाकिट उचलून नेहेमी सारखं देवासमोर ठेव नी माफी माग.... " मम्मी भडकली तर खाडकन मुस्काटित मारायला कमी करणार नाही हे ओळखूनप्रियाने मुकाट्याने पाकिट उचलून देवाच्या तसबिरीसमोर ठेवलं नी गालफडात मारूनघेत ....देवा मी चुकले मला माफ कर असं म्हणत पाकिट देवासमोर ठेवून नमस्कार केला. हे करीत असता ती मनातल्या मनात मम्मीला म्हणत होती.... महिनाभर रोज आठ आठ तास राबून कमावलेल्या या चार टिकल्या म्हणजे लक्ष्मी नव्हे ....

चाननिज मॉल मध्ये राकेशने सॅक मधून बंडल  बाहेर काढलंना ती लक्ष्मी... ही डेलीवेजीसच्या नावाने दिलेली भीक आहे भीक... नी हिच्या येतं ना ते दळिंदर.....  मग पर्स मधला राकेशचा हॅण्ड्सेट घेत स्लीपर घालून ती बाहेर पडली.

कुर्ल्यातआठ बाय बाराच्या बैठ्या खुरड्या सारख्या खोल्या असलेल्या  सरकारी कॉम्प्लेक्स मध्ये  रहाणारी सगळीच मुलं फक्त दोन बाय दोनच्या मोरीत आंघोळ,जेवण नी रात्री उशीरा बारा वाजता नाईलाजाने चार पाच माणासांच्या गर्दीत मिळेल त्या सांदि फटीत पोटाशी पाय घेऊन उजाडेपर्यंतआडवं होण्यापुरती घरात टिकायची. बाकी सगळा वेळ  रस्त्याच्याकडेला  कुठे मोकळी जागा  मिळेल तिथे जागा मिळाली तर बसून नाहीतर उभं राहून वेळ घालवायची. रस्त्या पलिकडे  कॉर्नरपाशी सहा बाय सहा च्या चबुत-यावर  बाबासाहेबांचा  अर्धपुतळा बसवलेला होता.तो चबुतरा मोकळा आहे हे पाहिल्यावर प्रिया तिथे जाऊन बसली नी  विडिओ सॉंग  सुरु केली. तिच्या हातातला  तो कॉस्टली हॅण्ड्सेट पाहिल्यावर गल्लितली  पोरं  पोरी तिच्याबोवती जमली. तिथे राहणारी काही पोरं अधून मधून कुठून कुठून अशा चिजा 'काढून' विकायला आणायची. या धंद्यात पोरीसुद्धा कमी नव्हत्या. आणलेली वस्तू  आपण  कशी शिताफिने उडवली हे  फुशारकीने छाती फुगवून सांगितलं जायचं . अर्थात अशा वस्तूला  चोरलेली न म्हणता ती अमुक

अमुक ठिकाणाहून ‘काढली’असं म्हटलं जायचं.मग तीची किंमत ठरवली जायची नी तिथे किंवा आजूबाजुला उभं राहून गि-हाईकं शोधून ती विकली जायची नी कमाई करणारा पोरगा दोस्त मंडळीना कुल्फी वडापाव .... काहीना काही खिलवायचा. गवारे कुटुंबातले राहुल नी प्रिया यांची अशी ख्याती नव्हती. उलट त्यांचे आई वडिल कडक शिस्तीचे, कुणाच्या अध्यात मध्यात न पडणारे, अर्वाच्य न बोलणारे, प्रामाणिक वागणारेम्हणून सगळेजण त्याना वचकून असायचे नी मान द्यायचे. गवारे काकी तर गल्लितल्या कोणाचही पोर गैर वर्तन करताना दिसलं तर कान धरून मुस्कट फोडायचा अधिकार असलेली. ती येताना दिसली की ओळखीची पोरं पोरी मान खाली घालून साळसूदा सारखी गप्प रहायची.

पण त्या बकाल वस्तीत राहून कोणाच्या वाह्यात संगतीला लागून कोणाची बुद्धि कधी कशी फिरेल याचा नेम नव्हता. खाली मुंडी घालून अब्रूदार पणे वागणारी बारावीतली किंवा कॉलेजला जाणारी बिंधास्तपणे कोणा कोणा बरोबर बेताल फिरू लागायची..... पर्स मधून नोटांची चळत काढून संगतीतल्या पाच सहा जणाना होटेलात न्हेऊन खिलवायची.... एखादा पोरगा खिशातून रामपूरी काढून आपण अमक्या तमक्याच्या गॅंगबरोबर फेरिवाल्यांकडून कसा हप्ता गोळा करतो ते फुशारकीने सांगू लागायचा.

म्हणून प्रियाच्या हातात कॉस्टली हॅण्डसेट बघितल्यावर कही बेरकी पोरं अवाक् होऊन चौकशी करू लागली. त्यावर हा हॅण्ड्सेट ऑफ़िसमधल्या मॅडम गडबडीत विसरून गेल्या म्हणून आपण आणलेलाअसून उद्या तो परत नेऊन देणार आहोत  असं प्रियाने सांगितल्यावर बाजुची गर्दी कमी झाली. तिचा भाऊ राहुल दहावीला नव्वद टक्के मार्क्स मिळवून पास झाला. तो आता बारावीला होता. तो घरी आल्यावर नेहेमी पुढच्याच चौकात गुलमोहराच्या झाडाखाली बसून अभ्यास करीत बसायचा. चौथी पाचवीत जाणा-या कुणीतरी छोट्या पोराने त्याला चुगली केली. प्रियादिदीने ऑफिस मधून भारी हॅण्ड्सेट काढून आणलाय नी  पुतळ्याजवळ गाणी ऐकत बसलीय्...... हे ऐकताच राहूल तिरमिरी सरशी घराकडे जाऊ लागला.  पुतळ्याजवळ मैत्रिणींच्या घोळक्यात बसलेली प्रिया नी तिच्या हातातला मोबाईल त्याला दिसला. त्याने घरी जाऊन मम्मीला ही गोष्ट सांगितली.

गवारेकाकी वेताची काठी घेऊनच बाहेर पडली नी तिच्या मागोमाग बारकी  पोरंही धावली. मम्मी काठी घेऊन येताना दिसल्या बरोबर प्रियाने  चबुत-या वरून  खाली उडी मारली.मम्मी समोर  येताच  गडबडीने हा मोबाईल ऑफ़िस मधल्या मॅडम गडबडीत विसरून गेल्या म्हणून आपण आणलेलाअसून उद्या तो परत नेऊन देणार आहोत ... असं सांगून मोबाईल स्वीच ऑफ करून तिने मम्मीच्या स्वाधिन

केला. मग मात्र काहीहीन बोलता मम्मी माघारी गेली. दुस-या दिवशी ऑफिस सुटल्यावर मेनगेट बाहेर आल्यावर प्रियांकानी आजूबाजूला पाहिलं. चायनीज कॉर्नरच्याबाजूला हिरो अपाचेला रेलून उभा असलेला राकेश दिसला.ती अगदीजवळ जाई पर्यंत त्याचं लक्षच नव्हतं. गडबडीने हॅण्ड्सेट समोर धरीत , "साब ...ये लो अपना हॅण्डसेट... कल शामको आप चायनीज कॉर्नरमें आप भूल गये थे... .. उना लोगोंका कुछ भरोसानहीं इसलिये मै लेके गयी.... मुझे लगा कि आप कॉल करेंगे... मै देर रात तक राह देखती रही ..." त्यावर "ओ हो तुम बडी वफादार हो..... जब मेरे समझ में आया तब मैंने यहाँ आकर चायनीज वालेको पूछा.... उसने ना कहने पर मै ने उम्मिद छोड ही दी...और आज नया मोबाईल खरिदने वालाही था... " मग ती नको नकोप म्हणतअसतानाही त्याने तिला आग्रह करून समोरच्या वोक इन मध्ये नेले. आता रोज दुपारी लंच अवर मध्ये संध्याकाळी तो यायला लागला.घरून आणलेला पोळीभाजीचा डबा भिका-याला देऊन प्रिया वॉक इन मध्ये पंजाबी डिश खाऊ लागली . घरी जेवलं नाही तर मम्मीला संशय येईल म्हणून संध्याकाळी ती काहीही खाणं कटाक्षाने टाळून फक्त ज्यूस किंवा कोल्ड्रिंक घ्यायची. तो संध्याकाळी तिला अपाचे वरून कुर्ल्यापर्यंत सोडायचा. दहा बारा दिवस गेल्यावरएका शनिवारी प्रिया त्याला म्हणाली,"कल छुट्टी है, लेकिन मै

ओव्हर टाईम का बहाना करके निकलूँगी..... शाम छह बजेतक हम खूब घुमेंगे... ...” ठरल्याप्रमाणे रविवारी ओव्हर टाईमचं कारण सांगून नऊ वाजता प्रिया बाहेर पडली. कुर्ला बस स्टँडवर राकेश उभा होता.आज त्याने बाईक ऐवजी कार आणलेली. प्रिया आनंदात कार मध्ये बसली. बारावाजेपर्यंत मनसोक्त फिरूनझाल्यावर राकेशने दिल्ली दरबार गाठलं. फॅमिली रूममध्ये बसल्यावर चिकनबिर्याणीची ऑर्डर दिली.खाना झाल्यावर राकेशने तिला आपल्या फ्लॅटवर चलण्याचा आग्रह केला. त्याच्या वैभवाने प्रिया थिजून गेलेली... त्यांच्या दैनंदिन भेटी व्हायला लागल्यावर राकेशने चुकूनही तिच्याशी जवळिक किंवा लघळपण करायचा प्रयत्न केला नव्हता. प्रिया पूर्ण विश्वासाने जायला तयार झाली. बाहेर पडल्यावर राकेशने मित्राला फोन
करून त्याला कॉर्नर वर यायला सांगितलं.

ठरल्याप्रमाणे बांद्रा क्रॉसिंग जवळ त्याचे दोन मित्र उभे होते. “ हाय चिकने......” सलामी झाडित एकाने ड्रायव्हिंग सीट चा ताबा घेतला. दुसरा मित्र त्याच्या बाजूला बसला नी प्रिया राकेश मागच्या सीटवर बसली. कार सुरू झाल्यावर .... हाय चिकने म्हणत प्रिया त्याच्या गळ्यात पडली. कार सुसाट पळत होती. तासाभराने एका नवीन इमारती समोर कार थांबली . “दो कॉफी लेके आओ ” असं फर्मान सोडून राकेशने तिला चलण्याची खूण केली. तो

एरिया प्रियाला अजिबात ओळखता आला नव्हता. दोघं लिफ्ट्मध्ये चढली. सातव्या मजल्यावर लिफ्ट थांबली. तो म्हणाला, “मेरा फ्लॅट उपर है वहाँ तक लिफ्ट नहीं जाती.” दोन जिने चढून गेल्यावर तीन नंबरचा फ्लॅट उघडून तो आत शिरला.ए.सी. सुरू करूनत्याने टीव्हीचा रिमोट प्रियाकडे दिला . सराईतपणे चॅनेल्स बदलित तिने म्युझिक चॅनेल सुरु केलं. दहा मिनिटातच मित्र कॉफी घेऊन आले. प्रिया चवी चवीने कॉफीचा आस्वाद घेऊ लागली . अर्धा तास उलटला नी टीव्ही बघता बघता प्रियाला झापड येऊ लागली... प्रयत्ना करूनही पापण्या मिटू लाग्ल्या अन् बघता बघता ती सोफ्यावर आडवी झाली. ती बेहोश झाल्याची खात्री झाल्यावर मित्राना टाळी देत राकेश म्हणाला, “काम हो गया.... अब चार दिनोमें हम मालामाल हो जायेंगे” मित्रानी तिलाउचलून आत बेडरूम मध्ये नेऊन ठेवलं नी ते बाहेर आले.

पहाटे दोनच्या सुमाराला प्रियांक ला जाग आली. डोक कमालीच ठणकत होत नी सगळ्या अंगाचा गोळा झाला होता. बाथरूमची अनावर कळ ।अल्यामूळे नाईलाजाने ती उठून बसली. आपण पूर्ण निर्वस्त्र आहोत हे लक्षात येवून ती चांगलीच चपापली पण खोलीत आपण एकट्याच आहोत नी हॉल मध्ये जायचा दरवाजा बंद आहे हे उमजल्यावर सुस्कारा टाकीत ती बाथरूमच्या दिशेने जाऊ लागली. दाराच्या उजव्या बाजूला असलेल्या बोर्डवरची दोन्ही स्वीच ऑन करून ती बाथरूममध्ये

घुसली. तोंडावर सपासप पाण्याचे सपकारे मारून डाव्या हाताच्या कुळच्याने डोक्यावर पाणी  थोपटल्यावर डोक्याचा ठणका कमी झाला. हॅंगरशिफ्ट वरच्या टॉवेलने तोंड पुसून तोच टॉवेल पांघरून ती बाहेर आली. रूममधला लाईट लावला. तीची अंतर्वस्त्रं कॉटखाली पडलेली दिसली पण टॉप नी सलवार कुठेच दिसेना.  बाथरूम लगतच्या भिंतीत एका बाजूला वॉर्डरोब नी कडेला रायटिंग टेबल होत. तिने टेबलावर ठेवलेला बॉक्स उघडला , त्यात बिर्याणी होती. नी जवळ अर्धी संपवलेली कोकोकोला ची बाटली होती, प्रियाने वॉर्डरोब उघडला. आतल्या दांडीवर एक लुंगी नी जेण्टस् बुशशर्ट मिळाला. तिने सगळे ड्रॉवर उघडून बघितले . पण तिचे कपडे मिळाले नाहीत. मग लुंगी गुंडाळून बुश शर्ट घालून ती हॉलमध्ये जायच्या दाराजवळ गेली. दाराला आतून कडी किंवा टॉवर बोल्टही नव्हता. तिने दार लोटून पाहिलं ... दाराला बाहेरून कडी घातल्याच लक्षात आल्यावर तिने नॉकिंग केल ... मग दाराला जोर जोराने धक्के मारले... मग राकेश्ला हाका मारून पाहिल्या पण बाहेरून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी हताश होवून ती कॉटवर जाऊन आडवी झाली.

राकेशच्या मित्राने सिलेनॉरच्या चार गोळ्या टाकलेली कॉफी प्याल्यावर  वीस मिनिटातच प्रियाला इतकी निश्चल  नी गाढ झोप लागली की , तिला मित्रानी उचलून बेडरूमध्ये कॉटवर नेऊन टाकल. नंतर राकेश रूममध्ये गेला. तिला पूर्ण निर्वस्त्र

करून रात्री अकरा वाजेतो तिचा उपभोग घेऊन तो रूम बाहेर पडला. त्या दोघांचे असंख्य फोटोही मित्रानी घेतले ले होते. सगळा कार्यभाग उरकल्यावर तिची सलवार, टॉप नी ओढणी हॉलमधल्या वॉर्डरोबमध्ये टाकून दरवाजा लॉक करून चिकना नी त्याचा कंपू बाहेर पडले. जो तो साळसूद पणे आपल्या घराकडे निघाला.आता दुस-या दिवशी नऊ साडेनऊ पर्यंत कोणीही त्या फ्लॅटकाडे फिरकणार नव्हत. साऊंडप्रूफ फ्लॅट मध्ये प्रिया कितीही बोंबलली असती तरी कुणीही तिच्या मदतीला येणेशक्य नव्हते. फ्लॅट ची खिडकी लॉक्ड होती. त्याहीपेक्षा आपण किती भीषण दुष्टचक्रात सापडलोय याची पुसटशीही जाणीव नसलेली कोणतीच मुलगी आरंभीच्या स्टेजवर जीवावर उदार होवून कसलेही दु:साहस करणे शक्य नाही हे चिकना नी त्याचा कंपू पुरते ओळखून होता.

कुर्ला चेंबूरच्या हद्दीवर अगदी एका बाजूला असलेल्या त्या अपार्टमेंटमध्ये सात मजले अधिकृत नी आठवा अनधिकृत होता. बाहेरून पहाणा-याला याची कल्पनाही येण्यासारखी नव्हती. लिफ्ट फक्त सातव्या मजल्या पर्यंतच होती. आठव्या मजल्यावरच्या सहा टू बीएचके नी चार वन बीएचके मध्ये कोणी कुटुंब वत्सल कायम निवासी ओनर नव्हते. तस पाचवा ,सहावा नी सातवा तीन्ही मजले गबरगंड पैसेवाले, मंत्री, कॉर्पोरेटर, मंत्रालयातले सचीव, पी एस आय, फ़ॉरेनला जॉब करणारे ...... ज्यानी एक्सेसिव्ह पैसा कुठेतरी अडकवायचा

म्हणून फ्लॅट घेतलेल्या हाय फाय असामींनी अडवलेले होते. सुपर डिलक्स या श्रेणीत मोडणा-या त्या अपार्टमेंट मधिल फ्लॅटचे दर ब-या पैकी कमाई करणा-यालाही परवडणारे नव्हते. आठव्या मजल्यावरच्या बहुसंख्य फ्लटस् मध्ये गैर कानूनी धंदे चालायचे. तथा कथित चिकन्या सह पाच जणांच्या कंपूत तिघेजण चिकना, गोरा नी लंबू लेडि किलर होते. कंगाल कुटुंबातल्या देखण्या पोरीना कटवून या फ्लॅटवर आणल जायच. पाचहीजण यथास्थित हात धुवून झाल्यावर कामाठीपुरा, गोलपीठा, फोरासरोड वरच्या घरवालीकडे अडीच- तीन लाखा पर्यंत तीचा सौदा करून कमाई करायचे. महिनाभरात अशा आठ दहाजणी तरी गळाला लागायच्या.कंपूतले सगळे जण पुरे पोचलेले नी त्यांचे राजकारण्यांपासून तो सनदि अधिका-यांपर्यंत लागे बांधे.... कधि कधि मंत्री, व्हीआयपी अफसर यानाही ते कोरा माल पुरवायचे.

जसजसा वेळ जाऊ लागला तसतशी प्रिया हताश होवू लागली. तिने खिडकी उघडायचा प्रयत्न केला पण तो निष्फळ झाला. मग तिने वॉर्डरोबचे ड्रॉवर धुंडाळायला सुरुवात केली. एका खणात पोर्न मॅगझिन्स होती. लॉकर उघडल्यावर आत तीन चार बँक पास बुक नी चेक बुक मिळाली. तिने पासबुक उघडले. अकौंट होल्डर राकेश किशन खुराना नी मुकेश बच्छाव वलीचा दोघांची नावे नी फोटो होते. तिने एकेक पासबुक उघडून पाहिल्यावर ती अचंबित झाली. पास बुका मध्ये हजारो

रुपये देवघेवी झाल्याच्या नोंदी नी शिल्लक रक्कमा ही खूप मोठ्या होत्या. मात्र एका पासबुकावर बुलगानी दाढी राखून डोक्यावर मुसलमानी जाळीदार पांढरी टोपी घातलेला चिकन्याचा फोटो नी त्याचे वसीम अ.रऊफ कादरी अस नाव वाचल्यावर प्रियाच्या छातीत धडधडू लागल. भीतीने लटलटा कापू लागली. सकाळी सव्वानऊ वाजता राकेश भेटल्यापासून तो पहाटे तिला जाग येईपर्यंतच्या अनुभवांची संगती लावता तीचा पुरता धीर सुटला.... आपले सर्वस्व गमावून पुढे आणखी काय दुर्दैव ओढवतेय की काय या अशुभाच्या चाहुलीने ती घामाघूम झाली. आपण कुठल्यातरी अनाकलनीय दुष्ट चक्रात सापडलोय या जाणीवेने ती सुन्न झाली.

एक एक मिनिट संपता संपत नव्हते. नशीब एवढेच तिचे रिस्टवॉच त्याने सोडून घेतलेले नव्हते म्हणून वेळ तरी समजत होती. चार...पाच.. सहा ...सात.... आठ... नऊ एकेक तास तिला युगा युगा सारखा वाटला. राकेश किंवा त्याचा कुणी मित्र येवून दार उघडील म्हणून ती डोळ्यात प्राण आणून वाट पहात बसली . अखेर साडे नऊला हॉल चा दरवाजा उघडल्याचा आवाज आला तशी प्रिया दाराजळ जावून दारावर बुक्के मारू लागली. मिनिटभरात लंबूने मित्राने दार उघडले. चवताळलेल्या प्रियाने त्याला बाजूला ढकलून हॉल च्या मेन दरवाज्याकडे धाव घेतली. अशा विविध अनुभवाना सरवलेले ते पूर्ण सावध होते. दोघेजण धावत पुढे येवून त्यानी प्रियाला

जखडून धरले. एकाने तिच्या झिंज्या खेचीत छातीवर , पोटावर कचाकच गुद्दे हाणले . मार सहन न होवून कळवळत प्रिया त्यांना धमकावू लागली. “ प्लीज प्लीज राकेश को बुलाओ...... मुझे यहाँ बंद करके कहाँ गुम हो गया है वो...... उसे आने दो...... एक एक को ऐसा सबक सिखाऊँगी....... मै उसकी मंगेतर हूँ...... तुमने मुझे बेरहमीसे पीटा है..... तुम्हे छोडुँगी नहीं ” तिला फरपटत नेवून बेडरूम मध्ये ढकलून एकजण बोलला. “ ए लौंडी..... फिर ऐसी हरकत की तो हड्डियाँ तोड डालेंगे ...... जो भी होगा , वो चुपचाप सहती रहो .... अगर एक लब्ज भी निकाला ना तो तेरी जुबान काटकर गुंगी बनाएँगे...”

अवघाती मार खाऊन वेदनानी विव्हळत आणि अपमानाने अंतर्बाह्य पेटून निघालेली प्रिया स्फुंदून स्फुंदून रडत राहिली. तासाभराने बेडरूमचा दरवाजा उघडून राकेश आला. “ कमिने कुत्ते...... मुझे कॉफीमे नशेकी दवा पिलाकर तूने मेरी मर्जी के खिलाफ़ जबर्दस्ती की है...... मेरे कपडे छिपाकर मुझे यहाँ बंद करके रक्खाहै ..... तेरे दोस्तोने मुझे बेरहमीसे पीटा है ...... मै तुम्हे छोडूँगी नही.....तू राकेश नही है ...... मैंने लॉकरमे रख्खे हुवे बैंक पासबूक देखे ..... तू तो वसीम काद्री है....मैं तेरे झूठ का भांडा फोडकर तुझे जेल भिजवाऊँगी”

तिचे बोलणे ऐकून रागाने बेभान झालेला चिकना ...... त्याने फाडकन तिच्या अशी मुस्कटात मारली की तिने भीषण किंकाळी मारली. मग तिला कॉटवरून खेचून त्याने दणादण

लाथा मारीत दमबाजी सुरु केली. “ सुव्वर की औलाद ... तेरी ये औकात? तु क्या मेरा भांडा फोडेगी? तु मेरी चुँगल में ऐसी फँसी है की अब मौत के बाद ही तू छुटेगी...... मेरे साथ ...मेरे दोस्तोंके साथ तेरे ऐसे फोटु निकाले है हमने की तु किसिको मुँह दिखानेके काबिल नहीं रहोगी.... मै वसीम हुँ या राकेश हुँ तु क्या जानेगी? मेरे और भी कई नाम है..... मै तुम्हें कामाठी पुरामें घरवालीको बेचकर रंडी बना दूँगा...”

त्याचे मित्र मधे पडले नी त्याला बाजूला घेत म्हणाले.... “ अब बस्स भी करो चिकने ... सालीकू भूखी मरने दे...... पेटमे चूहे दौडने लगेंगे ना तब काबूमें आएगी लौंडी....” टेबलावर ठेवलेल बिर्याणीच पार्सल नी पासबुकं उचलून ते खोली बाहेर गेले नी दरवाजा बंद झाला. आता मात्र प्रिया पुरती हताश झाली. रागाच्या भरात आपण स्वत:च्या सुटकेचा मार्ग कायमचा बंद केला हे उमगून ती खचूनच गेली. आपण बेअकली पणाने शत्रूला सावध करून आपल्या हातानेआपला घात करून घेतला याचा तिला पश्चात्ताप झाला. आता या पुढे त्याना विरोध करून आत्मघात करून घेण्या ऐवजी सुटकेची संधी पहात मूग गिळून गप्प रहायच असा निर्धार तिने केला,

चार वाजता दार उघडलं नी एकजण आत आला . त्याच्या सोबत अर्ध्या वयाची धिप्पाड नेपाळी बाई नी तोंडावर देवीचे वण असणारा काळा कभिन्न हबशी होता. प्रियाकडे बोट दाखवीत तो म्हणाला, “ये लौंडी देखो ..... एकदम चिकना

माल है ... आज सुबह ही लाये है .... ” आलेल्या दोघानीही तिला नीट निरखून पाहिले. काळा माणुस बोलला, “ देखो खाला , चमडा सुफेद लेकिन उमरसे मोटी लगती है ....” नी तिघेही खोलीबाहेर पडली. दहा मिनीटानी पुन्हा दार उघडले .कागदात गुंडाळलेले दोन समोसे नी चहाचा कप घेऊन खाला आत आली होती ...... प्रियासमोर समोसे नी चहाचाकप ठेवून “तुम्हारा सुखा हुवा मूं देखकर मैं समझी की इन शैतानोने तुम्हे खानेकू कुछ नहीं दिया है .... इसलिये मै ये लेके आयी..... तूने इन शैतानोंको नहीं पहचाना ..... इनसे बाते लडाओगी तो पछताना पडेगा .... जो भी होगा चुपचाप सहती रहो .... मैं तुम्हें जल्दही इन दरिंदोंसे छुडाऊँगी .....”

खालाने ऐंशी हजाराची बोली लावली. पण ते दोन लाखांवर अडून बसले. बराच वेळा अगदी हमरा तुमरीवर येत गळा फाटेस्तोवर सौदेबाजी चालली. पंधरा मिनीटा नंतर राकेश च्या मुसलमान मित्राने, “सुलेमान जरा इधर आ .....”म्हणत काळ्या हबशाला बाजूला घेतले नी बराच वेळ त्यांचे गुफ्तगू झाल्यावर सुलेमान खालाच्या कानाशी लागत काहीतरी समजवू लागल्यावर नकारार्थी मान हालवीत खाला म्हणाली, “ जादासे जादा ग्यारा हजार और दूँगी..... इससे जादा एक पाई भी नहीं दूँगी.....साला इस धंदेमे तो आजकल बहोत मंदी चल रही है..... गि-हाक तो कम होता जा रहा बिन बदिन.... पुलिसका हप्ता भी बढ गया है.... बंबई में तो चमडा बहोत

सस्ता मिल रहा रे आज कल...... इस्कूल कोलेज की बच्ची लोग तो सस्तेमें मिल रही ना और डांस बार वाले बरकतमे है आज कल ..... पैसेवाला जवान लोग तो कोठेमें आताच नहीं आजकल... . देना है तो दे दे वरना हम चले .... मेरे पास जादा टैम हैच कहाँ ” सौदा जमला नाही. सुलेमान नी खाला बाहेर पडल्यावर अर्ध्याजिन्यातून सुलेमान माघारी आला... “देखो भाय पोक्या, आखरी जुबान है.... वसीम आनेपर सब मिलकर सोचो ...... एक लाख बीस हजार में जमता है तो कल दोपहर तक चमडा कोठीपर लेकर आओ .... रोकडा पैसा लेके जाओ ” नी तो निघून गेला.

सात वाजता वसीम की राकेश आला. “अरे भाय , दो घंटा पहले वो नेपाली खाला आयी थी..... एक लाख बीस हजार बोलके गयी.... पटता ही तो कल दोपहर तक चमडा उस्की कोठीपर छोडके आओ... रोकडा मिलेगा.. वो बोली , आज कल इस्कूल कोलेज की बच्ची लोग तो सस्तेमें मिल रही ना..... पैसेवाला जवान लोग तो कोठेमें आताच नहीं आजकल कोठेपे, धंदेमें मंदी चल रही है ...... ” त्यावर तो म्हणाला, “आपूनका तो लक खुल गया ...... कोठेवाली क्या खाक देंगी... पूरे पाँच लाख गिन लेंगे हम लोग..... केकिन जरा होशियारीसे करना चाहिये.... बडा जोखम का काम है... ” मग त्याने सगळा मामला खोलून सांगितला. त्याला कर्नाटकातून दोस्ताचा फोन आला होता. सौदी च्या शेखसाहेबाला किडनी

मिळवून देण्यासाठी 3 लाख रुपयाची ऑफर होती.पन्नास हजार ॲडव्हान्स ही द्यायचीही तयारी होती. डोनरला कर्नाटक मधल्या पत्त्यावर न्यायच होत. तिथे पोचल्यावर पुढची सगळी फिल्डिंग लावून तयार होती. दोन दिवसात काम फिनिश नी रोकडे तीन लाख कॅश.... फक्त आधी डोनरचा ब्लड ग्रूप कळवायचा होता. खूशीत शीळ घुमवीत चिकना बोलला..... “ अब तू देखतेही रह... ये तो साला आसान धंदा है.... काला बुरा कैसाभी माल चलेगा ... अपनेको तो बस किडनीसे मतलब... मै तो रोजाना पाँच छे लडकिया पटाऊँगा..... जा जरा कुल्फी लेके आ .... रंडी को खुस करेंगे...”

कुल्फीचा कुल्हड घे ऊन चिकना बेड रूम मध्ये घुसला... “लो कुल्फी खाओ मेरी रानी.... जादा चिढाएगी ना तो आपुन खतरनाक है... ” प्रियाने कुल्फी हातात घेतली नी लाडिक पणे त्याचा हात धरून जवळ ओढित बोलली, “ देखो चिकने हमरी भूल हो गयी.... तेरे दोस्तोने मेरे साथ बुरा बर्ताव किया .... उनका गुस्सा तुमपर निकाला मैंने.... मुझे कोठीवाली को मत बेच... मै तेरे साथ शादी करनेकू तैय्यार हूँ? ” मिळाला एवढा दणका खावून प्रिया शहाणी झाली आहे हे ओळखून चिकना नि:शंक झाला. “मेरी इक बात मानोगी तो मै तेरे साथ शादी करूँगा ....दो तीन दिनोमें मै तुझे बंबई के बाहर मेरे गाँव मे ले जानेवाला हूँ... खा ... कुल्फी खा.....तेरा ब्लड ग्रूप कौनसा है... ” “ बी प्लस..... ” प्रिया वीना विलंब उत्तरली. “मुझे नहाना

है .... मेरे कपडे दे दो ना ” तासाभराने सलवार टॉप नाही पण दोन बुरखे तिला देण्यातआले. त्या नंतर दोन दिवस विना त्रासात गेले. मतलब साध्य करायचा तर झगडा बखेडा करून उपयोगाचा नाही हे प्रिया नी चिकना गँग दोघही पुरेपूर ओळखून होती.

राकेश गँग ने पद्धतशीरपणे सगळा प्लॅन आखला. प्रियाने वाटेत काही गडबड करू नये म्हणून तिचा उजवा हात बँडेजमध्ये जखडबंद करून गळ्यात टांगला. फक्त अंतर्वस्त्र घालून त्यावर बुरखा घालायला दिला. चिकन्याने आखूड पजामा ढग़ळ कुर्ता नी डोकीवर सफेद जाळीदार टोपी असा टिपीकल मुसलमानी पेहेराव केला. रात्रीआठ वाजता तिला सिलेनारच्या दोन गोळ्या घ्यायला लावल्या नी दहा मिनीटातच लंबूच्या मित्राची सेव्हन सीटर एनोव्हा क्रिस्टा गँगला घेऊन सुसाट निघाली. थंडगार एसी नी सिलेनॉर चा असर होऊन पंधरा मिनीटातच प्रियाची विकेट पडली . रिस्क टाळण्या साठी थेट बेळगाव न गाठता सातारा हॉल्ट करून ब्रेक जर्नी करायचा प्लॅन होता. दुस-या दिवशी संध्याकाळी सातारा सोडून पहाटे राकेश गँग बेळगावला दाखल झाली. मुंबई ते बेळगाव संपूर्ण प्रवासात दोन चेक पोस्ट वर पोलिसानी गाडीत डोकावून जुजबी चेकिंग केले. बाकी काहीही अडथळा आला नाही. कंपनी वसतीला झोपडपट्टी सारख्या घरात थांबली. कोणता प्रदेश असावा काही थांग पत्ता तिला लागला नाही पण

ऐकू येणाऱ्या शब्दांवरून आपण कानडी मुलुखात आहोत असा अंदाज तिने बांधला. बाहेर पडताना तिच्या डोळ्यावर नी तोंडावर पट्टी बांधूनच तिला फिराव लागे. तिला मेडिकल चेक अप साठी नेताना राकेश ने तिला सज्जड धमकी दिली, "ये देखो प्रिया, वैसे तो तुम्हे फोरास रोड या कामाठी पुरा में कोठी वालीको बेचना था, लेकिन तुमपे रहम खाकर उसके बजाय तुम्हारी एक किडनी निकालकर तुम्हें छोड देनेवाले है... क्या मंजूर है?"

" किडनी के एक लाख रुपिए मिलेंगे. पचास हजार तुम्हे और पचास हजार गँगको. अगर चुपचाप हमारा साथ दिया तो कल तेरी किडनी निकालकर दो दिनोके बाद कॅश के साथ तुम्हे कुर्ला छोडेंगे." तिच्या गल्लितच एकाने अरबाला किडनी डोनेट करून तीन लाख रुपये मिळवले असं बोललं जायचं. ही गँगही आपली किडनी विकून तीन चार लाख रुपये मिळणार आहे. कोठेवाली एवढे पैसे देनार नाही म्हणून आपली किडनी विकून मोठी कमाई करून आपल्याला सोडायला हे तयार झालेत हे तिने ओळखलं. हयातभर कुंटणखान्यान सडत राहण्या पेक्षा किडनी दे ऊन त्या बदल्यात सुटका करून घेण प्रियाने मान्य केलं. राकेश तिला घेऊन नियोजीत प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये दाखल झाला. तिथे तीन चार वेगवेगळ्या फ़ॉर्म्स वर तिच्या सह्या घेतल्या.मग दोन तीन टेस्ट केल्या नी अकरा वाजतातिला ऑपरेशन थि एटर मध्ये नेण्यात आलं.

प्लॅन प्रमाणे सगळं काही बिन बोभाट उरकलं. प्रियाच्या पोटावर दीड इंच जखम होती. खूप थकवा जाणवत होता. पण इतर काही त्रास जाणवला नाही. त्या कैदेतून जीवानिशी बाहेर पडायला ती आतुर झालेली होती. काही न बोलता ती गप्प राहिली होती. पार्टीने ठरल्या प्रमाणे ॲडव्हान्स वजा जाता दिलेली चार लाख कॅश घेऊन गँग परतीच्या प्रवासाला निघाली. वाटेत चेकिंग झालेच तरी काय वांधा नको म्हणून त्यानी तीन लाख रुपये प्रियाच्या पर्समध्येच ठेवले नी उरलेले पाचही जणानी वाटून घेतले . कोणताही पोलीस बुरखाधारी नी बँडेज मध्ये हात गळ्यात टांगलेल्या निद्रिस्त मुस्लिम महिलेची पर्स उघडून पहायची आगळिक करू धजावला नसता . याची त्याना पूर्ण खात्री होती. परतीचा प्रवास विना ब्रेक व्हायचा होता. वाईला एका निर्जन जागी एनोव्हा थांबली. अर्धवट झोपेत असलेल्या प्रियाला बहिर्दिशेला नेऊन आणल्यावर पुढचा प्रवास सुरु झाला. वाशीला येऊन लंबूच्या फ्लॅट वर गँग पोचली तेंव्हा सकाळचे सात वाजले होते. प्रिया अद्यापही गुंगीतच होती. तिच्या हाताच बँडेज सोडून तिला कॉटवर आडवी करून ती जागी व्हायची वाट पहात त्यानी तिपानीचा डाव मांडला. चिकन्याने प्रियाच्या पर्समध्ये पाच हजाराच्या नोटा कोंबल्या, तिची सलवार टॉप नी पर्स उशाशी ठेवून प्लॅन प्रमाणे तो गुल झाला. अकरा वाजता प्रिया जागी हो ऊन उठून बसली. सलवार टॉप घेऊन ती बाथरूममध्ये

घुसली .

कपडे घालून बाहेर आल्यावर “ अरे ओ लंबू भाय... चिकना कहाँ है?” तिचा आवाज ऐकताच हातातला डाव तसाच टाकून लंबू उठला. “चिकना तो अपने घर गया ... आब वो यहाँ नही आयेगा. और ध्यानसे सुन .... हम तुम्हे रिहा करनेवाले है... आँखोमे और मूँह पर पट्टी बांधकर हम तुम्हे रिक्षा मे बिठा देंगे रिक्षा चालू होनेकेबाद तुम पट्टी खोल सकती हो..... तेरे पर्समे तुम्हारे शेअर रखा है.... ” खर तर तिला चार पावल चालायचही त्राण उरलेल नव्हत... पण सुटका होणार हे ऐकताच तिच्या अंगात घोड्याच बळ संचारल... तिच्यातोंडा वर नी डोळ्यांवर पट्टी बांधून बुरखा घेतल्यावर लंबू नी तिचा हात धरून चालायला लागला. लिफ़्ट थांबल्या वर एकजण लगबगीने रिक्षा आणायला गेला. हळू हळू चालत ती गेट मध्ये पोचल्यावर पाचच मिनिटात रिक्षा आली. “ भाभीको स्टेशन छोडो ” म्हणत तिला रिक्षात बसवून लंबू सह चौकडी पसार झाली. अकस्मातपणे सुटकेची संधी मिळाल्यामुळे हरखून गेलेल्या प्रियाला चटकन डोळ्यावरची नी तोंडावरची पट्टी सोडायच ही उशिरा सुचल. वाशी स्टेशन आल नी रिक्षा थांबली . “ तुम जाव , किराया दिया है तुम्हारे देवरने ” रिक्षावाला उत्तरला.

रिक्षातून उतरल्यावर मात्र तिच उसन अवसान गळून पडल नी तिला हुंदका फुटला. महत्प्रयासाने रडू थोपवीत मंद मंद पावल टाकीत ती पाय-या चढली. गेट मधून आत जाऊन

रिकाम्या बाकड्यावर ती जवळ जवळ कोसळलीच. दु:खाचा कड जिरल्यावर तिने तिकीट बारीवर जाऊन तिकीट काढल. बारा वाजत आले होते नी गर्दीचा भर ओसरला होता. ट्रेन आली नी ती लेडिज डब्यात शिरली. सीट वर बसल्या बसल्या तिने बुरखा काढून हातात घेतला. बुरखा आड धरून तिने पर्स मधल्या नोटा मोजून पाहिल्या, फक्त सहा हजार आठशे रुपये भरले. भाड खाऊनी शेवटी फसवलंच... ती मनात चरफडली. गत घटनांची संगती लावताना तीला एक प्रश्न सातवीत राहिला .... आपल्याला भवफासात टाकून चकमा देणारा तो हरामजादा वास्तवात कोण असेल बरं? राकेश की वसीम.......?

**********

# लेखक परिचय



## प्रा . श्रीराम विनायक काळे.

**एम्. ए.एम्.एड्. एम्.फील्.**

- बी .एड्. कॉलेज देवगड येथे २८ वर्षे प्राध्यापक म्हणून सेवा.
- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक उत्तेजनार्थ अनुदानातून प्रचार प्रकाशन कोल्हापूर तर्फे 'रुजवातीच्या गोष्टी' हा कथासंग्रह प्रकाशित.
- अणुरेणू,देवदुर्ग, आरती, वैनतेय, किरात, प्रसाद, माहेर, अपूर्व, वसुधा, प्रतिबिंब, जत्रा,साहित्य सहयोग या दिपावली विशेषांकामध्ये सुमारे ८० लघुकथा प्रसिद्ध.
- पुढारी नवांकुर कथास्पर्धा , प्रतिबिंब पुणे आयोजित राज्यस्तर कथास्पर्धा, तरुणभारत अक्षरयात्रा कथास्पर्धा, बॅ.नाथ पै कथास्पर्धा सावंतवाडी, को.म.सा.प देवरुख आयोजित कथास्पर्धा, i pustak HUB आयोजित

कथास्पर्धा, साहित्य सहयोग कोल्हापुर आयोजित कथास्पर्धा अशा विविध कथास्पर्धांमध्ये पुरस्कार प्राप्त.

- कालराज प्रकाशन देवगड तर्फे ‘पाखरांची भाषा ’ हा कथासंग्रह प्रसिद्ध.
- विघ्नेश पुस्तक भांडार, कणकवली तर्फे ‘बॅडकमांड’ हा कथासंग्रह प्रसिद्ध.
- ई सहित्य प्रतिष्ठान ठाणे यांच्या तर्फे ' रुजवातीच्या गोष्टी, 'पाखरांची भाषा ' बॅड कमांड' आणि ' तेरी चुनरिया दिल ले गयी ' हे कथासंग्रह प्रसिद्ध.